७०७८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय ९२
सं. क्र. ८९११
REFBK-0001608
REFBK-0001608

दा. क्र. १६०८

म. ग्रं. सं. ठाणें
प्रवास
क्र. ८७१

# माझा अटकेपार प्रवास

गोविंद चिमणाजी भावे.

To
The Editor, Chikitsaka

For favour of early review

# माझा अटकेपार प्रवास.

130. Vithal Wadi, Kalbadevi, BOMBAY

लेखक व प्रकाशकः

गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.,

लाईफ मेंबर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणें.

२६७, नारायण पेठ, पुणें शहर.

मुद्रकः

केशव रावजी गोंध ... शनवार पेठ, पुणें.

REFBK-0001608

( सर्व हक्क स्वाधीन )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 12 E 2
सन १९१८

किंमत १२ आणे

# अनुक्रमणिका.


१ भोपाळ ... ... ... ... ... ... ... १

२ साची-भिलसा-उदयगिरी ... ... ... ... १६

३ नवी व जुनी दिल्ली ... ... ... ... ... ३४

४ जलंदर कन्यामहाविद्यालय... ... ... ... ... ५०

५ अमृतसर व लाहोर ... ... ... ... ... ६०

६ तक्षशीला-अटक-पेशावर ... ... ... ... ... ७८



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ... दि: ...

क्रमांक ... नोंद दि: ...

# प्रस्तावना.

माझ्या प्रवासपर लेखांचा हा दुसरा भाग आहे. पूर्वकाळीं सिंधूनद व अटकप्रांत हा हिंदुस्थानची वायव्यमर्यादा गणला जात असे व म्हणून पेशवाईत अटकेपर्यंत झेंडे लावणें म्हणजे सर्व हिंदुस्थान काबीज करणें अशी म्हण पडली. सिंधूनदीच्या पलीकडच्या देशाला गांधार देश म्हणत. व त्यांत हल्लींचा अफगाणिस्थान व वायव्यप्रांत या दोहोंचाहि समावेश होई. पण हल्लीं पेशावरापर्यंत म्हणजे खैबर घांटापर्यंतचाच मुलुख ब्रिटिश हिंदुस्थानांत मोडतो व सध्यांच्या हिंदुस्थानच्या या वायव्यमर्यादेपर्यंतच माझा प्रवास झाला; त्याचें या भागांत वर्णन आलें आहे. बुद्धकालीन वास्तुकलेच्या दृष्टीनें अत्यंत प्रख्यात अशा दोन स्थळांचें—साची व तक्षशीला—वर्णनही या भागांत आलें आहे. तसेंच फार पुरातन काळापासून प्रख्यात अशा दिल्लीचेंही वर्णन आलें आहे. पंजाबांत आर्यसमाजाची शिक्षणविषयक चळवळ जोराची आहे. त्या आर्यसमाजाच्या दोन शिक्षणसंस्थांची हकीकतही या भागांत दिली आहे. माझ्या प्रवासपर लेखांच्या पहिल्या भागांत आर्यसमाजाच्या आणखी एका संस्थेची हकीकत आली आहे. म्हणजे पंजाबांतील हल्लींच्या काळच्या एका मोठ्या धर्मपंथाच्या शिक्षणविषयक चळवळीची कल्पना या तीन लेखावरून येईल अशी आशा आहे. याप्रमाणें या प्रवासपर लेखांत मी विषयविविधता साधण्याचा प्रयत्न केला आहे. हे लेख मासिकमनोरंजनांत पूर्वी प्रसिद्ध झाले होते. पण पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना पूर्वीच्या लेखांत भर घालून त्या त्या स्थळांविषयीं आजतागाईत उपलब्ध झालेली माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् या पुस्तकांत बरीच नवीन माहिती दिली आहे.


२७७, नारायण पेठ, पुणें शहर.<br>१२ दिजंबर १९१८

**गोविंद चिमणाजी भाटे.**


अनुक्रम ... दि: ...
... नोंद दि. ...




रघुनाथराव पेशवे.



बरातलाव शहर—भोपाळ.



मोती मसजिद्-भोपाळ.



अजबखाना—भोपाळ.

# माझा अटकेपार प्रवास.

HOMCO. DISPENS. १६०८ BELGAUM V. M. BAKRE

१

## भोपाळ.

कोणत्यादि गोष्टीचें चिरंतन चिंतन, सर्वदा निदिध्यास व सारखी तळमळ एकाद्याला लागली, म्हणजे त्याला त्या गोष्टीचा नाद लागला, असें आपण म्हणतों. हा नाद सुपारिणामी असला, म्हणजे तो सद्गुण बनून प्रशंसनीय होतो; हाच नाद दुष्परिणामी असला, म्हणजे तो व्यसनरूप पाहून गर्हणीय होतो. माझीच गोष्ट घ्याना! मला हा प्रवासाचा सुखदायी व सुपारिणामी नाद बऱ्याच प्रौढ वयांत लागला. वर्षादोन वर्षांतून दूरच्या प्रांताचा प्रवास केल्यावांचून मला चैन पडत नाहीं; मन अगदीं चुळबूळ करूं लागतें.

प्रवासाला अनुकूल परिस्थिति पाहिली तर ती माझ्या पूर्ववयांत हल्लीपेक्षां जास्त होती. माझे वडील इंग्रजी फारसे शिकलेले नसूनसुद्धां मोठे कॉंग्रेसभक्त होते; यामुळें ते पुष्कळ वेळां कॉंग्रेसच्या बैठकांना जात असत. तेव्हां त्यांच्याबरोबर मला सहज जातां आलें असतें. शिवाय, माझ्या

वडिलांची सांपत्तिक स्थिति बरी असल्यामुळें व मला माझ्या विद्यार्थिदशेंत शिष्यवृत्ति नेहमीं मिळत असल्यामुळें मनांत असतें तर मला त्या वयांत पुष्कळ प्रवास करावयाला सांपडला असता.. पण त्या वयांत मी फार घरकोंबडा होतों ! शाळेची किंवा कॉलेजची सुटी झालीरे झाली, कीं, घरीं पळावयाचें, असा माझा क्रम असे. एकदां तर या माझ्या आतुरतेबद्दल माझे पूज्य गुरु प्रि. सेलबीसाहेब यांच्या किंचित् रोषाला मला पात्र व्हावें लागलें होतें. पण त्यांच्याशीं केलेल्या सरळ वर्तनानें मला त्या वेळीं परवानगी मिळाली. आमच्या कॉलेजच्या परीक्षा वगैरे सर्व आटोपल्या होत्या. माझें कामहि संपलें होतें. कॉलेजच्या सुटीला फक्त दोन दिवस अवकाश होता. तेव्हां येथें आतां उगीच राहून काय करावयाचें, असा मनांत विचार करून मी घरीं जाण्याची तयारी केली; वडिलांना निघण्याचें मुकरर पत्र लिहिलें; क्लबाचीं व इतर खर्चांचीं बिलें दिलीं; सामानाची बांधाबांध केली, व सर्व तयारी झाल्यावर प्रवासाचा पोषाख करून प्रि. सेलबीसाहेबांच्या बंगल्यावर त्यांची परवानगी मागावयाला गेलों. तेव्हां ते किंचित् रागावल्यासारखे दिसले, व "सुटीच्या आधीं जाणें चांगलें नाहीं; विशेषतः कॉलेजांतल्या प्रौढ विद्यार्थ्यांनीं तर जाऊं नये. कारण, यायोगें इतर विद्यार्थ्यांच्या मनांत शिस्तीबद्दल शिथिलता उत्पन्न होते." असें ते मला ह्मणाले. तेव्हां मलाहि त्यांचें म्हणणें पटलें, व मी आपली चूक त्यांच्यापाशीं प्रांजलपणें कबूल केली. पण "मीं जाण्याची सर्व तयारी केली आहे; घरीं मुकरर येण्याचा दिवसहि कळविला आहे, व खरोखरीं माझे सर्व अभ्यास आणि काम संपलें आहे." असें मीं तितक्यांत म्हटलेंच. हें ऐकून प्रि. सेलबीसाहेबांनीं मला एकदांची परवानगी दिली, व मी घरीं गेलों.

त्या काळच्या घरकोंबडेपणामुळें त्या वयांत मजकडून प्रवास घडला नाहीं; याबद्दल एका दृष्टीनें मला वाईट वाटत नाहीं. कारण, त्या वेळीं मी बहिर्दृष्टिच होतों. मी प्रवासाला गेलों असतों, तर इतर पुष्कळ प्रवाशांप्रमाणें जडदृष्टीनेंच मीं प्रवास केला असता. आतां पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें, व्यासंगानें व वाचनानें मला एक प्रकारची अन्तर्दृष्टि आली

आहे; यामुळें हल्लींच्या माझ्या प्रवासापासून मला स्वतःला पुष्कळ आनंद व फायदा होतो; इतकेंच नव्हे, तर माझ्या प्रिय वाचकांनाहि माझ्या प्रवासवृत्तापासून थोडाबहुत आनंद व फायदा होतो, असें माझ्या ऐकिवांत आलें आहे. ह्मणून या बऱ्याच प्रौढ वयांत मला प्रवासाचा नाद लागला हें एका अर्थी बरें झालें, असें मळा वाटतें. असो.

सन १९१२ च्या मे महिन्यांत मीं माझ्या बंधूसह उत्तरहिंदुस्थानांत तिसऱ्यांदां प्रवास केला होता. तेव्हांपासून कांहींनाकांहीं अपरिहार्य अडचणी उपस्थित होऊन या सालपर्यंत विशेष लांबचा प्रवास करावयाला मला मिळालें नाहीं. या खेपेचा माझा प्रवासाचा बेत मात्र फारच महत्त्वाकांक्षेचा होता. अटकेपार प्रवास करून ब्रिटिश हिंदुस्थानाची ईशान्यमर्यादा जो खैबरघाट, तेथपर्यंतचा प्रदेश पहाण्याचा मीं विचार केला होता; इतकेंच नव्हे, तर तेथून परतून पुढें हिंदुस्थानचें नंदनवन असा जो काश्मीरदेश, तेथेंहि जाण्याचा मीं निश्चय केला होता, व या इतक्या लांबच्या प्रवासाला प्रोत्साहन मिळण्यासारखी स्थितिहि उत्पन्न झाली होती. माझे एक जवळचे नातेवाईक काश्मीरच्या कॉलेजांत गणिताचे प्रोफेसर झाले होते. ते तेथें गेल्यावर त्यांनीं माझी प्रवासप्रियता जाणून मला तिकडे येण्याबद्दल आग्रहाचें निमंत्रण केलें होतें. अर्थात् अशी राहण्याची सोय झाल्यानें माझा प्रवासाचा बेत अधिकच दृढ झाला; पण हा बेत तडीला जाणें बरेंच कठिण होतें, यांत संशय नाहीं. कारण, कोठें अटक आणि कोठें पुणें! तरी पण हल्लींच्या सुलभ प्रवाससाधनांमुळें हा बेत सिद्धीला जाणें फारसें अशक्य मात्र नव्हतें.

'अटक' हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रत्येक खऱ्या महाराष्ट्रीयाला अभिमानाचें भरतें येतें, व राघोबादादा मरारी यांचें स्मरण झाल्याखेरीज रहात नाहीं. भिमथडीच्या घोड्यांना सिंधू नदीचें* पाणी दाखवून मराठ्यांचा

---

* श्रीमन्त राघोबादादा पेशवे खुद्द अटकेपर्यंत गेले होते किंवा नाहीं याबद्दल कागदोपत्रीं पुरावा सांपडत नाहीं. अटकेपर्यंत झेंडे नेल्याची ह्मण मात्र महाराष्ट्रांत प्रचलित होती, ही गोष्ट ग्रँड डफच्या खालील वाक्यां-

झेंडा अटकेला नेणारा पहिला महाराष्ट्रवीर राघोबाच होय. राघोबादादाच्या पुढील आयुष्यक्रमामध्यें बुद्धिपुरस्सर म्हणा किंवा दुर्बलतेनें म्हणा, कितीहि देशबुडव्या चुक्या झालेल्या असोत-त्यांबद्दल महाराष्ट्रीयांस वारंवार रागहि येतो परंतु-राघोबादादांच्या या पूर्ववयांतील अपूर्व कामगिरीबद्दल मनाला सानंद आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. पण त्याबरोबरच आमच्या देशाभिमानी ह्मणविणाऱ्या नाटककाराच्या एका कृतीकडे पाहिलें, ह्मणजे दुःख झाल्यावांचून रहात नाहीं. राघोबादादांचें किती विकृत स्वरूप या नाटकांत दाखविलें आहे! आपल्या रंगमहालामध्यें चोरून पेशवाईचीं वस्त्रें

---

वरून दिसतेः—

"The preeminence to which the Mahrattas had attained was animating and glorious; their right to tribute was acknowlodged on the banks of the Coleroon and the Deccan horse had quenched their thirst from the waters of the Indus."

तरी पण मराठ्यांच्या साम्राज्याच्या वाढींत श्री० राघोबादादा यांची पूर्ववयांतील कामगिरी आश्चर्यकारक होती यांत शंका नाहीं. कारण सन १७५० पासून सन १७५८ पर्यंत बहुतेक प्रत्येक वर्षी श्री० रघुनाथराव उत्तरहिंदुस्थानांत मोहिमेस जात असत व या मोहिमांत त्यांनीं गुजराथ, माळवा, व राजपुतानाहि काबीज केला. दिल्लीस ते सन १७५४ व सन १७५७ मध्यें गेले होते. दिल्लीस असतांनाच पंजाबांतील सरदारांच्या आपसांतील कलहामुळें त्यांना पंजाबांत मोहिम करण्याची संधि आली व त्या संधीचा फायदा घेऊन श्री० रघुनाथराव सन १७५८ मध्यें लाहोरा-पर्यंत मुलुख काबीज करीत गेले व लाहोरच्या किल्ल्यावर त्यांनीं मराठ्यांचा झेंडा रोंविला व तेथें ते एप्रिल ते जूनपर्यंत राहिले. तेव्हां पंजाबची राजधानी लाहोर येथें 'विजेते' ह्मणून गेल्याच्या योगानें पंजाबची मर्यादा जी सिंधूनदी व अटक प्रांत येथपर्यंत त्यांनीं मराठ्यांचे झेंडे लावले, असें अलंकारिक भाषेनें म्हणतां येईल. प्रत्यक्ष सिंधूनदीपर्यंत दादासाहेब गेले होते असें हल्लीं उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून दिसत नाहीं.

अंगावर घालून आपूलाच चेहरा आरशांत पाहणारा, सहज लडिवाळपणें "मी 'ध'चा 'मा' करते," असें ह्मणणाऱ्या आनंदीबाईला आपल्याच हुकुमांत बिनदिक्कत असला भयंकर फरक करूं देणारा, आणि नारायण-रावाच्या वधानंतर त्याच्याच रक्तानें माखलेल्या तरवारीवरील त्याच्या रक्ताचा तिलक आपल्या व आपल्या बायकोच्या कपाळावर लावणारा राक्षसी, भ्याड, बाईलबुध्या, नटवा, नाटकी राघोबा कोणीकडे, आणि भोळा सांब, शिपाईबाण्याचा, संकुचित मनाचा, बराच महत्त्वाकांक्षी, 'नारायणरावाला धरावा' इतकाच हुकूम जिकिरीनें देणारा, दाक्षण्यातिशयशील व नारायण-रावाच्या खुनाची बातमी ऐकल्याबरोबर त्या क्षणीं तरी दुःखावेगानें 'हाय! हाय!' करणारा खरा ऐतिहासिक राघोबा कोणीकडे! पहिल्याबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो, तर दुसऱ्याबद्दल अनुकम्पा उत्पन्न होते. असो.

या खेपेच्या माझ्या प्रवासांत मला आनंद वाटण्याला आणखी एक कारण झालें होतें. ज्यांनीं युरोपांतील नंदनवन जें स्वित्झरलंड येथील वनश्री प्रत्यक्ष पाहिली होती; ज्यांनीं युरोपांतील कलाकौशल्याचें जें माहेर-घर इटली देश, तेथील सुंदरसुंदर इमारती, उत्कृष्ट पुतळे वगैरे कामें अवलोकन केलीं होतीं; व ज्यांच्यामध्यें युरोपांतील प्रवासामुळें, बहुश्रुतपणा मार्मिकता व सूक्ष्म अवलोकनशक्ति हीं आलीं होतीं, असे माझे '**चक्कर-मालें**'तील मित्र माझ्याबरोबर या प्रवासाला यावयाचे होते. याप्रमाणें आमच्या जंगी प्रवासाची सारी सिद्धता झाली. या प्रवासाचें मला इतकें वेड लागलें, कीं, '**अटकीं जावें नित्य वदावें**' व केव्हां केव्हां '**काश्मिरीं जावें नित्य वदावें**' हें पालुपद मी सारखें गुणगुणूं लागलों!

पण आमचा प्रवासाचा कांळ जसजसा जवळ येत चालला, तसतसें हे सर्व 'मनचे मांडे'च होतात कीं काय, असें वाटूं लागलें! प्रथमतः माझ्या काश्मीर येथील नातेवाइकांनीं एकाएकीं तिकडील नोकरी सोडली; यामुळें आमचा तेथला राहण्याचाच आधारस्तंभ नाहींसा झाला! दुसरें माझ्या मित्रांना कांहीं अपरिहार्य कारणामुळें माझ्याबरोबर येणें अशक्य झालें. तेव्हां मला फारच वाईट वाटलें, व मी आपला बेतहि सोडून द्यावयाच्या तयारीला लागलों. पण माझे मित्र मला म्हणाले, "तुम्ही

आपला बेत कशाला बदलतां ? पुढेंमागें दुसऱ्या एकाद्या प्रवासाला आपण बरोबर जाऊं." तेव्हां '**सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः**' या न्यायानें, व पुढील सहप्रवासाच्या आशेवर मी व माझे बंधु असा दोघां-नींच—दिवस फार थोडे राहिले असतांनासुद्धां आणि प्रवासाची आह्मांला फार घाई होईल हें दिसत असतांनासुद्धां—प्रवासाला जाण्याचा दिवस मुकरर केला.

शेवटीं एकदां तो दिवस उजाडला. मागल्या खेपेला आह्मी तारीख ६ मेला पुण्याहून निघालों होतों. व मौजेची गोष्ट ही, कीं, या वेळीं मुकरर केलेला दिवसहि ६ मेच होता! आह्मी पूना एक्सप्रसनें निघून मुंबईला वसतीला गेलों, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं दिल्ली एक्सप्रेसनें जाण्याकरितां बिऱ्हाडाहून निघालों. मागील खेपेला ज्या वेळीं आह्मी प्रवासाला निघालों होतों, त्या वेळीं बोरीबंदरवर थर्ड क्लासच्या उतारूंची सेकंड क्लासच्या उतारूपासून फारकत झालेली नव्हती. एकाच ठिकाणाहून सर्वांना जातां येत असे. पण राजेसाहेबांच्या मुंबईच्या भेटीचा आह्मां तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना जो प्रसाद मिळाला, तो म्हणजे भिकार थर्ड क्लासचा निराळा मार्ग! तेव्हां आह्मी तिसऱ्या वर्गाच्या—म्हणजे क्राफर्ड मार्केटच्या—बाजूकडे गेलों.

अत्यंत दूरच्या व बऱ्याच त्रासाच्या प्रवासाला जात असल्यामुळें आह्मीं सामान अगदीं आटपसर असें घेतलें होतें. दोघां मिळून एक ट्रंक, एक हँडबॅग, दोन बिछाने आणि एक फराळाचा डबा, इतकें आमचें सामान होतें. हें सामान दोन माणसांच्या तिकिटांत जावयाला अडचण पडूं नये अशा बेतानें घेतलें होतें, आणि ह्मणूनच आह्मीं हमालाच्या डोक्यावर सामान देऊन त्याला थेट जिना चढावयाला सांगितलें, व आह्मीं बरोबर गेलों. अर्ध्या जिन्यांत गेल्यावर एका गौरकाय तिकिटकलेक्टरनें आह्मांला अडविलें, व 'ट्रंक वजन केली पाहिजे,' ह्मणून सांगितलें. आह्मीं ह्मटलें "दोघां मिळून आमची एकच ट्रंक आहे, तेव्हां वजन करण्याची गरज नाहीं." तें त्यानें ऐकलें नाहीं, व आह्मी परत फिरूं लागलों; इतक्यांत जवळ उभ्या असलेल्या काळ्या डगल्याच्या पोलिसशिपायानें "साहेबाला चार आणे द्या, म्हणजे जाऊं देईल," असें आह्मांला सांगितलें; परंतु

असला प्रकार करण्याची आमची इच्छा नसल्यामुळें आह्मी परत सामान वजन करण्याच्या ठिकाणीं गेलों, व तेथें आमची ट्रंक वजन करून घेतली तों ती दोन तिकिटांत जाणाऱ्या वजनाच्या आंतच भरली. तेव्हां तसा तिकिटावर दाखला घेऊन आह्मी पुनः जिना चढून तिकिटें दाखवून गाडींत येऊन बसलों. सेकंड क्लास व थर्ड क्लास यांच्या जागा निरनिराळ्या करण्यामध्यें असला हा सांवळागोंधळ करावयाला सांपडावा, हा तर एक हेतु नाहीं ना, असें आमच्या मनांत आलें. पूर्वीच्या व्यवस्थेंत थर्ड, सेकंड वगैरे सर्व उतारूंच्या सामानाचें वजन जास्त दिसल्यास तोलण्याची पद्धत असे. आतां फर्स्ट व सेकंड क्लासच्या बाजूला कोणी बघतच नाहीं, व थर्ड क्लासच्या बाजूला मात्र कसोशीचा कडकपणा! या गोष्टीकडे आमच्या एकाद्या नामदाराचें लक्ष्य जाईल का? पण तो तिकडे थर्ड क्लासकडे जातो कशाला?

सामानाच्या वजनाच्या बाबतींत याप्रमाणें आह्मांला त्रास झाला खरा; पण गाडींत बसल्याबरोबर गाडींतील माणसांच्या पातळाईमुळें आह्मीं तो त्रास पार विसरून गेलों. कारण दिल्लीएक्सप्रेसमध्यें या वेळीं फारशी गर्दी नव्हती. आह्मीं या आनंदांत आहोंत, तोंच गाडी फू फू करीत चालू झाली.

आमचा प्रवास मनमाडपर्यंत मोठ्या सुखानें झाला; पण त्या स्टेशनवर गाडी येऊन पोहोंचते, तोंच भलें थोरलें एक मारवाडमंडळ गाडींत घुसलें! ती चांगली तेराचौदा मंडळी असावी. पांचसहा बायका, दोन तीन मुलें व चारपांच पुरुष. त्यांचें सामान तर पर्वतप्राय होतें! ट्रंका, बोजे, पोतीं यांची शंग डब्याच्या छतापर्यंत लागली! ही मारवाडी मंडळी बरीच श्रीमंत असल्याचें दिसत होतें. पुरुष, बायका, मुलें यांच्या सर्वांच्या अंगावर दागिनेच दागिने होते. एक बाई तर नखशिखांत नव्हे—नखकेशकलापांत—दागिन्यांनीं मढविलेली होती! पायाच्या आंगठ्यांत एक वळ्यासारखें जोडवें होतें, बाकीच्या चार बोटांत जोडविरवल्या होत्या. पायांत तोरड्या, त्याच्यावर शिंदेशाई तोडे, व त्याच्यावर दोन वाळे. या दागिन्यांनीं सहा ईंच पाय तरी अडला असेल! वर वर पहात गेलें असतां या बाईच्या कंबरेंत चांगला जाड असा चांदीचा गोफ होता. पुढें गळ्यांत

पिंपळपान, पुतळ्यांची माळ वगैरे पुष्कळसे दागिने होतेच. दोन्ही हातांच्या बोटांत आंगठ्या होत्या. हातांमध्यें मारवाडी तऱ्हेच्या हस्तिदन्ती, वरखी, चपट्या, जाड अशा बांगड्या होत्या. त्यांनींहि हातांची सहा इंच तरी जागा अडली असेल! बाईच्या कोपरांत वेळा होत्या. कानांत नेहमींचे दागिने होते, आणि कपाळावर एक सोन्याचें फूल होतें. वेणीमध्यें आणखी किती फुलें होतीं, कोण जाणे! मारवाडी लोकांच्या पद्धतीप्रमाणें तिनें पदराचें टोंक खालपर्यंत आणिलें होतें, व त्यांतून ती चोरून चोरून पहात होती. हा थाट पाहून '**काय दिसे हें ध्यान!**' असे उद्गार माझ्या अगदीं ओंठावर आले! पण मीं आपलें मन आंवरलें.

या एका भगिनीच्या वर्णनानें माझ्यावर माझ्या वाचकभगिनी रागावतील; पण हें स्त्रीवर्गाची हेटाळणी करावी या हेतूनें मीं लिहिलें नाहीं. पुरुषांनींच जर स्त्रियांना अज्ञानांधःकारांत ठेविलें आहे, तर त्यांची दागिन्यांसंबंधाची अशी वेडी हौस असावी यांत नवल काय? ही सर्व मारवाडी मंडळी व या सर्व बायका पाहून माझ्या मनांत असें आलें, कीं, देशांत आह्मीं सुधारक 'सुधारणा झपाट्यानें चालली आहे.' असें ह्मणतों खरें; पण तिची गति गोगलगायीच्या गतीपेक्षांहि मंद आहे, व प्रांतचे प्रांत व जातीच्या जाती आपल्या जुन्या चालीरीतींप्रमाणें वागण्यांत अगदीं गढून गेलेल्या आहेत. त्यांना नवीन कल्पनांचा गंधहि नाहीं! सुधारकांना अद्यापि किती तरी प्रचंड काम करावयाचें आहे.

ही मारवाडी मंडळी आल्यापासून अर्थात्च गाडींत फार गर्दी झाली, व उष्माहि भयंकर होऊं लागला. आतां सबंध रात्र अशाच त्रासांत घालवावी लागते कीं काय, अशी आह्मांला भीति पडली; पण चवकशी करितां तें मारवाडमंडळ खांडव्याला उतरावयाचें होतें, व त्याप्रमाणें ती मंडळी खांडव्याला उतरलीहि. आमच्या सुदैवानें नवीन माणसांची भरती झाली नाहीं; त्यामुळें आह्मांला थोडें लवंडावयाला सांपडलें, व चांगली झोंप लागली. पुनः उठतो, तों पहांट झाली होती. आमचें पहिल्या मुक्कामाचें ठिकाण भोपाळ, हें जवळ आलें असलें पाहिजे, असें वाटून

आम्हीं आपलें टाइमटेबल हुडकूं लागलों, तों इतक्यांत गाडी थांबली, व आम्हीं भोपाळ स्टेशनावर येऊन पोहोंचलों.

भोपाळला माझी मुळींच ओळख नव्हती; ह्मणून माझ्या एका मध्यप्रांतांतील मित्राकडून मीं भोपाळ येथील एका स्नेह्याला पत्र लिहविलें होतें, व आम्हीं केव्हां निघणार, हेंहि त्या गृहस्थांना कळविलें होतें. हे गृहस्थ पोलीसखात्यांतील एक बडे अंमलदार होते. त्यांनीं स्टेशनावर आपला जमादार पाठविला होता. तो आह्मांला स्टेशनावर भेटला, व आमची उतरण्याची सर्व काळजी दूर झाली. या जमादारानें आमचें सामान हमालाकडून घेवविलें, व आम्हीं टांग्यांत बसून डाकबंगल्यांत गेलों.

आम्हांला येथें एक स्वतंत्र खोली देण्यांत आली. अजून पहांट असल्यामुळें आम्हीं आपले बिछाने पसरून त्यावर झोंपीं गेलों. सुमारें सात वाजतां आम्हीं जागे झालों, व बाहेर व्हरांड्यांत येऊन पहातों, तों दोन गौरकाय स्त्रीपुरुष आमच्याच खोलीच्या पलीकडच्या खोलीच्या पुढच्या व्हरांड्यांत निजले आहेत! या संस्थानांत युरोपियन व इंडियन यांमध्यें डाकबंगल्याच्या बाबतींत तरी पंक्तिप्रपंच होत नाहीं, हें पाहून आम्हांला आनंद वाटला. हा आनंद हा डाकबंगला सोडतांना पार नाहींसा झाला, ही गोष्ट निराळी!

आम्हीं उठल्यावर डाकबंगल्याच्या खानसाम्यानें चहा तयार असल्याची वर्दी दिली, व चहा आला. आम्हीं येथें आल्याबद्दल खानबहादुरांना (हे पोलीस अधिकारी खानबहादूर होते) चिठ्ठी लिहून 'आम्हांला भोपाळ पहावयाचें आहे,' असें कळविलें. त्यांच्याकडून दोन घोड्यांची संस्थानची गाडी आमचा चहा आटोपतो तोंच येऊन उभी राहिली. ताबडतोब पोषाख करून आम्हीं भोपाळ शहरांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला निघालों.

प्रथमतः आम्हीं या शहरांतील प्रेक्षणिय स्थळांतील सर्वांत उत्तम स्थळ पहावयाला गेलों. हें स्थळ म्हणजे येथला 'बरातलाव' हा होय. हा तलाव धारच्या भोजराजाच्या प्रधानानें बांधला, असें म्हणतात. या तलावाच्या खालच्या अंगाला दुसरा एक लहान तलाव बांधण्यांत आला आहे; तो बराच अर्वाचिनकाळचा आहे. तो सन १७९४ मध्यें छोटेखान नांवाच्या

भोपाळच्या प्रधानानें बांधविला. मोठा व लहान तलाव एका पाटानें जोडलेले आहेत. याच तलावांतून एन्जिननें शहराकरितां पाणी वर चढविलें जातें. हें एन्जिन थोरल्या तलावाच्या कांठावर आहे. या तलावापासून दिसणारा देखावा खरोखरच फार रमणीय आहे. हा तलाव पाहून मला नैनितालच्या तलावाची आठवण झाली. नैनितालचा तलाव लंबवर्तुलाकार आहे, तर हा तलाव साधारण चौकोनी आहे. नैनितालच्या सभोंवारचे डोंगर फारच उंच आहेत, तर या तलावाच्या बाजू टेकड्यावजाच उंच आहेत. दोन्ही तलावांसभोंवतीं वसती आहे. मात्र भोपाळची वसती दाट आहे, तर नैनितालची पातळ आहे. भोपाळचा तलाव नागपुरच्या तलावापेक्षां बराच मोठा आहे. आम्हीं गेलों, तेव्हां वारा बराच असल्यामुळें तलावाच्या पाण्याला साधारण समुद्रासारख्या लाटा मारीत होत्या. या तलावाच्या बाजू दीड दीड मैलाच्या आहेत. यानें व्यापिलेली जागा सवादोन चौरस मैल आहे.

या तलावाचा सुंदर देखावा पाहून झाल्यावर आम्हीं जवळच असलेला 'फत्तेगड' पहावयाला गेलों. हा किल्ला तलावाच्या उत्तरेच्या टेंकाडावर आहे. किल्ल्याला दोन तट आहेत. आंतल्या तटांत सध्यां जाण्याची परवानगी नाहीं असें कळलें. त्यामुळें पहिल्या तटावरून जेवढा भाग दिसला तेवढाच आम्हीं पाहिला. हा किल्ला भुईकोट आहे. तो भोपाळ संस्थानचा प्रस्थापक दोस्त महंमद यानें बांधला. किल्ला फारसा मोठा किंवा दुर्घट नाहीं.

या तलावाच्याच कांठाला पुष्कळसे जुन्या राजांचे राजवाडे आहेत; पण या इमारती अगदींच सामान्य असल्यामुळें आम्हीं येथें फारसा वेळ न घालवितां मुसलमानी शहरांतील प्रमुख इमारती ज्या मशिदी, त्या पहावयाला गेलों. येथें मशिदी पुष्कळच आहेत; पण त्यांत पहाण्यासारख्या दोनच आहेत. एक 'जुम्मामशीद' व दुसरी 'मोतीमशीद.' दोन्हींचीं कामें चांगलीं आहेत. या प्रांतांत विपुल असलेल्या तांबड्या दगडाच्या या मशिदी आहेत. ज्याप्रमाणें ताजमहालाची लहान प्रतिकृति औरंगाबादच्या मुकाबऱ्यांत दिसून येते त्याप्रमाणें मोतीमशीद ही दिल्लीच्या जुम्मा-

मशीदीची हुबेहुब लहान प्रतिकृति आहे. ही मोतीमशीद लहान, पण सुबक आहे; नक्षीचें काम नाजुक असून कौशल्याचें आहे. तसेंच मशिदींतील खुला चौक प्रमाणबद्ध असल्यामुळें फारच मनोहर दिसतो. एकंदरींत ही इमारत फारच सुंदर आहे, यांत संशय नाहीं. पण दिल्लीच्या मशीदीची भव्यता किंवा प्रचंडता हिच्यांत अर्थात् नाहीं.

या मशिदी पाहून झाल्यावर आम्हीं येथील 'अजबखाना' पहावयाला गेलों. या अजबखान्याची इमारत मनोरेयुक्त अशी मुसलमानी थाटाची आहे. इमारती पुढील बाग सदभिरुचीस पटेल अशीच असल्यामुळें अजबखान्याच्या आवारांत शिरल्याबरोबर अजबखान्याबद्दल प्रथमदर्शनींच अनुकूल ग्रह होतो. हा अजबखाना हरतऱ्हेच्या पुष्कळ प्रेक्षणीय वस्तूंनीं भरलेला आहे. विशेषतः या अजबखान्यांत जुन्या काळच्या निरनिराळ्या हत्यारांचा संग्रह फार चांगला आहे.

याखेरीज शहरांत दुसरें कांहीं फारसें पहाण्यासारखें नाहीं, असें जमादारानें सांगितल्यामुळें आम्हीं थोडेसे शहरांतील बाजारांत चक्कर मारून आमच्या डाकबंगल्यांत परत आलों. शहराबाहेर बेगम बाग पहाण्यासारखा आहे असें मागाहून कळलें. पण आम्हीं भोपाळास फार वेळ न राहिल्यामुळें तिकडे जातां आलें नाहीं.

हल्लींच्या बेगमसाहेबांनीं बांधलेला राजवाडा नवीनच असल्यामुळें पहावयाची फार इच्छा होती, ह्मणून, व शिपाई–जमादारापेक्षां खानबहादुर पोलीस इनस्पेक्टर जनरल भेटले तर त्यांच्याकडून आणखी कांहीं प्रेक्षणीय स्थळांची माहिती मिळेल या आशेनें, आह्मीं खानबहादुरसाहेबांना आमची इच्छा कळवून भेट देण्याबद्दल विनंति केली; पण बेगमसाहेब येथेंच असल्यामुळें राजवाडा पहावयाला मिळणार नाहीं, व कामामुळें मला भेटण्याला सवड नाहीं, असें खानबहादुरांकडून उत्तर आलें. यामुळें आमची थोडी निराशा झाली, व आतां येथें जास्त वेळ रहाण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून आम्हीं दोनप्रहरच्या गाडीनें पुढल्या मुक्कामाला जाण्याचा बेत केला, व हें आमच्या हिताचेंच झालें. कारण, या डाकबंगल्यांत रहाणें म्हणजे आमच्यासारख्या मध्यम स्थितीच्या माणसांच्या

आहाराबाहेरचें आहे, असें आमच्या अनुभवाला येऊं लागलें. आम्हांला सरकारी गाडी मिळाली होती, तींतून परत आल्यावर प्रवाशांच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें आम्हीं गाडी हांकणाराला आठ आणे बक्षिसी देऊं लागलों, तोंच त्या हाकणारानें ते पैसे रागानें फेंकून दिले, व तो म्हणाला "येथें येणारे पाहुणे आम्हांला रुपयाच्या खालीं कधींच बक्षिसी देत नाहींत!" अर्थात् हांकणाराला आम्हांला एक रुपया द्यावा लागला. पण तेवढ्यानेंच भागलें नाहीं! गाडीच्या मागें उभा राहणारा मनुष्य निराळी बक्षिसी मागूं लागला. आम्हीं विचार केला, कीं, भाड्याच्या गाडीला दोन-अडीच रुपये पडलेच असते; ह्मणून त्या माणसालाहि आम्हीं आठ आणे दिले, व या सरकारी गाडीची पाठवणी केली, आणि 'आम्हीं दोन प्रहरच्याच गाडीनें जाणार,' असें खानसाम्याला सांगितलें. त्यानें त्या वेळेच्या आधीं चहा वगैरे तयार करून दिला, व आमच्या सामानाकरितां हमाल पाहून आणला. 'डाकबंगल्यांत रहाण्याबद्दल काय द्यावयाचें या-संबंधीं कांहीं दराचें पुस्तक असल्यास दाखव म्हणजे त्याप्रमाणें आम्हीं बिल चुकतें करतों,' म्हणून आम्हीं त्याला सांगितलें; पण तो 'माझ्या-जवळ पुस्तक नाहीं,' असें ह्मणूं लागला. तेव्हां 'स्टेशनवर खानसाहेब येणार आहेत, त्यांना विचारून पैसे देतों,' असें सांगून आम्हीं स्टेशनावर आलों. आह्मांला खानसाहेबांकडून जें उत्तर आलें होतें त्यांत 'मी आप-णाला स्टेशनवर भेटतों,' ह्मणून त्यांनीं लिहिलें होतें. तेव्हां आम्हीं त्यांची गाडी येईपर्यंत वाट पाहिली. इकडे खानसामा पैशांकरितां तगादा करूं लागला. तेव्हां शेवटीं काय द्यावयाचें तें त्याला विचारतां तो म्हणाला, "माणशीं चार रुपये."

हें बिल ऐकून आमचें धाबें दणाणलें! यूरोपियन प्रवाशांच्या खोलीच्या शेजारीं जागा मिळाल्याचा आमचा सर्व आनंद मावळला! यासंबंधांत तो खानसामा आम्हांला फसवीत आहे, अशी आमची खात्री झाली; पण शेवटीं त्याला पांच रुपये देऊन (हा आमच्या दोघांचा अर्ध्या दिवसाचा चार्ज ह्मणून) आम्हीं डाकबंगल्यांत उतरावयाला गेल्याबद्दल कानाला खडा

लावून घेतला, व पुन्हां असल्या फंदांत पडावयाचें नाहीं असा निश्चय करून गाडींत जाऊन बसलों.

आतां भोपाळ संस्थानच्या उत्पत्तीचें व इतिहासाचें थोडेसें दिग्दर्शन करून हा लेख संपवितों.

भोपाळ हें मुसलमानी संस्थान शिंदे, होळकर, पवार, नागपूरकर भोसले इत्यादि मराठी सरदारांनीं मराठामय केलेल्या मध्यहिंदुस्थानांत तुळशींत भांगेप्रमाणें (किंवा सब्जाप्रमाणें असें म्हणणें अधिक बरें. कारण, हिंदूस ज्याप्रमाणें तुळस, त्याचप्रमाणें मुसलमानांस सब्जा हा पवित्र वाटतो.) उदयास आलेलें दिसतें. पण मराठ्यांइतक्याच शूर धाडशी व पराक्रमी अशा एका मुसलमान सरदाराच्या कर्तृत्वाचें तें संस्थान दृश्यफल होय. भोपाळ संस्थानचा प्रस्थापक दोस्त महंमद हा औरंगझेब बादशहाच्या अर्धशतकाच्या लांब कारकीर्दींतील शेवटच्या अंदाधुंदीच्या व गडबडीच्या काळांत अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानांत येऊन त्यानें दिल्लीस लष्करीपेशा पत्करला. ज्याप्रमाणें मारवाडांतील मारवाडी आपला लोटा, रशी, मारवाडी कावा व मारवाडी काटकसर इतक्या पुंजीवर पांचपंचवीस वर्षांत लक्ष्मीपति बनतो, त्याप्रमाणेंच दोस्त महंमद आपली ढाल, तरवार, काबुली धाडस व काबुली धोरण इतक्या सामुग्रीवर पंचवीस तीस वर्षांत भोपाळचा भूपति बनला. लष्करी पेशांत कांहीं काळ काढल्यावर दोस्त महंमदानें एका जिल्ह्याचा कारभार एका जमीनदाराकडून आपल्या हातीं घेतला व हळू हळू त्या भागाचा तो मालक झाला. त्यानें रजपूत राजांच्या भांडणांत शिरून मुलुख मिळविण्याचा सपाटा चालविला. प्रथमतः त्यानें इसलामपूर (भोपाळपासून सहा मैलांवर असलेलें गांव) आपलें ठाणें केलें. तेथून त्यानें भिलशाच्या ठाणेदारावर हल्ला करून त्याचा मुलुख काबीज केला. सन १७२० मध्यें दोस्त महंमदाचें व हैदराबादच्या निजामाचें वैमनस्य आलें. पण लवकरच त्यानें यार महंमद नांवाच्या आपल्या अनौरस पुत्रास ओलीस ठेवून निजामशीं सख्य करून घेतलें. सन १७२२ मध्यें त्यानें भोपाळ हें आपल्या राजधानीचें ठिकाण ठरवून त्याच्या संरक्षणार्थ त्यानें फत्तेगड हा किल्ला बांधविला व तो आपल्याला नबाब म्हणवूं लागला. १७२३ मध्यें

दोस्त महंमद वारला. पण त्यानें पंचवीस वर्षांत वीसपंचवीस लाखांचें संस्थान निर्माण केलें. त्याच्या मरणानंतर त्याचा औरस पण अज्ञान पुत्र महमदखान गादीवर आला. पण हैदराबादेहून सुटून आल्यावर यार महंमद यानें गादी बळकावली. याच सुमारास बाजीराव पेशवे यांनीं उत्तरहिंदुस्थानावर स्वारी केली. त्या स्वारींत भोपाळचा अर्धा अधिक भाग बाजीरावानें काबीज केला. यार महंमदामध्यें बापाचे गुण नव्हते व त्याचे कारकीर्दीत संस्थान संपुष्टांत आलें होतें. पण यार महंमद १७५४ मध्यें वारल्यावर त्याची मामुल्ला ह्मणून एक बायको होती, तिनें संस्थानचा सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. ही बाई फार धोरणी, हुषार व दयाळू स्वभावाची होती. तिला माजीसाहेब असें म्हणत असत. कित्येक ग्रंथकारांनीं तिची अहिल्याबाईशीं तुलना केलेली आहे व ती यथार्थही आहे. तिच्या देखरेखीखालीं भोपाळ संस्थान सुमारें पन्नास वर्षें होतें.

यार महंमदाचे मुलगे फैज महंमद, याशीन महंमद व हयात महंमद असे होते. ते तिघेही एकामागून एक गादीवर आले. पण ते कारभारांत लक्ष घालीत नसत. सर्व कारभार मामुल्लाच्या देखरेखीखालीं प्रधानामार्फत चाले. यांपैकीं छोटेखान प्रधान फार कर्तबगार होता. १७७८ मध्यें कर्नल गाडर्ड हा बंगाल्याहून मुंबईस येत असतां त्याला भोपाळच्या गादीनें दाणागल्याची व इतर सामानाची फार मदत केली; तेव्हांपासून इंग्रज सरकार व भोपाळ संस्थान यांचें सख्य सुरू झालें व त्यामुळेंच भोपाळ संस्थान हें आजतागायत टिकलें. कारण नागपुरकर भोसले व शिंदे यांच्या मुलखाच्या दरम्यान हें संस्थान असल्यामुळें त्या दोघांनीं त्याचा नायनाट करण्याचा घाट घातला होता. पण दोस्त महंमदाच्या वंशांतील वजीरखान नांवाच्या प्रधानाच्या शौर्यानें संस्थान वांचलें. भोपाळ शहराला नऊ महिने वेढा पडला असतां वजीरखानानें मोठ्या धैर्यानें शहराचें संरक्षण केलें त्यामुळें व शिंद्याच्याच मुलखांत गडबड सुरू झाल्यानें त्यांना भोपाळचा वेढा उठवावा लागला. यानंतर लवकरच भोपाळचा अधिपति नाझर महंमद यानें सन १८१७ मध्यें इंग्रज सरकारशीं कायमचा तह केला, व पेंढाऱ्यांची पीडा काढून टाकण्यांत इंग्रजांस मदत केली. नाझर महंमदास मुलगा नव्हता.

शिकंदर या नांवाची एक मुलगी होती, ही गादीवर आली आणि नाझरची बायको कुडशिया ही कारभार पाहूं लागली. कुडशिया बेगम ही बाई भोपाळच्या माजीसाहेबाप्रमाणेंच फार धोरणी व हुषार होती; परंतु फार महत्त्वाकांक्षी होती. तिला सर्व कारभार आपल्या हातांत पाहिजे होता. आपली मुलगी शिकंदर बेगम किंवा तिचा नवरा यांचेकडे तो अधिकार जाऊं नये, असें तिला वाटे. पण शिकंदर बेगम मोठी झाल्यावर तिनें आपल्या आईकडून कारभार काढून स्वतःच्या हातीं घेतला. हिनें आपल्या कारकीर्दींत भोपाळची अंतर्व्यवस्था उत्तम लाविली. ही बेगम १८५७ चे बंडांत इंग्रज सरकारच्या फार उपयोगी पडली. ह्मणून बंडांत खालसा केलेला भैरसिया प्रांत इंग्रज सरकारनें शिकंदर बेगमेस दिला व तिचा मोठा बहुमान केला. शिकंदर बेगम सन १८६८ मध्यें मरण पावली, व तिच्या मागून तिची एकुलती एक मुलगी शहाजहान बेगम गादीवर आली. हिनेंहि आपल्या आईप्रमाणेंच संस्थानचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालविला. ती सन १९०१ मध्यें वारली व हल्लींच्या नवाब सुल्तान शहान बेगमसाहेब यांना संस्थानचा अधिकार मिळाला. या बेगमसाहेब चांगल्या सुशिक्षित असून त्यांनीं संस्थानांत शिक्षणादि बाबतींत फार सुधारणा घडवून आणलेल्या आहेत.

वर सारांशानें दिलेल्या भोपाळ संस्थानच्या इतिहासांत एक विलक्षण गोष्ट दिसून येते ती ही कीं, या संस्थानच्या शेंदोनशें वर्षांच्या काळांत पांच उत्तम मुत्सद्दी, धोरणी, राजकार्यधुरंधर अशा बायका उदयास आल्या व त्यांनीं संस्थानाची भरभराट करून दाखविली. बायकांच्या कर्तबगारीचें, त्यांच्या बुद्धिमत्तेचें व त्यांना प्रसंग आणि संधि मिळाल्यास त्यांच्या हातून काय होईल, याचें जर प्रमाण द्यावयाचें असेल, तर भोपाळ संस्थानच्या इतिहासाकडे बोट दाखविलें म्हणजे पुरे.



२

# साची-भिलसा-उदयगिरी.

ज्याप्रमाणें भोपाळला आम्ही आमच्या स्नेह्यामार्फत तजवीज केली होती, त्याप्रमाणेंच भिलासा येथेंही आम्ही तेथल्या सरसुभ्यांना ओळखीचें एक पत्र घेतलें होतें. भोपाळहून तावडतोब निघण्याचा बेत झाल्यामुळें मी सरसुभेसाहेबांना आमच्या निघण्याबद्दल तार केली, आणि दोन तासांनीं म्हणजे दिवसा चारांच्या सुमारास आम्ही भोपाळहून निघालों.

भोपाळपासून भिलसा हा सुमारें दोन तासांचाच रस्ता आहे. अर्थात आम्हीं भिलासा स्टेशनावर दिवसा उजेडींच आलों. स्टेशनवर सरसुभेसाहेबांचा माणूस आला असावा, अशी माझी अटकळ होती; पण तेथें आमची कोणी विचारपूस केली नाहीं. तेव्हां 'येथें कोठें सराई किंवा धर्मशाळा आहे किंवा काय,' ह्मणून स्टेशनमास्तरजवळ चौकशी करूं लागलों व माझे बंधु सामान आणण्याच्या तजविजीला लागले.

इतक्यांत गाडीहि पुढें निघून गेली, व एका गृहस्थांनीं माझ्या बंधूंना 'आपण भाटे का?' ह्मणून हटकलें.

त्यांनीं 'होय' असें उत्तर देतांच ते गृहस्थ ह्मणाले, "सरसुभेसाहेबांना आपली आलेली तार त्यांनीं मला आतांच दिली. ते कांहीं कामाकरितां लष्करला जात आहेत. ह्मणून आपली सर्व सोय करण्यास त्यांनीं मला सांगितलें आहे, तरी आपण चलावें."

त्यांच्या या भाषणानें आमची उतरण्याची काळजी दूर झाली. हमालाच्या डोक्यावर सामान देऊन त्या गृहस्थांबरोबर आम्ही त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. असो.

भिलसा हें ग्वाल्हेरसरकारचें जिल्ह्याचें ठिकाण आहे. गांवापासून दूर व रेलवेलाईनच्या पलीकडे सरसुभ्याची कचेरी व इतर सरकारी कचेऱ्या आहेत. अंमलदारांना राहण्याकरितां तिकडेच बंगले आहेत. अर्थात् आह्मी अशा एका बंगल्यांत गेलों.

ज्या गृहस्थांनीं आह्मांला आपल्याबरोबर नेलें, त्यांनीं आमची तजवीज उत्तम ठेविली होती. आमचा बराच वेळ इकडल्या तिकडल्या गप्पा मारण्यांत गेला. हे गृहस्थ बरेच बोलके असल्यामुळें साहजिकच त्यांनीं आपल्या घराण्याची हकीकत आह्मांला सांगितली. हे गृहस्थ ग्वाल्हेरच्या प्रसिद्ध आपटे नांवाच्या सरदार घराण्यापैकीं होते. हे स्वतः एल्. एल्. बी. उपपदधारी होते; व त्यांनीं ग्वाल्हेर संस्थानांत बरींच वर्षें नोकरी केली होती. भिलशाला त्यांची बदली नुकतीच झाली असल्यामुळें त्यांना या भागाची फारशी माहिती नव्हती. त्या गृहस्थांच्या बोलण्यावरून या सरदार घराण्यावर शिंदे सरकारची फार मेहेरनजर दिसली. या घराण्यांत दुसऱ्या बाजीरावाची मुलगी दिलेली असून ती फार वर्षें जगली होती असें आम्हांस कळलें.

गप्पागोष्टी झाल्यावर आमचें जेवणखाण आटोपलें व रात्रीची विश्रांति घेण्याकरितां आम्ही निद्रादेवीची आराधना करूं लागलों, आणि तीहि आमच्या सबंध दिवसाच्या श्रमांमुळें आमच्यावर ताबडतोब प्रसन्न झाली, हें सांगावयाला नकोच.

रात्रींच्या बोलण्यांत आमचें असें ठरलें होतें, कीं, पहांटेला उठून साची—हें भिलशापासून पांचसात मैल असून भिलशाअलीकडचेंच पहिलें स्टेशन आहे—पाहून येऊन चारांच्या गाडीनें परत फिरावें. आपटेसाहेबांनीं आपला एक शिपाई आमच्याबरोबर दिला होता. साची गांवांत जमल्यास व वेळ असल्यास स्वयंपाक करतां यावा म्हणून आम्ही आपला कुकर व स्टव्ह घेतला होता; जेवण करण्याचें न जमल्यास निदान त्या गांवांत दूध मिळवून स्टव्हवर चहा करून वेळ भागवून न्यावी असें आम्ही मनांत ठरविलें होतें, व म्हणून आपटेसाहेबांचे घरून फराळाचें घेण्याचे भानगडींत आम्ही पडलों नाहीं.

ठरल्याप्रमाणें आम्ही पहांटेला उठलों, व स्टेशनवर आलों. सुमारें अर्ध्या तासाच्या आंत गाडी स्टेशनवर आली, व आम्ही गाडींत बसलों. बसल्यापासून वीसपंचवीस मिनिटांत साची स्टेशनवर उतरलों. स्टेशनमास्तर तेव्हां तेथें नव्हते. कारकुनाजवळ चवकशी करतां साचीची टेकडी फारच जवळ आहे, व थोड्याच वेळांत जाऊन परत येतां येईल, असें समजलें. आमची हँडबॅग व कुकर स्टेशनमास्तरच्या खोलींत ठेवण्याची परवानगी मिळवून, व तें सामान तेथें ठेवून आम्ही वाट चालूं लागलों.

स्टेशनांतून बाहेर आल्यावर लवकरच साचीस येणाऱ्या युरोपियन प्रवाशांच्या सोयीसाठीं बांधलेला सरकारी डाकबंगला उजव्या बाजूस लागतो. हा सर्व भाग बराच हिरवागार आहे. सभोंवार लहानलहान टेकड्या आणि त्यांवर भुरटें रान अशी या भागाची ठेवण आहे. साची टेकडीहि फारशी मोठी नाहीं. आम्हांला ती पुण्याच्या पर्वतीच्या टेकडीपेक्षांहि लहान वाटली.

थोड्याच वेळांत आम्ही ही लहानशी टेकडी चढूं लागलों. येथपर्यंत फक्त पायवाट होती. इतकें चढल्यावर आपल्याला समोरच साची गांव दिसूं लागतें व उजव्या हाताला एक लहानसा तलाव लागतो. येथें रस्ता उजव्या बाजूस वळतो व वळल्यापासून रस्ता पायऱ्या बांधून केलेला आहे. कांहीं पायऱ्या खडकांतच खोदलेल्या होत्या, व कांहीं तेथें विपुल असलेल्या तांबड्या दगडाच्या होत्या. टेकडीच्या माथ्याजवळ आम्ही जाऊं लागलों, तेव्हां त्या सर्व पठारासभोंवतीं सारखा तट आहे असें दिसून आलें. तटाच्या दारांतून आंत प्रवेश केल्याबरोबर जिकडे तिकडे स्तूप, विहार, मंदिरें, उंच खांब, पडक्या इमारती व त्यांचे अवशेष इत्यादि वास्तुकलेचे मासले एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर झाले. या पठारावर एकावर एक अशा मजग्या आहेत. या पठारावर एकंदर लहान मोठ्या मिळून पन्नासांवर प्रेक्षणीय इमारती आहेत. त्या सर्व सावकाशपणें पाहणें आम्हांला शक्य नव्हतें. जे मुख्यमुख्य वास्तुकलेचे मासले आम्ही पाहिले त्यांचें थोडक्यांत यथाक्रम वर्णन करूं. अर्थात् पहिली पहावयाची वस्तु म्हणजे साचीचा स्तूप. तटांतून आंत शिरल्यावर हाच स्तूप प्रथमतः दृष्टि आकर्षून घेतो.

पहातां पहातां आम्ही त्या स्तूपाच्या एका तोरणाजवळ आलों. हीं तोरणें चार दिशांना चार आहेत, व या तोरणांची मौज ही आहे, कीं, हीं पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या खऱ्या दिशा साधून बरोबर बांधलेलीं आहेत. हीं तोरणें ह्मणजे स्तूपाला जमिनीवरून घालावयाच्या प्रदक्षिणा-मार्गाच्या सभोंवतालच्या कठड्याच्या आंत प्रवेश करण्याचीं प्रवेश-द्वारेंच होत. हीं पोरबंदरी दगडासारख्या पांढऱ्या दगडांचीं बनविलेलीं आहेत. हे दगड उदयगिरीवर व आसपास पुष्कळ आहेत. स्तूप साचीला सांपडणाऱ्या तांबड्या दगडांनीं बनविलेला आहे. तोरण दोन चौरस खांबांचें केलेलें असून त्यांमध्यें सुमारें सात फूट अंतर आहे, व खांब बारा फूट उंच आहेत. खांबांवर चार फूट उंचीचें चौरस दगडाचें उथाळें आहे, व त्यावर चार बाजूंना निरनिराळ्या प्राण्यांचीं चित्रें आहेत. दोन तोर-णांच्या खांबांवर हत्तींचीं चित्रें आहेत, तिसऱ्यावर सिंहाचीं चित्रें आहेत, व चवथ्यावर खुज्या माणसांचीं चित्रें आहेत. या मूर्ति फार हुबेहुब आहेत. त्यांचें कोरींव काम दोन हजार वर्षांनंतरसुद्धां अगदीं रेखलेलें दिसतें. या उथाळ्यांवर दगडाचीं आडवीं बहालें टाकून एकावर एक असे तीन मजले केले आहेत. खांबांच्या बाजूंवर व तोरणांच्या बहालांवर जिकडे तिकडे इतकीं चित्रें, लेख व इतर कमळांसारखें सौंदर्यपोषक खोदीव काम केलें आहे, कीं, हीं चार तोरणें ह्मणजे साची येथील एक अपूर्व देखावा आहे; इतकेंच नाहीं, तर सर्व हिंदुस्तानांत इतकें खोदीव काम केलेलीं प्रवेशद्वारें फारच थोड्या ठिकाणीं असतील.

मनुष्याला थक्क करून टाकणाऱ्या या प्रवेशद्वारांतून आंत गेल्याबरोबर बुद्धाची, व त्याच्या मुख्य शिष्यांच्या प्रशांत व सत्त्वधीर मूर्ति दृग्गोचर होतात. या मूर्तींना नमस्कार करून मनुष्य स्तूपाच्या चबुतऱ्यावर दगडी जिन्यानें चढूं लागतो. हा चबुतरा चौदा फूट उंच आहे, व सुमारें पांच फूट सोडून स्तूपाचा घुमट सुरू होतो. या चबुतऱ्यांवरील पांच फुटांच्या वाटेनें स्तूपाला प्रदक्षिणा करतां येते. बुद्धाच्या अवशेषाची पूजा करणाऱ्या लोकांना प्रदक्षिणा घालण्याकरितां ही वाट ठेवलेली आहे. या वाटेनें चाललें म्हणजे स्तूपाच्या रचनेची चांगली कल्पना होते.

या स्तूपाच्या मध्यभागीं दगडी पेटींत बुद्ध व त्याचे मुख्य शिष्य यांचे सांपडलेले दांत आणि शरीराच्या हाडांचे भाग किंवा त्यांच्या शरीरांची राख वगैरे स्मारकें ठेवण्याची चाल असे, व त्यावर मातीचा अर्धवर्तुलाकार घुमट करून त्यावर दगडी भिंत घालीत, आणि त्यावर चुन्याचा गिलावा करीत. स्तूपाचा बराच गिलावा आतां पडून गेला आहे, व पुष्कळ ठिकाणीं नव्या दगडांनीं घुमटाचा भाग भरून काढला आहे. पण दोन हजार वर्षें पाऊस, थंडी, वारा आणि उष्णता वगैरे नाशक कारणांना न जुमानतां हा चुन्याचा पातळ गिलावा राहिला कसा, याचें आह्मांला राहून राहून आश्चर्य वाटत होतें, व त्या काळच्या कलांच्या आणि ज्ञानाच्या प्रगतीचें अभिमानपूर्वक कौतुक वाटत होतें.

सर्व स्तूपाच्या भोंवतीं दोन फेऱ्या घालून आम्ही खालीं उतरलों, व बौद्ध लोकांच्या वास्तुकलेचा अपूर्व मासला जो सुंदर कठडा, व तोरणें हीं बारकाईनें पाहूं लागलों. हा कठडा सुंदर पांढऱ्या दगडांचा केलेला आहे. या कठड्याचे खांब अष्टपैलू असून सुमारें दहा फूट उंच व दोन फूट जाड आहेत, व ते अडीच अडीच फुटांच्या अंतरानें बसविलेले आहेत. स्तूपासभोंवारचा हा कठडा लंबवर्तुलाकार केलेला आहे. या खांबांच्यावर कलाकुसरीचें उत्तम काम केलेलें आहे. खांबांच्या मधल्या अंतरामध्यें तीन तीन लंबवर्तुलाकार दोन दोन फुटांचे दगड या खांबांत तशाच खोबण्या करून त्यांत बसवून दिले आहेत; व खांबांच्या माथ्यावर तीन तीन खांबांवर एक अशीं दगडाचीं वहालें घातलेलीं आहेत. हा कठडा प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या सौंदर्याची कल्पना होणें शक्यच नाहीं.

अशा तऱ्हेचे सुंदर कठडे व तोरणें आम्ही आजपर्यंत पाहिलीं नसल्यामुळें आह्मांला तीं पाहून फारच आश्चर्य वाटलें. आम्ही बुद्धाच्या अनुयायांनीं बांधलेलीं दक्षिणेंतील पुष्कळ लेणीं पाहिलीं होतीं. त्यांवरून बौद्धाच्या वास्तुकलेची व मूर्तिकलेची चांगली कल्पना आम्हांला होती; पण तीं लेणीं खडकांत खोदलेलीं असल्यामुळें कठडा व तोरणें यांचा त्यांत मासला आलेला नव्हता; पण साची येथील बौद्धधर्मीयांच्या इमारती सपाट पठारावर बांधलेल्या आहेत, व त्यांत हा कठडा व तोरणें म्हणजे

एक अद्वितीय चीज होय. तोरणाच्या व कठड्याच्या पुष्कळ खांबांवर मूर्तिचित्रें व लेख कोरलेले आहेत.

या खांबावर व इतर दगडांवर जीं चित्रें खोदलीं आहेत त्यांचे एकंदर पांच वर्ग करितां येतील. पहिल्या वर्गांत गौतमबुद्धाच्या आयुष्यांतील प्रसंगाचीं व अशोकाच्या कारकीर्दींतील गोष्टीचीं चित्रें येतात. बुद्धाच्या जन्माचें चित्र म्हणजे बुद्धाची आई माया ही कमलावर बसलेली व तिच्या दोन्ही बाजूंला दोन हत्ती जणूकांहीं नूतन जन्मलेल्या बालकावर अभिषेक करीत आहेत असा देखावा आहे. बुद्धगया येथील अश्वत्थवृक्षाखालीं बसलेला असतांना बुद्धाला पूर्ण बोध झाला. या प्रसंगाचें निदर्शक चित्र साची येथें पिंपळाच्या वृक्षाखालीं सिंहासन काढून केलेलें आहे. बुद्धानें वाराणाशी येथें प्रथमतः आपल्या धर्माचा उपदेश मृगवनांत केला. या उपदेशाचें विशिष्ट नांव धर्मचक्रप्रवर्तन असें होतें. यावरून चक्र हें बुद्ध-धर्माची मोठी खूण झाली. सिंहासनावर बसविलेल्या धर्मचक्राचीं पुष्कळ चित्रें साचीच्या खांबांवर आहेत. बुद्धाच्या आयुष्यांतील शेवटला प्रसंग म्हणजे त्याच्या महानिर्वाणाचा.याचें निदर्शन स्तूपाच्या चित्रांनीं केलेलें आहे.

सांचीच्या कामांत दिसून येणाऱ्या खोदीव चित्राचा दुसरा वर्ग म्हणजे यक्षयक्षीणींचीं चित्रें होत. या चित्रांचें कामही उच्च दर्जाचें आहे. तिसरा वर्ग प्राणी चित्रांचा होय. खऱ्या व काल्पनिक प्राण्यांचीं चित्रें पुष्कळच आहेत. त्यांतील खऱ्या प्राण्यांचीं चित्रें फार हुबेहुब आहेत. विशेषतः सिंह व हत्ती या जनावरांचीं चित्रें फार उत्तम साधलेलीं आहेत. चित्रांचा चवथा वर्ग म्हणजे वृक्ष पानें फुलें इत्यादि वनस्पतिसृष्टींतील वस्तूंच्या चित्रांचा होय. साची येथील चित्रांत हीं चित्रें फारच उच्च दर्जाचीं आहेत व त्यांची विविधताही वाखाणण्यासारखी आहे. त्यांतल्यात्यांत द्राक्षांच्या वेलांचीं चित्रें निरनिराळ्या जातीच्या कमळांचीं चित्रें व त्यांचीं पानें व वेली यांचीं खोदीव चित्रें फारच सुबक साधलेलीं आहेत. या लतावेलां-वर व वृक्षांवर मधून मधून मनुष्यें बसलेलीं दाखविलीं आहेत. या जातीं-च्या चित्रांचा उत्तम मासला पश्चिमद्वाराच्या उजव्या खांबावर आहे. हें खोदीव काम हिंदूमूर्तिकलेच्या उच्च दर्जाची उत्तम साक्ष पटवील असें

१८०८

आहे. पांचव्या वर्गात जातककथांचीं चित्रें येतात. येथील तोरणाच्या खांबावर व बहालावर अशा किती तरी कथा खोदीव मूर्तींच्या योगें कथन केल्या आहेत. कांहीं कांहीं कथांचे दोनदोन भिन्नभिन्न चित्रपट आहेत. उदाहरणाकरितां च्छदंत जातक घेऊं. या कथेचा चित्रपट दक्षिण तोरणाच्या मधल्या बहालावर आहे व पश्चिम तोरणाच्या खालच्या बहालावर आहेत. दोन्हीही चित्रपट मूर्तिकलेचे उत्तम मासले आहेत. पण दक्षिण तोरणावरील चित्रपटांत कारागिराची जास्त प्रतिभा व कल्पकता दिसून येते; तर पश्चिम तोरणावरील चित्रपटांत जास्त कौशल्य व सफाई दिसून येते. जातककथा थोडक्यांत अशी आहे.

बोधिसत्वानें ( पूर्वजन्मांतील बुद्ध ) एकदां हत्तीच्या कळपाचा राजा या रूपानें जन्म घेतला. त्या राजहत्तीला सहा दांत होते व त्याची उंची ही प्रचंड होती. तो हिमालयांतील च्छदंत नांवाच्या सरोवरानजीक एका वडाच्या झाडाखालीं रहात असे. त्याला च्छूलसुभद्रा व महासुभद्रा या नांवाच्या दोन बायका होत्या. च्छूलसुभद्रा महासुभद्रेचा हेवा करूं लागली. व तिनें आपला पुनर्जन्म होऊन आपण वाराणशीच्या राजाची पट्टराणी व्हावें म्हणजे आपल्या हल्लींच्या पतीला मारून महासुभद्रेचा सूड घ्यावयास सांपडेल अशी देवाची प्रार्थना केली. तदनुरूप ती वाराणशीच्या राजाची पट्टराणी झाली. नंतर तिनें आपल्या राज्यांतील सर्व शिकारी लोक बोलाविले व त्यांपैकीं सोनुत्तर नांवाच्या शिकाऱ्याला पसंत करून त्याला षड्दंत राजहत्तीला मारण्याकरितां च्छदंत सरोवराकडे पाठविलें.

राजहत्ती आपल्या कळपासह चालला आहे. राजहत्तीवर इतर हत्तींनीं छत्री व चौरी धरलेली आहे व खडकाआड लपलेला सोनुत्तर बाण मारण्याची तयारी करीत आहे असा या चित्रपटावर देखावा आहे. वडाचें झाड, कमलामधून चाललेला हत्तींचा कळप वगैरे देखावा फार सफाईनें खोदलेला दिसतो.

स्तूप व त्या सभोंवारचा कठडा व तोरणें पाहून झाल्यावर आम्हीं दक्षिण प्रवेशद्वाराजवळ असलेला मोठ्या स्तंभाचा अवशेष पाहिला. हा स्तंभ अशोकानें आपल्या धर्माच्या आज्ञा त्यावर खोदून उभारलेला होता.

स्तंभ मोडलेला आहे पण त्याचे मोडके तुकडे शेजारींच पडलेले आहेत. सबंध असतांना तो बेचाळीस फूट उंच होता व त्याच्या माथ्यावर पाठीला पाठ लावून चार सिंहाचीं चित्रें होतीं. हीं मोडकीं चित्रें शेजारच्याच एका देवळाजवळ पडलेली आहेत. मुख्य स्तूपाच्या तोरणाजवळ व त्याच्या आसपास पडकीं देवळें दृग्गोचर होतात व बुद्ध भिक्षूंना राहण्याकरितां बांधलेले पडके विहार दृष्टीस पडतात.

हा स्तूप गौतमबुद्धाच्या निधनानंतर लवकरच बांधलेला असावा, असें त्यांतील शिलालेखांवरून ठरविण्यांत आलेलें आहे. या स्तूपांत गौतमबुद्धाच्या पट्टशिष्यांचीं स्मारकें सांपडलीं आहेत, त्यांवरून या स्तूपाचें प्राचीनत्व दिसून येतें. या स्तूपासभोंवारचा सुंदर कठडा व तीं सुंदर तोरणें हीं मात्र मागून बांधलेलीं असावीं, असेंहि शिलालेखांवरून शाबीद झालेलें आहे. या प्रचंड स्तूपाच्या चारहि बाजूंना लहान लहान आणखी चार स्तूप होते; पण आतां ते पार पडलेले आहेत. त्यांच्या ऐवजीं नव्या दगडांनीं बनविलेला एक नवा स्तूप दिसत होता. यावरून पूर्वीं घुमटा-वरहि एक कठडा असून वर एक छत्रीसारखें दगडी छत्र होतें, असें दिसतें.

या स्तूपाच्या आसपास किती तरी मोडलेल्या खांबांचे तुकडे, कठड्याचे तुकडे, फुटलेल्या मूर्ति वगैरे हजारों वास्तुकलेच्या चिजा पडलेल्या आहेत. या स्तूपाच्या शेजारींच एक दगडी देऊळ आहे. हें बुद्धधर्माच्या ऱ्हासानंतर हिंदुराजांनीं बांधलेलें ओह. बुद्धकालाच्या चैत्यविहाराचा सभामंडप मोडक्या स्थितींत पडलेला आहे. या मंडपाचे प्रचंड खांब पाहून मन थक्क झाल्याखेरीज रहात नाहीं. खांबाचा एक एक दगड बारा बारा फूट लांबीचा आहे.

साचीच्या टेंकडीवर सारखा पठार आहे, व या सर्व पठारभर जिकडे तिकडे इमारतींचे अवशेष जागोजाग दृष्टीस पडतात. यावरून या ठिकाणीं पुष्कळ वसती असली पाहिजे, असें अनुमान करतां येतें. या पठाराच्या बरेंच खालीं उतरल्यावर आणखी एक स्तूप लागतो. हा स्तूपहि बराच पुरातन असून त्याचें कामहि मुख्य स्तूपासारखें आहे. पण त्याला प्रवेश-

द्वाराचीं तोरणें नाहींत, व याचा आकारहि वरच्या स्तूपापेक्षां थोडा लहान आहे.

ह्या स्तूप पाहून आम्हीं पुनः वर टेंकडीवर आलों, व सांची टेंकडी-वरील बौद्धधर्मीयांच्या वास्तुकलेच्या त्या प्रचंड स्मारकांकडे पुनः एकदां दृष्टि फेंकून आम्हीं आल्या वाटेनें परतलों.

आतां सुमारें दहा वाजले होते. स्टेशनवर आलों तेव्हां स्टेशनमास्तर आम्हांला भेटले. त्यांनीं आमची विचारपूस केली, व '**मनोरंजनां**'तील प्रवासवृत्त लिहिणारे या नात्यानें माझी ओळख त्यांना पटली. मास्तरसाहेब स्टेशनावर रहाणाऱ्या नेहमींच्या मास्तरांसारखे नव्हते. त्यांनीं आह्मांला जेवून जाण्याचा आग्रह केला, व या आग्रहाचें पूर्वचिन्ह ह्मणून गरम चहा आमच्याकरितां आपल्या घरून आणविला. आम्हींहि भुकेनें व्याकुळ झालेले होतों, तेव्हां फारसे आढेवेढे न घेतां त्यांचा पाहुणचार स्वीकारण्याचें आम्हीं कबूल केलें, व जवळच असलेल्या विहिरीवर स्नानें करून मास्तरसाहेबांच्या बिऱ्हाडीं भोजनाला गेलों.

भोजन झाल्यावर आम्हीं परत स्टेशनवर आलों, तों बारांचा सुमार झाला होता. गाडी चार वाजतां होती. आतां येथें बसून काय करावयाचें, असा विचार करून 'एकादी मालगाडी किंवा रोडव्हॅान आली, तर आमची भिलशाला रवानगी करा,' अशी आम्हीं मास्तरसाहेबांना विनंति केली, व ती त्यांनींहि कबूल केली. आम्हीं रोडव्हॅननें भिलशाला सुमारें एक वाजतां परत आलों.

आतां या ठिकाणीं सांचीच्या इतिहासाकडे थोडी नजर देणें वावगें होणार नाहीं. त्यायोगें सांचीच्या वस्तुकलेच्या उदयावर प्रकाश पडेल. या इतिहासाचे तीन भाग होतात.

पहिला भाग अशोकापासून दुसऱ्या चंद्रगुप्तानें क्षत्रपअंमलाचा नायनाट करीपर्यंतचा म्हणजे सन ४०० पर्यंतचा. दुसरा गुप्ताच्या अंमलापासून हर्षाच्या कारकीर्दीपर्यंतचा व तिसरा मुसलमानांच्या आगमनापर्यंतचा.

सांचीचें जुनें नांव काकनाद होतें असें शिलालेखावरून दिसतें; पण तें वाङ्मयांत आलेलें नाहीं. पण बुद्धवाङ्मयांत सांची हें चेतीयगिरि या

नांवानें ओळखलें जात असें. सिलोनमधील बुद्धधर्मीय इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, अशोक हा युवराज असतांना उज्जयनीला राजप्रतिनिधि म्हणून जात असतां तो विदिशा नगरींत राहिला. तेथें त्यानें एका श्रेष्ठीच्या देवी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. तिच्यापासून त्याला उज्जेनीय व महेन्द्र असे दोन मुलगे व संघमित्रा नांवाची मुलगी झाली. अशोक राज्यावर बसल्यावर त्यानें महेन्द्राला लंकेस धार्मिकप्रसाराकरितां पाठविण्याचें ठरविलें. तेव्हां तो आपल्या आईस भेटण्याकरितां चेतीयगिरीस आला व तेथें त्याला त्याच्या आईनें बांधविलेल्या मोठ्या एका विहारांत ठेवण्यांत आलें होतें. ही लंकेतील बुद्धधर्मीय इतिहासांतली गोष्ट खरी मानल्यास चेतीयगिरि म्हणजे सांची असावी असें म्हणावें लागतें. कारण या सर्व प्रदेशांत सांचीस अशोकाचा स्तंभ व मौर्यकालीन वस्तु सांपडल्या आहेत. ही गोष्ट सर्वस्वीं खरी असो वा नसो इतकें खरें कीं, अशोकाच्या कारकीर्दींत सांचीस बुद्धधर्माच्या अनुयायांनीं संघ स्थापला व या संघावर अशोकाचें प्रेम होतें. म्हणून अशोकानें आपल्या धर्माच्या आज्ञा खोदलेला एक स्तंभ व स्तूप साचीस बांधला. अशोकाचें सर्व आयुष्य आपल्या धर्माच्या प्रसारांत गेलें. अशोक खिस्ती सनापूर्वीं २३२ या वर्षीं वारला. त्याचे पश्चात् मौर्य साम्राज्य मोडकळीस आलें व मगधाचें राज्य सुंगराजाच्या हातीं आलें. याचा प्रस्थापक पुष्यमित्र हा राजा होता. त्याचा मुलगा अग्निमित्र हा राजप्रतिनिधि म्हणून विदिशा राजधानींत राज्य करूं लागला. या सुंगराजाच्या कारकीर्दींत सांचीच्या मुख्य स्तूपाला हल्लीं असलेल्या दगडी कामाची जोड झाली. तसेंच दुसरा व तिसरा स्तूप बांधण्यांत आला. या काळची शिल्पकला व मूर्तिकला अझून पूर्णावस्थेंत आली नव्हती.

सुंगाची सत्ता खिस्तीशकापूर्वीं सत्तर वर्षांच्या सुमारास अस्तास गेली. त्यानंतर माळव्यांत आंध्र राजे झाले व त्यांच्या कारकीर्दींत सांचीचीं अपूर्व तोरणें व कठडे बांधण्यांत आले. या काळीं शिल्पकला व मूर्तिकला अपूर्व उच्च दर्जाला येऊन पोचली होती असें दिसतें. आंध्रांनंतर माळवा सन ४०० पर्यंत क्षत्रपांच्या ताब्यांत होता. पण क्षत्रपांचा पराभव करून माळव्यावर गुप्त घराण्याच्या राजांनीं अंमल बसविला. गुप्तांचें साम्राज्य दीडशें वर्षें

टिकलें. याच काळांत बुद्धधर्माचा पाय मागें जाऊन हिंदूधर्माचें पुनरूज्जीवन होऊं लागलें. या हिंदुधर्माच्या पुनरूज्जीवनाच्या काळचीं कांहीं देवळें सांचीस आहेत. पण गुप्तकाळांत विदिशा नगरीचा नायनाट झाला व बुद्धधर्माच्या अवनतीमुळें सांचीची वस्ती नाहींशी होऊन सांची हें ठिकाण नामशेष झाल्यासारखें झालें. तें एका बाजूस असल्यामुळें मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून तेथल्या बुद्धकालीन वास्तुकलेचे मासल्यास इजा न होतां ते तसेच राहिले व ह्मणून ते आजतागाईत प्रवाशांच्या आनंद व आश्चर्य या मनोविकारांना उद्‌भूत करण्यास समर्थ आहेत. कालानें या अपूर्व कारागिरीच्या कामावर पडलेला मातीचा गाळ दूर करून या बुद्धकालीन शिल्पकलांच्या अवशेषाचें वैभव पुन्हां जगाच्या निदर्शनास आणण्याचें काम इंग्रजी अंमलांत इंग्रज पुराणवस्तुसंशोधनकारांनीं केलें आहे. ह्मणून हें स्थान आतां प्रेक्षणीय स्थानांत अग्रगण्यत्व पावलें आहे. असो.

सांची पाहून येण्यांत आमचा सबंध दिवस मोडेल, असा आह्मी अदमास केला होता, व ह्मणून भिलशाला दोन दिवस काढावयाचे, असा आमचा बेत होता. पण वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अर्ध्या दिवसांतच आमचें काम झाल्यामुळें या मुक्कामांत एक दिवस वांचविण्याचा आम्ही विचार केला. कारण, आह्मांला अटकेकडे जाण्याची उतावळी होती. म्हणून आह्मी उदयगिरि, बेसनगर व भिलसा हीं दोनप्रहरीं पाहून पहांटेच्या गाडीनेंच पुढें प्रयाण करण्याचा बेत केला, व तो आह्मी सरदार आपटे यांना सांगितला. त्यांनीं आमच्याबरोबर आपला एक मनुष्य दिला, व दोनप्रहरचा चहा झाल्यावर आह्मी पायींच उदयगिरीकडे निघालों.

वाटेनें आम्हांला बेटवा किंवा वेत्रवती ही नदी उतरावी लागली. नदीला चांगलें वहातें पाणी होतें, व नदीचा देखावा फार प्रेक्षणीय होता. नदी उतरून पुढें गेल्यावर व बरींच शेतें ओलांडल्यावर उदयगिरीचा पहाड आह्मांला दिसूं लागला. सांचीपेक्षां या पहाडावर थोडी अधिक झाडी दिसत होती. पायथ्याशीं एक लहानसें खेडेगांव आहे. तेथल्या पाटलाला एक गाडी तयार करावयाला आमच्या बरोबरच्या शिपायानें ताकीद दिली. आह्मी सरदार आपटे यांचे पाहुणे, मग गाडी

मिळावयाला काय उशीर? आह्मी लेणीं पाहून येतों, तोंपर्यंत गाडी तयार ठेवावी, असें पाटलास बजावून शिपाई आह्मांला उदयगिरीच्या लेण्याकडे घेऊन गेला.

हीं लेणीं टेकडीच्या खालच्या भागांत आहेत. दक्षिणप्रांतांतील लेण्यांप्रमाणें डोंगराच्या उंच भागीं नाहींत. पहिलें मोठें लेणें तर अगदीं पायथ्यालाच आहे, व त्याच्यापुढें लहानसें तळें आहे. पण हल्लीं हें तळें ओहोरलेलें आहे. या लेण्यांत कोरींव चित्रें अतिशय काढलेलीं आहेत, व तीं विष्णु आणि कृष्ण यांच्या चरित्रांतल्या देखाव्यांचीं आहेत. लेण्यांच्या डाव्या बाजूच्या खडकावर वराहावताराचा एक प्रचंड चित्रपट आहे. प्रथमतः आह्मांला हा चित्रपट काय आहे, याची कल्पना होईना! एक भला थोरला पुरुष उभा असून तो आपल्या पायानें नागावर बसलेल्या एका मूर्तीला खालीं लोटीत आहे, असा देखावा आह्मांला दिसला; पण या पुरुषाचें तोंड मात्र मनुष्यासारखें नव्हतें—एकाद्या पशूसारखें होतें. तोंडाचा भाग थोडासा फुटला असल्यामुळें हें चित्र कशाचें आहे, हें आह्मांला समजलें नाहीं; पण तो प्रचंड प्राणी व त्या चित्रपटांतील इतर खोदीव कामें पाहून आह्मी थक्क झालों, यांत संशय नाहीं.

गंगा व यमुना या नद्यांचें स्वर्गापासून अवरोहण एका बाजूला दाखविलें आहे. गंगा सुसरीवर बसलेली स्त्री, व यमुना कांसवावर बसलेली स्त्री, या रूपानें काढल्या असून खालीं पाण्याच्या लाटा दिसतील असें खोदीव काम केलें आहे. या लेण्यावर गुप्त घराण्यांतील चंद्रगुप्ताच्या काळचा एक शिलालेख आहे. या लेण्यांपैकीं दुसऱ्या एका लेण्यांत—याला 'तवालेणें' म्हणतात, कारण याच्यावर तव्याच्या आकाराचा खडक आहे—चन्द्रगुप्त आपल्या प्रधानासह या ठिकाणीं आला असतांना हें लेणें खोदलें आहे, असा स्पष्ट शिलालेख सांपडतो. हें लेणें शिवाला अर्पण केलेलें आहे. उदयगिरीचीं बाकीचीं सर्व लेणीं विष्णूच्या भक्तीचीं दर्शक आहेत; हें एकच मात्र शिवभक्तिदर्शक आहे.

या तवालेण्याच्या बाजूला खडकाला खिंड पडली असून त्यांतून टेकडीच्या माथ्यावर जाण्याला मार्ग आहे. या खिंडीच्या दोन्ही बाजूंला लहान

लहान लेण्यांसारखे कोनाडे काढले आहेत. डाव्या बाजूच्या खडकांत शेषशायी विष्णूची निजलेली प्रचंड मूर्ति आहे. ही बारा फूट लांब आहे. ही मूर्ति खडकाच्या अगदीं वरच असल्यामुळें पाऊसवाऱ्यानें फार खराब झाली आहे.

टेकडीच्यावर गेलें म्हणजे सांचीच्या टेकडीप्रमाणें जिकडेतिकडे दगड, चबुतरे, मोडकेतोडके खांब व मूर्ति दिसतात. यांमध्यें एका खांबाच्या उथळ्यावर काढलेलें सिंहाचें चित्र फारच पहाण्यालायक आहे. उदयगिरीचीं लेणीं हीं सर्व बौद्ध धर्माला उतरती कळा लागल्यावर जें ब्राह्मण-धर्माचें पुनरुज्जीवन झालें, त्या काळचीं—म्हणजे खिस्तीशकाच्या चारशें-पांचशें वर्षांच्या सुमाराचीं—आहेत, असें शिलालेखांवरून दिसतें.

सहज पाहणारालासुद्धां सांची व उदयगिरि येथील खोदीव चित्रपटां-मध्यें तेव्हांच फरक दिसून येतो. सांची येथें बुद्धाच्या आयुष्यांतील प्रसंगांचीं चित्रें काढलेलीं आहेत. मूर्ति आहेत त्या बुद्धाच्या किंवा त्याच्या पट्टशिष्यांच्या आहेत. कांहीं घरगुती कामाचे देखावे आहेत, व सिंह, हत्ती, मोर इत्यादि प्राणी आणि वृक्ष वेली यांचीं चित्रें खोदलीं आहेत. या सर्व उत्कृष्ट खोदीव कामांत देवादिकांच्या मूर्ति कोठेंच नाहींत ! उदयगिरीच्या टेकडींतील सर्व लेण्यांत विष्णु, गणपति, महिषासुरमर्दिनी देवी, सुर व असुर इत्यादि देवता व पुराणांतील प्रसंग यांचीं खोदीव चित्रें काढलेलीं आहेत. यांवरून या काळीं पुराणांचा व पौराणिक देवतांचा बराच प्रसार झाला होता, असें दिसतें.

उदयगिरीचीं सर्व लेणीं पाहून आम्ही पायथ्याच्या खेड्यांत आलों. तों गाडी तयार होती. आम्ही तेथें थोडें पाणी पिऊन गाडींत बसलों, तों पाटील आमच्यापुढें अदबीनें येऊन आम्हांला एक रुपया देऊं लागला. आम्हांला त्याचा अर्थच कळेना ! तेव्हां या ठिकाणीं कोणी अंमलदार किंवा मोठा माणूस आला, म्हणजे पाटलानें याप्रमाणें नजराणा देण्याची रीत आहे, असें शिपायानें आम्हांला सांगितलें. आम्ही हा रुपया अर्था-त्च घेतला नाहीं. उलट, पाटलाचे आम्ही फार आभार मानले, व मार्गस्थ

झालों. ही रीत पाहून येथे अजून संस्थानी अंमल आहे याचें आम्हांला प्रत्यंतर आलें.

या बैलगार्डीतून आम्ही तास अर्धातास चालल्यावर आम्हांला जिकडे-तिकडे मोडलेल्या व पडक्या इमारतींच्या खुणा दिसूं लागल्या. चुना, विटा, जोतीं, भिंती, देवळें वगैरे किती तरी गोष्टी आमच्या दृष्टीला पडत होत्या. पूर्वी येथें मोठें अफाट नगर असावें, असें त्यांवरून दिसून आलें. यालाच 'बेसनगर अगर विदिशा' म्हणत. पण या नगरानें व्यापलेला सर्व भाग पहाणें शक्य नव्हतें. कारण, आतां सायंकाळ होत चालला होता; म्हणून आम्ही बेसनगरचीं पुरातन स्मारकें पाहण्याचें सोडून दिलें, व भिलशाच्या बाजूकडे वळलों, आणि पुनः वेत्रवती नदीच्या एका भागाला येऊन पोहोंचलों.

हें ठिकाण खरोखरीच फार रमणीय आहे. आधीं येथें नदीचें पात्र फार खोल असून बरेंच रुंदहि आहे. शिवाय, नदींत पाणीहि पुष्कळ आहे. नदी उतरून अलीकडच्या तीराकडे आल्यावर अर्ध्या नदींत बांधलेलीं दोन मोठमोठीं देवळें लागतात. नदीच्या पात्रापासून हीं कितीतरी उंच आहेत; पण पात्रापासून सारख्या घांटाप्रमाणें पायऱ्या बांधलेल्या आहेत; यामुळें तो देखावा फार उत्तम दिसतो. मात्र देवळाच्या गाभाऱ्या-पर्यंत चढून जातांना पाय अगदीं भरून येतात. देवळाच्या सभोंवार प्रद-क्षिणा घालतांना आसपासचा सर्व भाग दृग्गोचर होतो, व या ठिकाणाला तीर्थाचें महत्त्व कसें व कां आलें असेल, हें ध्यानांत येतें.

येथून एका बाजूला फार मोठा डोह आहे, व यामुळें नदी सारखी पाण्यानें तुडुंब भरलेली दिसते. देवळाच्या बाजूला उंच खडक असून त्यालाच बंधारा बांधून नदींत लहानसें एक खडकाचें बेट आहे तेथपर्यंत सारखा घांट बांधीत नेला आहे; यामुळें तेथला भाग चांगला दिसतो. घांटाच्या कडेला स्नानाची व पोहण्याची उत्तम सोय झालेली आहे. येथें नदीला पुष्कळ घांट आहेत, व नदीच्या थोडें वर पाहिल्यास देवळें व घांटच्या घांट दृष्टिपथांत येतात! हें ठिकाण तीर्थ समजतात, व येथें लोक

मुंडन करून घेतात. वर्षाला एक यात्राहि येथें भरते, असें आमच्याबरोबरच्या शिपायानें आम्हांला सांगितलें.

येथें पोहोंचल्यावर आम्ही उदयगिरीहून आणलेली पाटलाची बैलगाडी परत पाठविली, व येथून आम्ही चालतच जाण्याचें ठरविलें. आतां संध्याकाळ होऊन काळोख पडण्याची वेळ येत चालली होती, म्हणून आम्ही या ठिकाणीं फार वेळ राहिलों नाहीं. नदी ओलांडून थोडेसे पुढें गेल्यावर भिलशाच्या नजीकचे घाट व देवळें हीं आमच्या दृष्टीला पडलीं. येथें वांईसारखा देखावा दिसत होता. नदीला सारखे घांट वरच्या अंगाला देवळें व त्यांत बैराग्यांना रहाण्याच्या ओऱ्या होत्या.

येथून निघून जरा पुढें गेलें, म्हणजे भिलसा गांवाचा तट लागतो. या सर्व गांवाला किल्ल्यासारखा तट असून त्याला तीन दरवाजे आहेत. या तटाच्या भिंतींत कितीतरी कोरलेले व शिलालेख असलेले दगड होते. अर्थात् बेसनगरच्या ऱ्हासानंतर तेथून हे दगड आणून हा तट तयार केला असला पाहिजे, असें उघड दिसत होतें.

आम्ही गांवांत शिरलों, ती गांवची वेस उंच व प्रशस्त होती. गांव साधारण जुन्या तऱ्हेचाच आहे. गांवामध्यें फारसें पहाण्यासारखें कांहीं नाहीं, असें शिपायाकडून आम्हांला कळल्यामुळें गांवांतून थेट स्टेशनकडे आम्ही निघालों, व तेथें रेल्वेचा रस्ता ओलांडून आमच्या मुक्कामाला सात-आठांच्या सुमाराला परत आलों.

झालें. आमचा येथला मुक्काम आतां एक रात्रीवरच आला होता. पण या सर्व वेळभर माझ्या मनांत पाहिलेल्या स्थळांवरून कितीतरी विचार सुचत होते.

खरोखरीच सांची, भिलसा, उदयगिरि, बेसनगर वगैरे आम्ही घाईघाईनें व वरवर पाहिलेलीं स्थळें आणि आसपासचीं इतर ठिकाणें हीं पुराणवस्तुशोधकांच्या दृष्टीनें किती तरी महत्त्वाचीं आहेत. या स्थळांमध्यें हिंदुस्तानचा हजार दीडहजार वर्षांचा इतिहास जणूं काय पुरलेला आहे! येथें सांपडणाऱ्या नाण्यांवरून, शिलालेखांवरून, खोदलेल्या चित्रांवरून, वास्तुकलेच्या पद्धतीवरून व इतर तऱ्हेनें राहिलेल्या दगडचुन्याच्या काय-

मच्या खुणांवरून हिंदुस्तानचा इतिहास बनविण्याचें काम बिकट आहे, हें माझ्या ध्यानांत आलें, व हें काम चांगल्या तऱ्हेनें पार पडण्यास या आणि अशासारख्या ठिकाणीं, महिनेच्या महिने घालविले पाहिजेत, अशी माझी खात्री झाली. आमच्यासारख्या एकादुसरा दिवस येऊन हीं प्रेक्षणीय स्थळें पाहून जाणारांच्या हातून पुराणवस्तुशोधनाचें काम काय होणार असें माझ्या मनांत आलें. पण निदान हिंदुस्तानांतील पुराणस्थलांचें महत्त्व बहुजनसमाजाच्या मनांत बिंबविण्याचें मध्यम दर्जाचें काम माझ्या प्रवासवर्णनानें झालें, तरी सुद्धां थोडेंफार उपयुक्त कृत्य आपल्या हातून घडल्यासारखें होईल, असें म्हणून मी आपल्या मनाचें समाधान केलें.

येथलीं स्थळें पाहून बौद्धधर्म व ब्राह्मणधर्म यांबद्दलच्या किती तरी कल्पना माझ्या मनांत आल्या. गौतमबुद्धाचें मूळ ठिकाण कपिलवस्तु; त्याचें बहुतेक आयुष्य काशी, गया, मथुरा, राजगृह वगैरे उत्तरेच्या शहरांत व प्रदेशांत गेलें खरें; पण थोड्याच काळांत त्याच्या धर्माचा प्रसार केवढा झाला ! आज अडीच हजार वर्षें गौतमबुद्धाला झालीं; तरी पण त्याचा धर्म अजून तिबेट, चीन, जपान, ब्रह्मदेश व सिलोन इत्यादि दूरदूरच्या देशांत प्रचलित आहे, व अजूनहि जगांतील एकषष्ठांश लोक या धर्माचे अनुयायी आहेत.

इतका पसरलेला धर्म हिंदुस्तानांत मात्र अगदीं नामशेष व्हावा, ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट मला वाटली. या धर्माच्या अनुयायांचीं दृश्य स्मारकें हिंदुस्तानच्या कोनाकोपऱ्यांत पसरलेलीं आहेत. बौद्ध लोकांनीं कोरलेलीं लेणीं दक्षिणेंतील खेड्यापाड्यांतहि आहेत. जुन्नर, नाशिक, कार्लें, कान्हेरी, कुलाबा जिल्ह्यांतील महाड, विरवाडी इतक्या भिन्नभिन्न ठिकाणचीं लेणीं मी प्रत्यक्ष पाहिलीं होतींच; पुस्तकांवरून इतर ठिकाणच्या लेण्यांचीहि मला माहिती झालेली होती. या दृश्य स्मारकांवरून या धर्माचा एका काळीं हिंदुस्तानांत केवढा विस्तार झाला होता, याबद्दल कोणाचीहि खातरी पटण्यासारखी आहे; पण मग प्रश्न असा उत्पन्न होतो, कीं, इतका देशांत रूढ झालेला धर्म अजिबात नाहींसा कसा व्हावा ? हिंदुलोकांची प्रवृत्ति तर सर्वसंग्रही आहे. यामुळें वेदकालीन धर्मापासून निघालेले नाना-

पंथ व नानामतें या सर्वांचा हिंदु धर्मांत समावेश होऊन ते थोड्या फार अंशानें अजून अस्तित्वांतहि आहेत. बुद्धाच्या काळापासून प्रचलित असलेला जैन धर्म हिंदुस्तानांत राहिला. त्याच काळांत अस्तित्वांत आलेला भागवतधर्म अथवा वासुदेवभक्ति अजून देशांत चालू आहे. मग सर्व हिंदुस्तानभर पसरलेला—नव्हे, सर्व आशियाखंडांत पसरलेला-धर्म हिंदुस्तानांतून अगदीं नामशेष कसा झाला, हें मला मोठें गूढ वाटलें. हिंदुस्तानांतील या धर्मांच्या विस्ताराच्या दृश्य खुणांवरून केलेला तर्क चुकीचा तर नाहींना, अशी उलट कल्पना माझ्या मनांत आली, व या दृष्टीनें मी विचार करूं लागलों. तेव्हां ही कल्पनाहि खरी असण्याचा संभव आहे, असें मला वाटलें. कारण, गौतमबुद्धानें आपला धर्म प्रचलित केल्यावर लवकरच त्याला राजाश्रय मिळून हिंदुस्तानांतील एका प्रचंड साम्राज्याचा तो धर्म बनला, व त्यांतच अशोकासारखा खरा धर्माभिमानी व धर्माचा प्रसार करण्याला पाण्यासारखा पैसा खर्च करणारा राजा त्या धर्माला लाधला. यामुळें जिकडे तिकडे बुद्धमठ, बुद्धविहार, बुद्धस्तूप व अशोकाचे स्तंभ बांधण्यांत आले. राजा आपल्या वैभवाच्या, सामर्थ्याच्या व संपत्तीच्या जोरावर जड दगडचुन्याच्या रूपानें बौद्धधर्माचा प्रसार करूं शकला; पण जनमनावर या धर्माचा फारसा पगडा बसला नव्हता. हिंदुस्तानांतील सामान्य जनता बौद्धधर्माच्या वैभवकाळींसुद्धां गुप्तपणें आर्यधर्मालाच चिकटून होती, व या नव्या राजाश्रयी धर्माबद्दल त्यांची म्हणण्यासारखी सहानुभूति नव्हती; म्हणूनच मगधाच्या साम्राज्याला उतरती कळा लागल्यावर व गुप्तघराण्याच्या राजांनीं पुनः ब्राह्मणधर्म स्वीकारल्याबरोबर बौद्धधर्माचा राजाश्रय नाहींसा झाला, व बौद्धधर्माच्या प्रसाराचें बाह्यकारण नाहींसें झाल्याबरोबर हा धर्म हिंदु जनतेच्या अन्तरंगांत खरोखरी भिनला नसल्यामुळें बौद्धधर्मीयांना जनतेकडून त्रास होऊं लागला, व निरनिराळ्या प्रांतांत व भागांत पसरलेल्या बुद्धमठांची व विहारांची आणि त्यांतील भिक्षूंची उपासमार होऊन त्या धर्माचे अनुयायी हळु हळू नाहींसे झाले; नवे अनुयायी मुळींच मिळाले नाहींत. ही कल्पना खरी धरली, तर बौद्धधर्माचीं पुष्कळ दृश्य चिन्हें अस्तित्वांत असलीं तरी त्यांवरून बहुजनसमाजांत

त्याचा फारसा प्रसार झाला नव्हता, असें ठरतें. याप्रमाणें परस्पर-विरोधी कल्पना मनांत येऊन माझ्या मनाचा फारच गोंधळ झाला. पण एवढें मात्र खरें कीं, बौद्धधर्माचा उदय, त्याचा प्रसार व हिंदुस्तानांतील त्याचा नायनाट हा हिंदुस्तानच्या इतिहासांतील एक बिकट प्रश्न आहे, व हल्लीं उपलब्ध झालेल्या आणि होत असलेल्या पाली ग्रंथांवरून पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या खटपटीनें व पुण्यांत नवीन होऊं घातलेल्या 'भांडारकर पुराणसंशोधन संस्थेनें' या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावला, तर हिंदुस्तानच्या सुमारें हजार दीडहजार वर्षांच्या काळावर केवढा प्रकाश पडेल, असें माझ्या मनांत आलें. मात्र या बिकट प्रश्नाबद्दल आपल्या हातून व्यवसायभेदामुळें फारसें कांहीं होण्यासारखें नाहीं, हें पाहून मनाला थोडें वाईट वाटलें.

याप्रमाणें मनांत विचार घोळत असतांना मी भिलसा येथें आमच्या बिऱ्हाडीं निद्रावश झालों, व पहांटेला उठून आमच्या पुढच्या मुक्कामाच्या तयारीला लागलों. पूर्वींची कांहींएक ओळख नसतां आमच्याजवळ इतक्या मोकळ्या मनानें बोलल्याचालल्याबद्दल व आमचा पाहुणचार उत्तम तऱ्हेनें केल्याबद्दल सरदार आपटे यांचे आभार मानून आम्ही मोठ्या आनंदानें दिल्लीला जावयाला निघालों.



३

# नवी व जुनी दिल्ली.

आम्ही भिलशाहून दिल्लीएक्स्प्रेसनें पहांटे पांच वाजतां निघालों. दिल्लीला पोहोंचावयाला सुमारें चवदा तास लागतात. हा सर्व प्रवास दिवसा व्हावयाचा होता. यामुळें उन्हाचा फार त्रास होईल, हें आह्मांला ठाऊक होतें. पण या त्रासाच्या मोबदल्यांत भिलशापासून दिल्लीपर्यंतचा चारशें मैल लांबीचा प्रांत—विहंगम दृष्टीनें कां होईना—पण डोळ्याखालून गेल्यासारखा होईल, अशी आम्ही आपल्या मनाची समजूत केली. बाकी, आगगाडींतून चाललें असतांना—विशेषतः मेल किंवा एक्स्प्रेससारख्या प्रचंड वेगानें जाणाऱ्या गाड्यांनीं प्रवास करीत असतां—कालिदासानें 'शाकुंतल'मध्यें म्हटल्याप्रमाणें **'न मे दूरे किंचित्क्षणमपि न पार्श्वे रथजवात्'** असा अनुभव वारंवार येतो.

आम्ही गाडींत बसून तास दीड तास झाला नाहीं, तोंच विना हें मोठें जंक्शनस्टेशन आलें. तेथें आम्ही चहा व दूध घेतलें. दहांच्या सुमाराला आम्ही झांशी स्टेशनला येऊन पोहोंचलों. येथें गाडी सुमारें पंधरा मिनिटें थांबली. येथून पुढें जाऊं लागलें म्हणजे दातिया म्हणून जुन्या इमारतींकरितां प्रसिद्ध असलेलें ठिकाण दिसतें. दातियाचा किल्ला व दुसऱ्या सुंदरसुंदर इमारती आपल्याला आगगाडींतून दृग्गोचर होतात, व या पहाण्याकरितां या ठिकाणीं उतरण्याची इच्छाहि होते. पण उपयोग काय ? गाडी झपाट्यानें चालत असते, व क्षणार्धांत हा सर्व देखावा दृष्टिआड होऊन जातो ! थोड्याच अवकाशानें आम्हांला ग्वालेरचा किल्ला दिसूं लागला. आमच्या मागच्या प्रवासांत आम्ही ग्वालेरचा किल्ला वर जाऊन स्वस्थपणें पाहिला असल्यामुळें आम्हांला आगगाडींतूनसुद्धां

किल्ल्यावरील इमारती व इतर स्थळें हीं स्पष्टपणें ओळखतां आलीं, व हा किल्ला दुरून पाहूनसुद्धां आम्हांला आमच्या पहिल्या प्रवासाची आठवण होऊन आनंद झाला. किल्ल्यावरील निरनिराळ्या स्थळांचें निरीक्षण करण्यांत आम्ही गर्क असतां गाडीची वेळ होऊन ती फूं फूं करीत पुनः चालू झाली, व ग्वालेरचा किल्ला आम्ही मागें टाकून झपाट्यानें दिल्ली—आग्र्याच्या प्रदेशांत प्रवेश करूं लागलों.

या प्रदेशांत प्रवेश करण्यापूर्वी चंबळा नदीच्या दरींतून आगगाडी जाते. ही दरी अगदीं विचित्र आहे. ही खोल आहे अशांतला भाग नाहीं. प्रांत सपाटच आहे; पण येथून पांढरी माती लागते, व मातीचे ढीगच्या ढीग मैलच्या मैल सारखे लागतात. या ढिगांमधून खोल खोल भेगा असतात. हा विलक्षण देखावा आपल्या इकडल्या नद्यांच्या तीरांना मुळींच दृष्टीला पडत नाहीं. अर्थात् हा सर्व भूमिभाग उत्पन्नाचा नाहीं. अशा तऱ्हेच्या उंचसखल मातीच्या ढिगांच्या राशीच्या राशी मागें टाकल्यावर चंबळा नदीचें प्रचंड पात्र व त्यावरील रेलवेचा प्रचंड पूल लागतो. या नदींत गोटे किंवा दगड मुळींच नाहींत. पांढरी वाळू व पांढरी माती यांनींच सर्व पात्र भरलेलें असतें. खरोखरीं पाहतां नर्मदेपासून चंबळा नदीपर्यंत एक तऱ्हेचा प्रदेश वाटतो. यांत माती तांबडसर असून तांबडा दगड फार आहे. पण चंबळेच्या पलीकडील प्रांत पांढऱ्या मातीचा असून त्यांत दगड फारच कमी आहे.

चंबळा नदीची दरी व आसपासचा ओसाड प्रदेश टाकला, ह्मणजे आपण गंगा व यमुना या नद्यांच्या मधील सुपीक प्रदेशांत येतों, व याचें प्रत्यंतर सभोंवारच्या हिरव्या गार शेतांवरून येतें. कारण, या भागांत कालवे पुष्कळ असून त्यांचें पाणी शेतांना मिळतें, यामुळें उन्हाळ्यांतसुद्धां हिरवींहिरवीं शेतें दृग्गोचर होतात.

हा सुपीक व सुंदर प्रांत पहाण्यांत आह्मी गुंतलों आहोंत, तोंच गाडी आग्रा स्टेशनला येऊन पोहोंचली, व आग्र्याचीं सुंदर मातीचीं चित्रें, ताजमहालाचे व इतर वस्तूंचे पांढऱ्या दगडांचे नमुने पाटींत घेऊन फेरीवाले उतारूंना त्या वस्तु विकत घेण्याबद्दल विनवूं लागले. येथलीं मातीचीं चित्रें

खरोखरींच फार सुंदर असतात व त्या मानानें त्यांच्या किंमतीहि फार नसतात. आग्र्याचीं दोन स्टेशनें सोडून गाडी निघाली, कीं, ती एकदम मथुरेला येते, व त्या स्टेशनवर उतारूंची व पंड्यांची अशी एकच गर्दी दृष्टीला पडते.

आम्ही मथुरेला पोहोंचलों, तों चार वाजून गेले होते. आतां दिल्ली फक्त तीन तासांवर आली, असें पाहून आम्हांला आनंद झाला, व प्रवासाचा त्रास या आनंदांत आम्ही पार विसरून गेलों.

मथुरा टाकून पुढें गेलें ह्मणजे कोसीकालम म्हणून एक मोठें स्टेशन लागतें. यापुढें मात्र अगदीं लहान लहान स्टेशनें लागतात, व प्रांतहि ओसाड व नापीक भासतो, आणि आपण हिंदुस्तानच्या राजधानीकडे जात आहों, असें वाटतहि नाहीं. ज्याप्रमाणें विजापुराला जातांना स्टेशननजीक आल्यावर पडक्या इमारती व ओसाड जागा लागतात, तसाच प्रकार दिल्लीजवळ गेलें म्हणजे होतो.

शेवटीं एकदांचें दिल्लीचें स्टेशन आलें, व आपल्या मुक्कामाला येऊन पोहोंचलों म्हणून आम्हांला बरें वाटलें. माझे मित्र स्टेशनवर आम्हांला न्यावयाला आले होते, ते आम्हांला भेटले, व आम्ही स्टेशनांतून बाहेर मुशाफरखान्यांत आलों. आमच्या मित्राचें बिऱ्हाड स्टेशनपासून फारसें दूर नसल्यामुळें आम्ही हमालाच्या डोकीवर सामान देऊन पायींच तिकडे निघालों.

भोजन झाल्यावर आम्ही दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्याचा बेत ठरवूं लागलों, तों 'रात्र थोडी, सोंगें फार' अशी आमची स्थिति होऊं लागली. आमचा बेत नवी व जुनी अशा दोन्ही दिल्ली पाहण्याचा होता. पण 'नवी दिल्ली' हेंच नांव तीन ठिकाणांना लागतें, असें आम्हांला समजलें. हल्लींचें दिल्ली शहर—ज्याला शहाजहान बादशाहाच्या नांवावरून 'शहाजहानाबाद' म्हणतात,—यालाच पूर्वींच्या दिल्लीच्या तुलनेनें 'नवी दिल्ली' म्हणण्याचा तेथें प्रघात आहे. शिवाय जॉर्ज बादशहांनीं हिंदुस्तानची राजधानी म्हणून ठरविलेली तात्पुरती दिल्ली एका ठिकाणीं आहे, तर त्यानंतर युरोपांतील नगररचनाशास्त्रज्ञांनीं पसंत केलेलें ठिकाण निरा-

ळ्याच ठिकाणीं आहे ! शिवाय 'सात किल्ले व बावन दरवाजे' या हिंदी म्हणीप्रमाणें सात जुन्या दिल्ल्या आहेत, त्या निराळ्याच.

खरोखरींच माझ्या मनांत असें आलें, कीं, जर कोणत्याहि शहराशीं हिंदुस्तानच्या बऱ्याच काळचा इतिहास निगडित झाला असेल, तर तो दिल्ली शहराशींच होय. महाभारतांतील पांडवांपासून तों थेट हल्लींच्या इंग्रज सरकारापर्यंत दिल्लीशीं महत्त्वाच्या गोष्टींत हिंदुस्तानच्या इतिहासाचा संबंध पोहोंचतो. ज्याप्रमाणें रोम शहराशीं यूरोपच्या बऱ्याच काळच्या इतिहासाचा संबंध पोहोंचतो, दंतकथेंतील रोम्युलसपासून तों थेट अर्वाचीन काळापर्यंत या शहराला फार महत्त्व होतें, तीच स्थिति दिल्ली शहराची आहे. तेव्हां अशा या शहरांतील सर्व प्रेक्षणीय स्थळें पहाण्याला किती तरी दिवस लागणार ! तेव्हां आम्हांला प्रेक्षणीय स्थळांची निवडानिवड करावी लागली, व दोन दिवसांतच पहाणें शक्य होता तितकाच भाग पहाण्याचा आम्ही बेत ठरविला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही प्रथमतः हल्लींच्या दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. हीं स्थळें म्हणजे चांदणीचौक, जुम्मामशीद व यमुनानदीवरील रेलवेचा प्रचंड पूल हीं होत. चांदणीचौक हा दिल्लीसारख्या हिंदुस्तानच्या राजधानीला शोभेल असाच प्रशस्त रस्ता आहे, यांत शंका नाहीं. हा रस्ता फारच रुंद असून त्याचे उजवी बाजू व डावी बाजू असे दोन भाग आहेत. दोन बाजूंच्यामध्यें दुहेरी झाडांची रांग व भाजीपाला, फळफळावळ, फुलें इत्यादि विकणारांना बसण्याकरितां कट्टे आहेत. बादशहांच्या काळीं हा कट्टयाचा भाग यमुनेच्या कालव्याच्या पाण्यानें तुडुंब भरलेला असे. त्या वेळीं तर या रस्त्याची शोभा जास्तच असली पाहिजे. आतांसुद्धां हा लांबच्यालांब व इतका प्रशस्त रस्ता पाहून मनाला आनंद झाल्यावांचून राहत नाहीं.

या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं सर्व दुकानेंच आहेत, व तीं साधारणतः एकाच तऱ्हेचीं बांधलेलीं आहेत. बहुतेक सर्व घरांना पुढच्या बाजूला खोदीव दगडी कामाचे सुंदर सज्जे काढलेले आहेत. या चांदणी चौ-

काच्या एका अंगाला मोठ्या घड्याळाकरितां एक मनोरा केला आहे तो अर्वाचीन आहे.

चांदणीचौक पाहून झाल्यावर आम्ही शहराच्या टोंकावर व यमुना नदीच्या कांठाजवळ असलेल्या दिल्लीच्या किल्ल्यानजीकच्या खुल्या जागेंतील जुम्मामशीद पहावयाला गेलों. या मशिदीसभोंवार कितीतरी खुलीं पटांगणें आहेत. यामुळें ही सर्व भव्य व प्रचंड इमारत फारच उठावांत दिसते. खुल्या मैदानाच्या उंचवट्यावर ही बांधलेली असून वर चढण्याला प्रशस्त व ऐसपैस अशा तांबड्या दगडाच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. मुंबईतील एलफिन्स्टन हायस्कूलला जशा पायऱ्या आहेत, त्यापेक्षांहि जास्त लांब, रुंद व उंच पायऱ्यांचा हा प्रचंड जिना चढतांना मशिदीच्या भव्यतेची कल्पना मनांत उभी राहते. पुढल्या दरवाजांतून आंत पाऊल टाकलें कीं, समोरची मशीद व त्याच्या पुढचा ऐसपैस चौक पाहून मनुष्य थक्क होऊन जातो. सर्व चौकभर तांबड्या पांढऱ्या दगडाची फरसबंदी केलेली आहे.

हा चौक ४५० फूट लांबीचा चौकोन आहे. म्हणजे हल्लीं आपलीं क्रिकेटचीं मैदानें जेवढीं लांब रुंद असतात, इतका हा चौक मोठा आहे. चौकाच्या तीनहि बाजूंना खुल्या कमानींचे, पण वरून फरसबंदी गच्ची केलेले प्रशस्त सोपे बांधलेले आहेत. येथून सर्व शहराचा मनोहर देखावा दिसतो. या चौकासमोरच शुभ्र संगमरवरी दगडाची मशीद आहे. हिला तीन घुमट असून दोन बाजूंना कोंपऱ्यांत दोन उंच मनोरे आहेत. मनोऱ्यांवर चढून गेल्यावर शहराची दाट वस्ती, यमुनेचा प्रशांत प्रवाह व दूरदूरच्या जुन्या इमारतींचा देखावा हीं सर्व पाहिलीं, म्हणजे अतिशय आनंद झाल्यावांचून राहत नाहीं. सर्व मशिदीभर निमाज पढणाऱ्या मंडळीकरितां काळ्या दगडाच्या महिरपी हारीनें संगमरवरी फरसबंदींत बसविलेल्या आहेत.

या मशिदीचें सर्व काम फारच सुबक व भव्य आहे. हिंदुस्थानांतील सर्व मशिदींमध्यें या मशिदीचा सर्वांत वर नंबर लागेल, यांत शंका नाहीं. ही मशीद शहाजहान बादशहानें आपल्या कारकीर्दीच्या

चवथ्या वर्षी सुरू करून ती दहाव्या वर्षी पुरी केली. या मशिदीपासून दिल्लीचा किल्ला स्पष्टपणें दिसतो. लढाईपासून या किल्ल्यांत जावयाला परवानगी मिळण्यास पंचाईत पडते असें कळल्यामुळें आम्ही किल्ला पहाण्याच्या फंदांत पडलों नाहीं.

जुम्मामशीद पाहून झाल्यावर आम्ही येथून जवळच असलेला यमुनेवरील रेल्वेचा पूल व तेथून दिसणारा यमुनेचा प्रवाह पहावयाला गेलों. हा रेल्वेचा पूल सालीमगडाच्या तटाला अगदीं खेटून बांधलेला आहे. येथला देखावा फार भव्य आहे. एकीकडे तो गड, तर त्यालाच लागून रेल्वेचा मोठा थोरला पूल व खालीं वालुकामय यमुनेचा किनारा आणि काळसर निळसर रंगाच्या पाण्याचा यमुनेचा प्रवाह हीं एकसमयावच्छेदेंकरून पाहिलीं, म्हणजे सृष्टि व मनुष्य या दोघांच्याहि कर्तृत्वाबद्दल सानंद आश्चर्य वाटतें. यमुनेच्या अलीकडे भली मोठी लांबचलांब खुली जागा लागते, व तिच्या अलीकडे घांट दिसतात. यावरून पूर्वी यमुनेचा प्रवाह अलकिडे असून अगदीं घांटाजवळून जात असावा, पण कालेंकरून तो दूर गेला असावा, असा सहज अंदाज करतां येतो. या घांटावर अश्वमेध झाल्यावर युधिष्ठिरानें यज्ञ केला होता अशी दंतकथा आहे.

सालीमगड रेल्वेचा पूल व त्या शेजारचा घांट हीं हल्लींच्या दिल्ली शहराच्या उत्तरेला आहेत. येथून यमुना नदी दक्षिणवाहिनी झालेली आहे, आणि नदीचा प्रवाह व पलीकडे लहानलहान टेंकड्यांची असलेली एक ओळ यांच्या दरम्यान हल्लींचें शहर वसलेलें असून येथून खालीं दक्षिणेकडे जुन्याजुन्या दिल्ल्या वसत गेलेल्या होत्या. शेवटची हिंदू दिल्ली जेथें कुतुबमिनार आहे तेथें होती, व ही हल्लींच्या दिल्लीहून सुमारें अकरा मैल दक्षिणेला आहे. जॉर्ज बादशहांनीं जेव्हां दिल्ली राजधानी करण्याचें जाहीर केलें, तेव्हां नव्या दिल्लीला जी जागा पसंत करण्यांत आली ती या टेंकडीच्या रांगेपलीकडे आहे. तात्पुरती दिल्ली तेथेंच आहे.

ही तात्पुरती दिल्ली पहावयाला आम्ही दोन प्रहरीं गेलों. या टेंकड्यांच्या रांगेच्या माथ्यावरून एक रस्ता गेला आहे. त्यावर गेलें ह्मणजे सगळें दिल्ली शहर एकदम दृग्गोचर होतें, व यमुना नदी आणि टेंक-

ज्यांची रांग यांच्यामध्यें खोलांत शहर वसलेलें आहे, असें आपल्याला आढळून येतें. या टेंकड्यांच्या रांगेच्या माथ्यावरच फत्तेगड नांवाच्या बंडांत कामास आलेल्या किल्ल्यावर इंग्रजांच्या स्मरणार्थ उंच चबुतऱ्यावर एक लहानसा मनोऱ्यासारखा स्तंभ बांधला आहे. याच्या चारहि बाजूंना शूर शिपायांचीं नांवें खोदलेलीं आहेत. याच्या शेजारींच अशोकाच्या काळचा एक स्तंभ उभा आहे. हे दोन्ही स्तंभ पाहिले म्हणजे हिंदुस्तानच्या इतिहासाची प्राचीन व अर्वाचीन दोन टोंकेंच आपण पहात आहों कीं काय असा भास होतो !

. या टेकड्यांच्या पलीकडे चालचलाऊ राजधानीच्या पुष्कळशा पांढऱ्या शुभ्र इमारती दिसतात. जरी या तात्पुरत्या आहेत, तरी त्याचें काम सुबक आहे. विशेषतः व्हाइसरायांचा राहावयाचा बंगला व सेक्रेटरिएट या इमारती प्रेक्षणीय आहेत.

नव्या राजधानीचा पाया घातल्यानंतर ही जागा राजधानीला अयोग्य असें ठरविण्यांत आलें व दुसरी जागा पसंत करण्यांत आली. ही जागा हल्लींची दिल्ली व जुनी हिंदु दिल्ली यांच्या दरम्यान आहे. तेव्हां ती पहावयाला आम्हांला स्वतंत्रपणें जावयाची कांहीं जरूर नव्हती. कारण, दुसऱ्या दिवशीं आम्ही कुतुबमिनारपर्यंत जाऊन येण्याचा बेत केला होता.

ठरल्याप्रमाणें आम्ही दुसऱ्या दिवशीं पहांटेला आमच्या मित्रासह एका घोड्याच्या गाडींत बसून जुन्या दिल्लयांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला निघालों.

आमचा मार्ग उत्तरदक्षिण होता. म्हणजे आम्ही उत्तरेकडून दक्षिणेकडे जात होतों. आम्ही हल्लींच्या दिल्लीच्या तटाच्या दरवाज्यांतून बाहेर येऊन थोडेसे पुढें आलों, तों आम्हांला जिकडेतिकडे जुन्या पडक्या इमारती दिसूं लागल्या. थोड्याच वेळांत आम्ही दिल्लींतील वेधशाळा पहावयाला उतरलों. हिला तेथले लोक ' जंतरमंतर ' म्हणतात ! हें नांव पडण्याचें कारण आम्हांला कळलें नाहीं. या वेधशाळेकडे जातांना वाटेनें लहानलहान रूळ घातलेल्या सडका लागत होत्या, व पुष्कळ ठिकाणीं पाडापाड करून सपाट जागा करण्याचें काम चाललें होतें.

येथपासून नव्या भावी राजधानीची मर्यादा सुरू होते. यामुळें या भागांतील मोडक्यातोडक्या इमारती वगैरे पार पाडून चांगली सपाटी करून रस्ते आंखण्याचें काम चाललें होतें. कांहीं इमारतींवर ' P ' हें अक्षर दिसलें. नव्या दिल्लीला घेतलेल्या सर्व जागेची पहाणी होऊन त्यांत जुन्या म्हणून ठेवण्याला योग्य व आवश्यक अशा ठिकाणांची यादी करून त्यांवर ' P ' असें अक्षर घातलें आहे, असें आमच्या मित्रानें सांगितलें.

आम्ही लवकरच वेधशाळेशीं आलों, व दरवाजांतून आंत गेलों, तों वेधशाळेचा रखवालदार आम्हांला दिसला. त्यानें आम्हांला सर्व वेधशाळा दाखविली. मात्र त्याला त्या ठिकाणच्या निरनिराळ्या योजनांची व ज्योतिषसंबंधींच्या साधनांची कांहींच माहिती दिसली नाहीं. आम्ही कांहींहि विचारलें, तरी ' तारे पहाण्याचें हें यंत्र आहे, ' एवढेंच तो उत्तर देई ! ही वेधशाळा म्हणजे एकादी मोठी इमारत आहे, असें मुळींच नाहीं. आपल्याइकडल्या आर्य ज्योतिष्यांनीं ग्रहांची व ताऱ्यांची प्रत्यक्ष गतिस्थिति समजण्याकरितां जीं साधनें शोधून काढलीं होतीं, त्यांचा या ठिकाणीं संग्रह केलेला आहे. या साधनांना आपल्या ज्योतिषांत ' यंत्र ', म्हणतात. साधारणतः हीं यंत्रें धातूचीं व लहान प्रमाणावर करीत असत. पण या वेधशाळेंत तीं सर्व दगड चुन्याचीं कायमचीं केलीं असून फार प्रचंड प्रमाणावर आहेत. तरी पण तीं इतकीं नाजूक आहेत, कीं, त्यांच्याकडून सूक्ष्म काम व्हावें ! आम्ही पक्क्या चुन्याच्या कामांत केलेलीं निरनिराळीं वर्तुळें पाहिलीं; त्यांवर अंशाच्या सूक्ष्म खुणा दिसत होत्या. पुढें गेल्यावर एक वर चढतचढत गेलेली साधारण चालण्याइतकी रुंद दोनतीन पुरुष उंच अशी भिंत लागली. तिच्या शेजारीं एक लहानसा तलाव होता, व त्याला पायऱ्या असून त्यावरहि अक्षांश घातलेले होते.नंतर निरनिराळ्या उंचीच्या खांबांची एक रांग आम्ही पाहिली. पुढें एक चक्राकार भिंत आम्हांला दिसली. याप्रमाणें उत्तम चुन्याच्या बांधकामांत केलेलीं पुष्कळ यंत्रें आम्ही पाहिलीं; पण तेथला रखवालदार अगदींच अडाणी दिसला. आमच्यापैकीं कोणालाच ज्योति-

षाची व विशेषतः आर्य ज्योतिषाची माहिती नसल्यामुळें आम्ही ही वेधशाळा पाहिली ती निवळ जडदृष्टीनें पाहिली. ज्याप्रमाणें एकाद्या अजबखान्यांत गेल्यावर कांहीं वस्तु काय आहेत, कशाकारितां आहेत वगैरे आपणाला कळत नाहीं, त्याप्रमाणें येथें माझी स्थिति झाली. या वेळीं माझे मित्र व सहाध्यापक श्रीयुत प्रो. नाईक यांची मला फार आठवण झाली. त्यांनीं युरोपियन व आर्य ज्योतिषांचा चांगला अभ्यास केला आहे. ते जर माझ्याबरोबर असते, तर त्यांनीं या सर्व विचित्र यंत्रांची रचना व उपयोग हीं आम्हांला समजावून सांगितलीं असतीं; पण त्या ठिकाणीं आम्हांला या यंत्रांबद्दलची माहिती मिळविण्याला कांहींएक साधन नव्हतें. ही दिल्लीची वेधशाळा जयपुरचा राजा दुसरा जयसिंह यानें सन १७०० च्या सुमाराला बांधली एवढें आम्हांला तेथें समजलें.

घरीं येऊन गॅझीटियरमध्यें पाहतां हिंदुस्तानांतील पॅरिस असें जें जयपुर शहर, तें वसविणाऱ्या व स्वतः मोठा गणिती व ज्योतिषी असलेल्या दुसऱ्या जयसिंगानें ही वेधशाळा बांधली, असें मला कळून आलें. तो सन १६९३ मध्यें गादीवर आला. ग्रहांच्या गतिस्थितींचें सूक्ष्मज्ञान मिळविण्याकरितां त्यानें जयपुर, दिल्ली, उज्जयनी, काशी व मथुरा इतक्या ठिकाणीं वेधशाळा बांधल्या, व ज्योतिषी ठेवून या सर्व ठिकाणीं ग्रहांच्या गतिस्थितींचे वेध घेववून त्यांची तुलना करून 'झीजमहमद' नांवाचा ग्रंथ आरबी भाषेंत व 'सिद्धांतसम्राट्' नांवाचा ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला. युरोपांत ग्रहस्थितिगति जितकी सूक्ष्म काढतां येत होती, त्यापेक्षांहि आधिक सूक्ष्मता जयसिंहानें साधली. असो.

वेधशाळा पाहून झाल्यावर आम्ही गाडींत बसून पुढें चालू झालों. वाटेनें लहानमोठीं थडगीं व इमारतींचे अवशेष दृग्गोचर होत होते. नवीन दिल्लीकारितां सपाट जागा करण्याचें ठरल्यापासून अशा पुष्कळ इमारती व थडगीं पाडण्यांत येऊन सपाट जागा करण्याचा सपाटा चालू आहे, असें आम्हांला आमच्या मित्रानें सांगितलें.

जरा पुढें गेल्यावर आह्मांला आमच्या डाव्या बाजूला पुराणा किल्ला किंवा इंद्रप्रस्थ दिसूं लागलें. या किल्ल्याच्या समोरून एक मोठा रस्ता

काढून तो नव्या दिल्लीच्या मुख्य रस्त्यांपैकीं एक करण्याचें ठरलें आहे, व नवीन दिल्लींतील मुख्य मुख्य इमारती या किल्ल्याच्या अगदीं समोर येतील अशा तऱ्हेनें बांधण्याचें ठरलेलें आहे, असें आमच्या मित्राच्या बोलण्यावरून कळलें. लढाईमुळें हल्लीं काम अगदीं वेताबातानें चालू आहे, असेंहि त्याच्याकडून आह्मांला समजलें. जरा पुढें गेल्यावर डावी-कडे हुमायुनाच्या थडग्याची प्रचंड इमारत व उजवीकडे मनसूर अल्ली सफदारजंग यांच्या थडग्याची इमारत दिसूं लागली. हुमायुनाचें थडगें आम्ही परत येतांना पहाणार होतों पण सफदारजंगाचें थडगें लागलीच पाहून घेतलें. कारण, परत जातांना आम्ही दुसऱ्या रस्त्यानें जाणार होतों.

या थडग्याचें काम प्रेक्षणीय आहे. मुसलमानी इमारतींचे दोन प्रकार आहेत. एक मशीद व दुसरें थडगें. प्रत्येकाचा आकार ठरलेला असे. तुम्ही कोणतीहि मुसलमानी मशीद पहा, तिचा प्लॅन अगदीं ठरींव ! फरक काय तो आकार, बांधकामाला उपयोजिलेला दगड व कमीजास्त खोदीव काम यांतच असावयाचा ! तीच स्थिति थडग्यांची ! सफदारच्या थडग्याची इमारत भव्य असून दरवाज्यांतून आंत गेल्यावर मोठें थोरलें खुलें फरसबंदी अंगण आहे, व पुढें थडग्याची इमारत आहे. अशा जातीच्या पुष्कळच इमारती आम्ही पाहिलेल्या असल्यामुळें फारसा वेळ येथें न घालवितां आम्ही पुढें गेलों.

नंतर आम्ही निझामउद्दीन नांवाच्या साधूच्या ठिकाणीं गेलों. बाहे-रून हें ठिकाण अगदींच मोडकळीला आल्यासारखें दिसतें; पण आंत गेल्यावर संगमरवरी दगडाचें सुंदर काम पाहून मन थक्क होतें. येथें पुष्कळ बादशहांचीं लहानलहान थडगीं आहेत, व संगमरवरी दगडाच्या जाळ्यांचें काम फार प्रेक्षणीय आहे.

तेथून आम्ही निघालों तों थेट कुतुबमिनारला जाईपर्यंत कोठेंहि थांबलों नाहीं. जुन्यानव्या दिल्लीच्या प्रेक्षणीय स्थळांचें कुतुबमिनार हें एक नाक आहे. ज्याप्रमाणें आग्र्याचा ताजमहाल हा एक जगांतील सात आश्चर्यांपैकीं गणलेला आहे, त्याप्रमाणेंच दिल्लीचा कुतुबमिनार हाहि एक सात आश्चर्यांपैकींच गणलेला आहे. हा मिनार किंवा मनोरा रायपिठोरा

व लालकोट या दोन किल्ल्यांच्या आंत आहे. यामुळें आंत जाण्याला दोन दरवाजे लागतात.

खरोखरींच या मनोऱ्याचें काम इतकें मनोहर आहे, कीं, त्याचें शब्दांनीं वर्णन करणें शक्यच नाहीं! हा मनोरा तांबड्या दगडांचा बांधलेला आहे, व निरनिराळ्या मजल्यांच्या तांबड्या दगडांतहि थोडाफार फरक आहे; यामुळें निरनिराळ्या मजल्यांच्या तांबडेपणांत निरनिराळी छटा भासमान होते. पहिले तीन मजले तांबड्या दगडाचे आहेत. चवथा संगमरवरी दगडाचा आहे, व पांचव्यांत तांबड्या व पांढऱ्या दगडांचें मिश्रण आहे. हा मनोरा २३८ फूट उंच असून त्याला ३७९ पायऱ्या आहेत. कुतुबमिनारचा चबुतरा चोवीसकोनी असून त्याचा घेर १४७ फूट आहे. पहिला मजला ९५ फुटांचा असून त्याला एक अर्धवर्तुलाकार व एक तिकोनी असे पैलू पाडलेले आहेत. बहुतेक मुसलमानी इमारतींतील मनोरे हे निवळ वर्तुलाकार असतात. कुतुबमिनारची ही पैलूची कल्पना अपूर्व आहे व या त्याच्या विशेषामुळेंच हा मनोरा इतका सुंदर दिसतो. शिवाय प्रत्येक मजल्याची घटना निराळी आहे. दुसरा मजला पन्नास फूट उंच असून मजल्याचे सर्व पैलू अर्धवर्तुलाकार आहेत. तिसरा मजला चाळीस फूट असून त्या मजल्याचे सर्व पैलू तिकोनी आहेत. चवथा मजला पंचवीस फूट असून तो नेहमींच्या मनोऱ्यांप्रमाणें अगदीं साधा बिन पैलूदार आहे, व पांचवा बावीस फूट असून त्या मजल्याला पुनः अर्धवर्तुलाकार पैलू थोड्या थोड्या अंतरावर केलेले आहेत. पांचव्या मजल्याच्या वर गेल्यावर मनोऱ्यासभोंवतीं कमानीचा घुमट आहे. प्रत्येक मजल्यावर आल्यावर सभोंवारचा देखावा पाहण्याकरितां व विश्रांति घेण्याकरितां मनोऱ्याच्या सभोंवार सुंदर सज्जे काढलेले आहेत.

या सज्जांचें खोदीव काम व कठड्यांचें नक्षीकाम फार उच्च दर्जाचें आहे. हा मनोरा खालपासून वरपर्यंत सारख्या आकाराचा नाहीं. जोत्याजवळ त्याचा व्यास ४७ फूट आहे तर माथ्यावर त्याचा व्यास फक्त ९ फूट आहे. म्हणजे जसजसें वर जावें तसतसा हा मनोरा निमुळता होत गेलेला आहे. सर्व मनोऱ्याला आंतून वर्तुलाकार जिना आहे. त्याला

एकंदर ३७९ पायऱ्या आहेत. मी प्रत्येक मजल्याच्या पायऱ्या मोजीत वर गेलों. प्रत्येक सज्जावर गेलें म्हणजे सभोंवतालचा सुंदर देखावा दिसत असे, व ज्या दोन किल्ल्यांच्या मध्यें कुतुबमिनार आहे त्या किल्ल्यांची तटबंदी स्पष्ट दिसून किल्ल्यांचा आकार एकदम दृग्गोचर होई. मनोऱ्याच्या अगदीं वरून तर फार दूरवरचा देखावा दिसे. हा मनोरा तयार करणाराच्या मार्मिकतेबद्दल फार आश्चर्य वाटतें !

हा मनोरा कोणी बांधला याबद्दल अजूनहि पुराणवस्तुसंशोधनकारांमध्यें वाद आहे. कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, हा मनोरा पृथ्वीराज चव्हाण यानें आपल्या मुलीला यमुना नदीचें रोज दर्शन व्हावें म्हणून बांधला. कांहीं लोक तर असें म्हणतात, कीं, तेथून गंगा नदी दिसावी असाहि बांधतांना हेतु होता; पण तो या मनोऱ्यानें साधला नाहीं, म्हणून कुतुबमिनारच्या दुप्पट आकाराचा दुसरा मनोरा बांधण्याला त्यानें सुरुवातहि केली होती. पण तें काम मुसलमानांच्या स्वारीनें आणि त्यांच्या विजयानें बंद पडलें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें आहे, कीं हा मिनार कुतुबुदिननें बांधण्याला सुरुवात केली, व तो त्याचा जांवई आलतमशहा यानें पुरा केला. या मताप्रमाणें कुतुबमिनारचें काम सन १२०० मध्यें सुरू होऊन तें १२२० मध्यें पुरें झालें असलें पाहिजे. या मनोऱ्याच्या बहुतेक प्रत्येक मजल्यावर आरबी भाषेंत व देवनागरी भाषेंत लेख आहेत; या लेखांवरून हा मनोरा पृथ्वीराज चव्हाणानें बांधला असें शाबीद होत नाहीं. उलट कुतुबुदिन व त्याचा धनी महमद यांचीं नांवें पहिल्या मजल्यावर कोरलेलीं आहेत, यावरून तो मुसलमानांनीं बांधलेला असावा असें दिसतें, व दंतकथेला फारसा आधार सांपडत नाहीं, असें म्हणणें भाग आहे. तरी पण सर्व पक्षाला इतकें कबूल आहे, कीं, कुतुबमिनार कोणीहि बांधला असो, त्याचें नक्षीकाम व कोरीव काम हें हिंदुपद्धतीचें आहे. यावरून बहुतेक कामकरी व कारागीर हिंदू असावे, असें अनुमान करतां येतें.

ही गोष्ट मनोऱ्याच्या शेजारींच बांधलेल्या जुम्मामशिदीवरून स्पष्टपणें दिसून येते. ही मशीदहि कुतुबुदिनानें ११९१ मध्यें सुरू केली. म्हणजे

दिल्ली सर केल्याबरोबर या कामाला सुरुवात झाली. ' ही मशीद हिंदु देवळाच्या जोत्यावर व पुष्कळशा देवळांच्याच दगडांनीं बांधलेली आहे. या गोष्टीला हवा तेवढा पुरावा आहे. मशीद फार मोठी आहे. दर्शनी भिंतीमध्यें पांच मोठमोठ्या कमानी आहेत. या कमानींतून आंत गेल्या-वर मनुष्य मोठ्या मंडपांत येतो. या मंडपाचें छप्पर हिंदु देवळांच्या उंच खांबांवर बांधलेलें आहे. सर्व भिंतींवर व खांबांवर हिंदु देवांचीं व इतर चित्रें कोरलेलीं अजून दृष्टीला पडतात. पूर्वीं हीं चित्रें मुसलमानांच्या दृष्टीला पडूं नयेत म्हणून त्यांवर चुन्याचा गिलावा केलेला होता. पण आतां तो पडून गेला आहे, व यामुळें जुनीं चित्रें व लेख दृग्गोचर होऊं लागले आहेत. यावरून या मशिदींत बरेंच काम हिंदु देवळांच्या दगडांचें केलेलें आहे, असें निर्विवाद सिद्ध होतें.

या मशिदीच्या अंगणांत दिल्लीचा प्रसिद्ध लोहस्तंभ आहे. हा स्तंभहि कुतुबमिनाराप्रमाणें एक अजब चीज आहे. हा लोखंडाचा खांब ओतीव आहे. याचा व्यास सोळा इंच आहे, व त्याची जमिनींत पुरल्यासकट उंची साठ फूट असावी. म्हणजे त्यांत एकंदर पावणेपांचशें मण लोखंड आहे. इतक्या वजनाचा स्तंभ ओतला असेल कसा, याबद्दल अत्यंत आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं ! या स्तंभावर सर्वांत जुना जो शिला-लेख आहे, त्यांत त्या स्तंभाला ' कीर्तिभुज ' असें म्हटलें असून तो 'भाव' नांवाच्या राजानें उभारला, असें लिहिलें आहे. या लेखाचीं अक्षरें गुप्त काळच्या अक्षरांसारखीं आहेत. यावरून हा शिलालेख व हा स्तंभ गुप्त घराण्याचा पाडाव करणाऱ्या एकाद्या राजाचा असावा, म्हणजे तो सन ३१९ मधला असावा, असा अंदाज केलेला आहे. हा लोहस्तंभ दिल्लीच्या तुवर घराण्याचा संस्थापक अनंगपाल या राजानें उभारला, व ' हा लोह-स्तंभ वासुकी सर्पाच्या डोक्यापर्यंत भिडला आहे; हा लोहस्तंभ अचल आहे तोंपर्यंत तुझें राज्य राहील,' असें एका विद्वान् ब्राह्मणानें राजाला सांगितलें; पण त्याला तें खरें वाटलें नाहीं, म्हणून त्यानें तो स्तंभ उक-रून पाहिला, तों त्याला त्या खांबाचा बुंधा वासुकीच्या रक्तानें भरलेला दिसला ! आपल्या कुशंकेबद्दल राजाला वाईट वाटलें, व त्यानें तो स्तंभ

पुनः उभारविला; पण तो पहिल्यासारखा अचल झाला नाहीं; ढिला राहिला म्हणून या शहराला ' दिल्ली ' किंवा ' ढिली ' हें नांव पडलें, अशी दंतकथा आहे. ही दंतकथा निरनिराळ्या बखरकारांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें सांगितली आहे, तरी तिचा मथितार्थ सामान्यतः एकच आहे. ही दंतकथा कशी व केव्हां निघाली असेल, हें समजणें आतां कठिण आहे. असो.

कुतुबमिनार व त्या शेजारची मशिद ज्या आंतल्या किल्ल्यांत आहे, त्याला लालकोट म्हणतात. आतां हा बहुतेक पडला आहे; पण हा किल्ला दुसऱ्या अनंगपालानें सन १०६० मध्यें बांधला. याच्यासभोंवार आणखी एक किल्ल्याचा तट आहे. त्याला रायपिठोऱ्याचा किल्ला म्हणतात. हा किल्ला पृथ्वीराज चव्हाणानें मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून दिल्लीचें संरक्षण करण्याकरितां बांधला असावा, असा अंदाज आहे. या दोन्ही किल्ल्यांचे आतां मोडक्यातोडक्या तटाखेरीज फारसे अवशेष राहिले नाहींत.

इतकें पाहून झाल्यावर आम्ही या ठिकाणाहून परत फिरलों. परत येतांना आम्ही आल्या मार्गानें गेलों नाहीं, तर दुसऱ्याच रस्त्यानें जाऊन प्रथमतः हुमायुनाचें कबरस्थान पाहिलें. ही कबर हुमायून बादशहाच्या बेगमेनें त्याच्या मरणानंतर सन १५५४ मध्यें बांधली. अर्थात् मोंगल-घराण्याच्या वास्तुकलेचा हा अगदीं प्रारंभींचा मासला आहे. या कबरेभोंवतीं मोठी बाग असून तिच्या सभोंवार तट आहे. याला एकंदर चार दरवाजे आहेत. ही इमारत तांबड्या दगडाची आहे. मात्र मधला घुमट शुद्ध संगमरवरी आहे. इमारतीच्या चार कोनांना चार मनोरे आहेत. हें कबरस्थान दिल्लीच्या पहाण्यालायक इमारतींपैकीं एक आहे यांत शंका नाहीं.

येथून निघून आम्ही पुराणा किल्ला पहावयाला गेलों. हा किल्ला पूर्वीं अगदीं मातींत गडदून गेला होता. पण आम्ही गेलों त्या वेळीं सर्व किल्ल्यांत जारीनें काम चालू होतें. किल्ल्याचा तट वगैरे सर्व भाग मोकळे करण्यांत आले होते, व किल्ल्याच्या आंत उंच सखल भागाची सपाट जागा बनविण्याचा क्रम चालू होता. या किल्ल्यांतील आवार फारच मोठें आहे. या सर्व आवारांत नव्या दिल्लीकरितां मोठा थोरला पार्क करावयाचा

आहे, व म्हणूनच सर्व जागा साफसुफ व सपाट करण्यांत येत आहे, असें आम्हांला कळलें.

या किल्ल्याला इंद्रप्रस्थ म्हणतात. हा किल्ला हुमायून बादशहानें सन १५३३ मध्यें दुरुस्त केला. या किल्ल्याच्या भिंती व बुरूज फारच प्रचंड असून पूर्वकाळीं त्यासभोंवतीं यमुना नदीचा कालवा आणिलेला होता. या किल्ल्याची पुढें शीरशाहा बादशहानें आणखी दुरुस्ती केली. या किल्ल्यांत शीर मंदिर व एक मशीद इतकींच जुनीं कामें पाहण्यासारखीं आहेत.

हा किल्ला पाहून होतो तों बारांचा सुमार झाला म्हणून आम्ही तेथून निघालों, तों दिल्लीच्या दुसऱ्या बाजूच्या वेशीनें आंत शिरून आमच्या बिऱ्हाडीं सुमारें एक वाजतां जाऊन पोहोंचलों.

जेवणखाण झाल्यावर आम्ही सायंकाळपर्यंत विश्रांतीच घेतली, व अगदीं संध्याकाळीं शेजारच्या एका बागेंत हवा खाण्याकरितां गेलों. या बागेंत बंडामध्यें मर्दुमकी गाजविलेल्या निकलसनसाहेबाचा पुतळा उभारला आहे.


येथें बसलों असतांना दिल्लीच्या पुराणकाळापासूनच्या स्थित्यंतराची हकीकत मनांत येऊन एक प्रकारचा चमत्कार वाटला. काय असेल तें असो; पण या ठिकाणचा हिंदुस्तानाशीं त्याची राजधानी म्हणून किती तरी दिवसांचा संबंध आहे. इंद्रप्रस्थ हें या ठिकाणचें मूळचें नांव. ही पांडवांची राजधानी. पांडव कोणत्या काळीं झाले, व महाभारतांतील कौरव पांडवांचें युद्ध कधीं झालें याबद्दल अजूनहि विद्वानांत वाद आहे. कांहींजण या युद्धाला ख्रिस्तीशकापूर्वीं पांचसातशें वर्षें इतक्या काळांत आणून सोडतात, तर कांहींजण तो काळ तीन हजार वर्षें मागें ढकलतात. यांपैकीं खरें कोणतें, हें समजणें कठीण आहे. पण अगदीं अलीकडे पुराणांतील निरनिराळ्या राजांच्या वंशावळींच्या साहाय्यानें व पुराणांत असलेल्या परीक्षिताच्या जन्माच्या काळापासून नंदाच्या कारकीर्दीपर्यंतच्या उल्लेखावरून भारतीययुद्ध ख्रिस्तीशकापूर्वीं पंधराशेंच्या सुमाराला झालें असावें, असा जो अंदाज करण्यांत आला आहे तो खरा असावा, असें



२ कन्यामहाविद्यालय—वीणावादन—जळंदर.



कन्यामहाविद्यालय, पाकशास्त्रवर्ग—जालंदर.



सुवर्णमंदिर—अमृतसर.

R. V. Bakre
130, Vithal Wadi
Kalbadevi, BOMBAY 2.



शीखपंथाचे गुरु—अमृतसर.

मला वाटतें. पांडवांच्या कालच्या खुणांना दंतकथेखेरीज आणि इन्द्रप्रस्थ व महाभारतांत आलेलीं इतर नांवें याखेरीज पुरावा नाहीं. दिल्ली हें नांव प्रथमतः इसवीसनापूर्वी पाऊणशें वर्षांच्या सुमाराला पडलें असावें. पुढें ७९२ वर्षें दिल्ली ही राजधानी नव्हती, असा उल्लेख आहे, व दिल्लीला महत्त्व त्या काळीं नसावें, असें फेहायन व हुएनसांग या दोन्ही चिनी प्रवाशांच्या प्रवासांत दिल्लीचा उल्लेख नाहीं, यावरून खरें ठरतें. तुवर घराण्याचा प्रस्थापक अनंगपाल यानें पुनः दिल्ली शहर वसविलें, तेव्हांपासून हिंदु दिल्लीच्या वैभवाला सुरुवात झाली. याच घराण्यांतला दुसरा अनंगपाल यानें १०६० मध्यें लालकोट हा किल्ला बांधला, व जुन्या दिल्लीचें पुनरुज्जीवन केलें. पुढें तुवर घराण्याचा चव्हाण घराण्यांतील विशालदेव यानें पराभव केला. या विशालदेवाचा नातू पृथ्वीराज हाच चव्हाण आणि तुवर या दोन्ही घराण्यांचा नातू होता. कारण, पृथ्वीराजाची आई अनंगपालाची मुलगी होती. हा पृथ्वीराज मोठा पराक्रमी राजा होता. त्यानें सर्व उत्तरहिंदुस्तानभर आपलें साम्राज्य केलें. या पृथ्वीराजाचा पराभव ११९१ मध्यें कुतुबुदिन घोरी या मुसलमानानें केला, व तेव्हांपासून दिल्ली ही मुसलमान बादशहांची राजधानी झाली. पुढें बहुतेक प्रत्येक मुसलमानी बादशहानें नवें शहर वसविलें, व या शहरांचा व किल्ल्यांचा क्रम दक्षिणेकडून उत्तरेकडे होता. शेवटचें दिल्ली शहर म्हणजे हल्लींचें दिल्ली शहर शहाजहान बादशहानें बांधिलें. औरंगजेबापासून दिल्लीच्या बादशहांचें महत्त्व कमी झालें, व हिंदुस्तानांत मराठे, शीख वगैरेंची सत्ता होऊन शेवटीं इंग्रजांचें साम्राज्य स्थापन झालें, व या दर्यावर्दी लोकांनीं कलकत्ता हिंदुस्तानची राजधानी केली. पण काय नेमानेम असेल तो असो; कांहीं अकल्पित कारणांनीं पुनः दिल्ली हेंच ठिकाण हिंदुस्तानची राजधानी बनलें, व इंग्रजांच्या वैभवाला साजे अशी राजधानी जुन्या इंद्रप्रस्थासमोर होऊं घातली आहे. या शहराचीं हीं स्थित्यंतरें मनांत येऊन मला विलक्षण आश्चर्य वाटलें.



४

# जलंदर कन्यामहाविद्यालय.

माझ्या प्रवासाच्या कार्यक्रमांत ज्या संस्थेची माहिती व इतिहास यांचें शब्दचित्र रेखाटण्याचा माझा मानस होता, त्या जलंदर कन्यामहाविद्यालयाची कांहीं शिष्य शिक्षक मंडळी मुंबई इलाख्यांतील बडोदें, मुंबई व पुणें या तीन ठिकाणीं एकदां येऊन गेली आहेत, व त्यांचीं या तीनहि ठिकाणीं संस्कृतांत व हिंदींत व्याख्यानें झालेलीं आहेत. मंडळीचा तो सफेत, साधा व समान पोषाख, संस्कृतांत व हिंदींत अस्खलित बोलण्याची पद्धति, आणि उदार व देशाभिमानी विचार यांचें प्रत्यक्ष दर्शन ज्यांना झालें आहे, त्यांच्या मनांत या कन्यामहाविद्यालयाच्या योग्यतेविषयीं उत्तम कल्पना आल्यावांचून राहिली नाहीं. या मंडळीच्या स्वारीच्या निमित्तानें या विद्यालयासंबंधीं बरेच लेख व उल्लेख वर्तमानपत्रें आणि मासिकपुस्तकें यांमध्यें येऊन गेले आहेत. यामुळें महाराष्ट्रीयांना हें कन्यामहाविद्यालय थोडेंफार श्रुतिपरिचित आहे असें धरून चालण्यास हरकत नाहीं. आतां या विद्यालयांत जाऊन तेथली जी प्रत्यक्ष स्थिति व व्यवस्था मी पाहिली, त्यांचें थोडक्यांत वर्णन देण्याचा माझा या लेखांत विचार आहे.

आम्ही कन्यामहाविद्यालय सकाळींच पहाण्यास गेलों. कारण, उन्हाळ्यामुळें येथें मेपासून जुलै–आगष्टपर्यंत सकाळची शाळा भरवावी लागते. पहिल्यानें आम्ही गांवाबाहेर असलेल्या मुख्य विद्यालयाकडे गेलों. गांवाबाहेर विद्यालय नुकतेंच नेलें आहे, व अजून तेथें मुख्य इमारती व्हावयाच्या आहेत. मुख्य इमारतीच्या सभोंवार चौकाकार असे एकमजली सोपे बांधण्यांत आले आहेत. तेथेंच सध्यां वर्ग बसतात. पुढें या सोप्यांचा रहाण्याकरतां उपयोग व्हावयाचा आहे.

१६०८



आम्ही अगदीं खालच्या वर्गापासून तों थेट संस्कृत कॉलेजच्या वर्गापर्यंत सर्व वर्ग पाहिले. कोठें गणित चाललें होतें, तर कोठें इतिहास चालू होता; कोठें संस्कृताचें अध्ययन सुरू केलें होतें, तर कोठें इंग्रजीचा तास चालू होता; कोठें गायनाची लकेर ऐकूं येत होती, तर कोठें सतारवादनाचा नाद ऐकूं येत होता; कोठें शिवणकाम सुरू होतें, तर कोठें चित्रांचें काम चालू होतें. याप्रमाणें बौद्धिक, ललित व शारीरिक व्यापारांत व्यग्र असलेल्या लहानमोठ्या—पण सारख्या पोषाखाच्या—कन्यांचे वर्ग पाहून आम्हांला फार कौतुक वाटलें.

सर्व ठिकाणीं शिक्षण हिंदी भाषेंतून चालू होतें. एका झाडाखालीं दोनतीन मुली संस्कृत शिकत होत्या. त्यांना एक पंडित संस्कृतांत कांहीं भाग समजावून देत होता. मुली संस्कृतांतच उत्तर देत होत्या. या मुली पंजाब युनिव्हर्सिटीच्या ‘ शास्त्री ’ परीक्षेकरितां तयारी करीत आहेत, असें मला सांगण्यांत आलें. तेथील विद्यार्थिनींची ती संस्कृतांतील पारंगतता पाहून मला उत्तररामचरित या नाटकामधील तमसा व मुरला यांच्या संवादाची आठवण झाली, व पूर्वकालीन ऋषिपत्नींचें स्मरण झालें, आणि असें मनांत आलें, कीं, आर्य लोकांच्या प्रगतिकाळांत स्त्रियांना विद्येची जी मुभा होती, ती जर हल्लीं आमच्या सर्व स्त्रियांना मिळेल, तर स्त्रिया आपलें बुद्धिसामर्थ्य पुरुषांप्रमाणेंच प्रगट करतील, यांत संदेह नाहीं. ‘ बायका संस्कृत बोलावयाला लागल्या, ह्मणजे नुकत्याच वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें सूं सूं करतात, ’ ही मृच्छकटिकांतील टीका फक्त विदूषकी आहे, व ज्या वेळीं स्त्रियांना संस्कृतवाङ्मयोपवनांत मज्जाव झाला, त्या काळची ही हेटाळणी आहे, असें या विद्यार्थिनी पाहून माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आलें.

सर्व वर्ग पाहून झाल्यावर आम्ही, मुली बागेंत काम करीत होत्या तेथें गेलों. प्रत्येक मुलीला जमिनीचा एक लहान तुकडा देतात, व त्यांत मुली बागबगीचा बनविण्याचें काम शिकतात. कांहीं मुली खुरपीत आहेत, कांहीं कुदळीनें जमीन उखळीत आहेत, तर कांहीं ताटव्याला पाणी घालीत आहेत, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें. नंतर आम्ही मुलींच्या जेवणाच्या

व रहाण्याच्या जागा पाहिल्या. सर्व ठिकाणीं आम्हांला टापटीप, नीटनेटकेपणा, व व्यवस्थितपणा दिसून आला. स्वभावतःच मुलांपेक्षां मुलींमध्यें टापटीप अधिक असते, व या प्रवृत्तीला शाळेंत उत्तेजन दिलें गेलें म्हणजे मुलींचा तो स्वभावच बनतो. असो.

हें गृहोद्यान पाहून होतें आहे, तोंच शाळेचे संस्थापक लाला देवराज यांनीं कांहीं मुलींना अंगणांत बोलावून आणलें, व त्यांना एक अभिनय-गीत म्हणावयाला सांगितलें. गीत हिंदी भाषेंत असल्यामुळें आम्हांला सर्व समजलें नाहीं; तरी पण साधारण गोषवारा कळत होता. त्या गीतांत वर्णिलेल्या कामाचा व कृत्याचा अभिनय मुली करीत होत्या. असलीं अभिनयगीतें अगदीं खालच्या वर्गांतील मुलींकडून म्हणवून घेण्याचा परिपाठ आहे, असें आम्हांला समजलें. या पद्धतीपासून सर्वांना एक तालांत म्हणण्याची संवय होते. शिवाय अभिनयापासून थोडासा व्यायामहि होतो. याप्रमाणें ज्ञान, आनंद व व्यायाम या तिहींचा लाभ या अभिनयगीतांपासून होतो.

आमचे वर्ग पहाणें चालू असतां लाला देवराज यांनीं " सर्व मुलींना अंगणांत एके ठिकाणीं जमवून आपली ओळख करून देण्याची माझी इच्छा आहे; त्या वेळीं आपण मुलींना चार उपदेशपर शब्द सांगावे अशी आपणाला माझी विनंति आहे. " असें मला म्हटलें. " इतकें करण्याची जरुरी नाहीं, " असें मी म्हटलें तरी ते ऐकेनात ! तेव्हां हा आदर व बहुमान श्रीयुत प्रो. कर्वे यांचा ( कारण त्यांनीं माझ्याबद्दल लाला देवराज यांना लिहिलें होतें. ) व फर्ग्युसन कॉलेजचा आहे, असें मनांत समजून आणि तो आदर व बहुमान ज्याचा त्याला मनांतल्या मनांत पोहोंचता करून मी लालाजींच्या म्हणण्याला रुकार दिला; तेव्हां त्यांनीं सर्व मुली अंगणांत आणून उभ्या केल्या.

दीडशें पावणेदोनशें मुलींचा तो समुदाय पाहून मला या विद्यालयाच्या कामगिरीबद्दल सानंद कौतुक वाटलें. जो प्रांत इंग्रजी अंमलाखालीं बऱ्याच उशीरानें आला, जेथें पुरुषांचेंहि शिक्षण इतर प्रांतांचे मानानें कमी आहे, व ज्या प्रांतांत पडद्याचा अंमल जारीनें चालू आहे, त्या प्रांतांतच पड-

द्याची चाल बाजूला सारून इतक्या मुली विद्यार्जनासाठीं पुरुष शिक्षक असलेल्या शाळेंत गोळा होतात, हें पाहून आर्यसमाजाच्या कर्तृत्वशक्तीबद्दल कोणाला आनंद वाटणार नाहीं ? शिवाय या शाळेंत विद्यार्थिनींचा सारखा पोषाख ठरविलेला आहे. ठरीव पोषाखाची पद्धति मी गुरुकुलांतहि पाहिली होती. येथेंहि तशीच समान पोषाखाची रीत दिसली. जी समान पोषाखाची गोष्ट आमच्या इकडे मोठमोठ्या शाळांना करतां आली नाहीं व येत नाहीं, ती गोष्ट मुलींसंबंधींसुद्धां पंजाबांत घडून येते; यावरून पंजाबांत प्रगतिप्रियता इतर प्रांतांपेक्षां अधिक आहे, अशी खात्री पटल्या खेरीज रहात नाहीं.

सर्व मुली याप्रमाणें जमल्यावर लाला देवराज यांनीं माझ्याबद्दल चार शब्द सांगून मला बोलण्यास विनंति केली. येथपर्यंत सर्व ठीक झालें पण या वेळीं माझ्या मनाला किती वाईट वाटलें, याची वाचकांना कल्पनाहि येणें अवघड आहे. आपल्या समोर असलेल्या मुली आपल्याच देशांतील आहेत; त्या सर्व हिंदु आहेत; नवीन आर्यसमाजपंथी आहेत; त्यांचे धर्मग्रंथ व आपले धर्मग्रंथ एकच आहेत; रामायण, महाभारत हीं पुराणें व त्यांतील थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें हीं दोघांनाहि परिचित आहेत. सारांश, जुनी संस्कृति एकच असून आपलें हृद्गत या मुलींना सांगण्याकरितां मला परक्या ‘ इंग्रजी ’ भाषेचा आश्रय करावा लागला, हें पाहून माझी मलाच लाज वाटली ! आपल्या देशांत जर एकराष्ट्रीयत्व चांगलें बद्धमूल व्हावयाचें असेल, आमच्या मुलांबाळांमध्यें लहानपणापासून राष्ट्रीय भावना उद्भूत व्हावयाच्या असतील, तर हिंदुस्तानवासीयांना एक भाषा अवश्यक आहे, व ही एक भाषा इंग्रजी होणें शक्य नाहीं. देशांतील तेहतीस कोटि प्रजेला बोलण्यासारखें किंवा समजण्यासारखें इंग्रजी येणें दुरापास्त आहे. हिंदी भाषाच हिंदुस्तानची एकराष्ट्रीय भाषा होण्याला कांहीं अंशानें तरी पात्र आहे, असें मला वाटलें. यांत अडचणी अतिशय आहेत व विशेषतः ही गोष्ट शक्यकोटींत येण्यास दक्षिणहिंदुस्तानची मोठी धोंड वाटेंत आहे हें खरें आहे. पण त्या क्षणीं तरी आपल्याला हिंदी येत नाहीं, याबद्दल मनाला थोडासा खेद झाला. पण आयत्या वेळीं अशा वाईट वाट-

ण्याचा उपयोग काय ? भाषा आयत्या वेळीं थोडीच येते आहे ! अर्थात् सर्व लाज बाजूला ठेवून मला जें काय त्या मुलींना सांगावयाचें होतें, तें मी इंग्रजींत सांगितलें, व त्याचा गोषवारा लालाजींनीं पुनः हिंदींत सांगितला, आणि मग त्यांनीं ' **शिष्टागमनेऽनध्यायः** ' या न्यायानें मुलींना ' आतां सुटी आहे ' म्हणून जाहीर केलें; तेव्हां सर्व मुली आनंदानें आपापल्या खोल्यांत गेल्या.

याप्रमाणें कन्यामहाविद्यालयाचा मुख्य भाग पाहून झाल्यावर आम्ही या विद्यालयाची गांवांतली शाखा पहावयाला गेलों. ही इमारत विद्यालयाच्या मालकीची आहे, व ती वाढविण्याला विद्यालयांतून शिकून गेलेल्या एका श्रीमान् बाईनें पैसे दिले, असें आम्हांला समजलें. त्या देणगीच्या स्मारकासंबंधीं संगमरवरी दगडावरील लेख आम्ही पाहिला. हल्लीं या ठिकाणीं फक्त प्राथमिक शाळा होती. या सर्व मुली गांवांतून येतात. या मुलींचेहि पोशाख एकसारखेच होते. लालाजींनीं असें सांगितलें, कीं, विद्यालयाच्या अनुकरणानें पंजाबांत लहान मुलींचा पोषाख आतां बहुतेक एक तऱ्हेचाच झाला आहे. लहानशाच बाबतींत पण केवढी क्रांति या विद्यालयानें घडवून आणली आहे, हें आम्हांला दिसून आलें. येथेंहि आम्ही सर्व वर्ग हिंडलों, मुलींच्या शिवण–विणकामाचे मासले पाहिले, व शाळेच्या शिक्षकमंडळीचे आभार मानून आम्ही लाला-देवराज यांच्या घरीं आलों. आतां या महाविद्यालयाच्या उत्पत्तीचें, वाढीचें व त्याच्या विशेषांचें थोडें दिग्दर्शन करून हा लेख संपवूं.

जलंदरचें कन्यामहाविद्यालय ही संस्था या नांवानें चालू झाल्यास फार वर्षें झालेलीं नाहींत. पण तिची पूर्वपरंपरा बरीच जुनी आहे. जलंदरच्या आर्यसमाजाच्या मुख्य सभेनें १८८६ मध्यें ' झनाना शाळा ' नांवाची एक शाळा काढली. त्यांत १२ मुली शिकत होत्या. पण शिक्षकिणींच्या दुर्भिक्षामुळें व पैशाच्या अभावामुळें शाळा रडतकडत चालली होती. पुढें १८९० मध्यें याच शाळेचें ' Girls School ' मध्यें रूपांतर झालें. पुढें लाला देवराज हे या शाळेची व्यवस्था पाहूं लागले, व त्यांच्यासारखा श्रीमंत–पण स्त्रीशिक्षणाचा खरा कैवारी–शाळेला लाभल्यामुळें शाळेला

चांगलें स्वरूप येणार, असा रंग दिसूं लागला. यामुळें परकीय नांव जाऊन 'कन्यापाठशाळा' असें देशी नांव या शाळेला मिळालें. १८९२ सालीं या शाळेंत ५५ मुली शिकूं लागल्या. पडद्याची चाल जारीनें चालू असलेल्या प्रांतांत ही प्रगति कांहीं कमी नव्हे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

ता. १५ जून १८९६ या दिवशीं या शाळेला 'कन्यामहाविद्यालय' असें अन्वर्थक नांव देण्यांत आलें. कारण लहानशा प्राथमिक शाळेला आतां मोठ्या विद्यालयाचें रूप येत चाललें होतें. या विद्यालयाची स्वतंत्र संस्था बनली, व ती रजिस्टर करण्यांत आली. शिक्षणक्रमांतहि पुष्कळ सुधारणा करण्यांत आली. या संस्थेचे नियम व ध्येय ठरविण्यांत आलें. याप्रमाणें संस्थेला कायमपणा येऊन तिच्याबद्दल लोकांचा विश्वास वाढत चालला. त्यामुळें दूरदूर ठिकाणाहून मुली विद्यालयांत येऊं लागल्या.

पुढें कन्यामहाविद्यालयाला जोड म्हणून विधवाभवनहि काढण्यांत आलें, व नंतर दुष्काळांत अनाथ झालेल्या मुलींकरितां एक अनाथालय काढलें होतें त्या मुलींची व्यवस्थाहि याच संस्थेकडे देण्यांत आली. अशा तऱ्हेनें या संस्थेचा कारभार वाढत चालला. प्रथमतः हें कन्यामहाविद्यालय गांवांतील एका घरांत होतें. पुढें तें संस्थेच्या मालकीचें घर झालें. पण मुली—विशेषतः बाहेरगांवच्या मुली—वाढूं लागल्या तसतशी बोर्डिंगाची आवश्यकता वाढत चालली, व गांवाबाहेर विद्यालय नेण्यांत आलें. गांवांतल्या घरांत प्राथमिक शाखा मात्र ठेवण्यांत आली. गांवाच्या बाहेरच्या शाळेंत एकंदर दोनशेंच्या वर विद्यार्थिनी आहेत, व गांवांतील प्राथमिक शाळेंत सुमारें १७५ मुली आहेत.

शाळेच्या गांवांतील व बाहेरील इमारती, जागा, पुस्तकालय, सामानसुमान वगैरे सर्व मालमत्ता साठ हजारांच्या वर गेली आहे. नव्या मुख्य इमारतीकरितां लाखदीडलाख रुपये जमविण्याची खटपट चालू आहे. एकंदर शाळेंत शिक्षक व शिक्षकिणी मिळून सुमारें पंचवीस लोक आहेत. यांपैकीं कांहीं शिक्षकिणी विद्यालयांतच तयार झालेल्या आहेत, व त्या मोफत काम करतात, ही प्रशंसनीय गोष्ट आहे.

येथपर्यंत विद्यालयाच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास आणि सामान्य

आंकडेमोडी माहिती दिली. आतां या संस्थेच्या विशेषांकडे वळूं.

या विद्यालयाचा पहिला विशेष म्हणजे ही शाळा आर्यपंथी लोकांनीं आपल्या धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूनें काढलेली आहे. यामुळें धार्मिक-शिक्षण व विशेषतः आर्यसमाजी धार्मिकशिक्षण हें एक शिक्षणांतलें मुख्य अंग आहे. व्यावहारिकशिक्षण हें दुसरें अंग आहे. म्हणूनच या शाळेंत प्रथमतः सर्व मुली जमून एक देवाची प्रार्थना करतात, व मग शाळेच्या शिक्षणक्रमाला सुरुवात होते. ही आर्यसमाजाची धार्मिकशिक्षणाची शाळा असल्यामुळें अर्थातच या शाळेच्या शिक्षणक्रमाचा सरकारी विद्याखात्याशीं कांहींएक संबंध नाहीं, व विद्याखात्याचा ताबाहि या शाळेवर नाहीं. या शाळेंत अगदीं पहिल्या इयत्तेपासून तों थेट कॉलेजच्या 'शास्त्री' परीक्षेला तयार करणाऱ्या वर्गापर्यंत धार्मिकवाङ्मय हा एक आवश्यक विषय आहे. इयत्तेच्या मगदुराप्रमाणें भजनापासून तों थेट गीतेच्या सार्थ अध्ययनापर्यंत धार्मिक शिक्षण दिलें जातें.

या शाळेचा दुसरा विशेष म्हणजे येथें चार वर्षांचें प्राथमिक शिक्षण संपल्यापासून संस्कृत हा विषय आवश्यक आहे, व तो सर्व इयत्तांमध्यें शिकविला जातो. मुलींना थोडेंफार संस्कृत बोलतां येईल, अशी तजवीज केली जाते. म्हणजे आठवड्याच्या वादविवाद सभेंत कधीं संस्कृतांत, तर कधीं इंग्रजींत व सामान्यतः हिंदी भाषेंत वादविवाद चालतात. यामुळें कांहीं मुलींना तरी संस्कृत बोलण्याचा सराव होतो.

या शाळेचा तिसरा विशेष म्हणजे येथें सर्व शिक्षण हिंदी भाषेच्या द्वारें देण्यांत येतें. इतिहास, भूगोल, गणित, आधिभौतिक शास्त्रें वगैरे सर्व विषय वरच्या इयत्तेपासून तों खालच्या इयत्तेपर्यंत हिंदी भाषेंतच शिकविले जातात. यामुळें मुलींना विषय समजण्याला सोपें जातें; कालाचा व मुलींच्या स्मरणशक्तीचा उगाच अपव्यय होत नाहीं, व म्हणूनच थोड्या वर्षांत मुलींना अधिक ज्ञान संपादन करतां येतें.

या शाळेचा चवथा विशेष म्हणजे येथें मुलींना व स्त्रियांना अवश्य असें गृहशिक्षण व ललितकलांचें शिक्षण देण्यांत येतें. गृहशिक्षणांत शारीरज्ञान, आरोग्यविज्ञान, शुश्रूषाशास्त्र, पाकशास्त्र वगैरे शास्त्रांचीं मूलतत्वें व सोपीं

सोपीं प्रमेयें यांचा अन्तर्भाव होतो व या सर्व गोष्टींचें सप्रयोग शिक्षण या विद्यालयांत दिलें जातें. त्याचप्रमाणें ललितकलांमध्यें गायनवादन, चित्र-कला, विणकला वगैरेचा अन्तर्भाव होतो व या बद्दलचेंहि प्रत्यक्ष शिक्षण येथें देण्यांत येतें.

या शाळेचा पांचवा विशेष म्हणजे येथें इंग्रजी हा ऐच्छिक विषय आहे. प्रत्येक मुलीनें इंग्रजी शिकलें पाहिजेच, असा सक्त नियम नाहीं. साधारण इंग्रजी समजण्याकरितां पुष्कळ मुली हा विषय घेतात, हें खरें आहे; पण पुष्कळ मुलींना हा विषय न घेतांसुद्धां आपला शिक्षणक्रम पुरा करतां येतो. उदार व उच्च शिक्षणात इंग्रजी हा विषय आवश्यक असावा किंवा नाहीं व स्त्रीशिक्षणांत त्याची आवश्यकता आहे किंवा नाहीं हा थोडा वादग्रस्त प्रश्न आहे. या विद्यालयांत संस्कृत मात्र सर्वत्र आवश्यक व इंग्रजी मात्र ऐच्छिक ही व्यवस्था निदान मला तरी फाजील पुराण-प्रियतेची द्योतक वाटली.

या शाळेचा सहावा व शेवटचा विशेष म्हणजे येथें स्त्रियांच्या शिक्ष-णाचा क्रम स्वतंत्र रीतीनें ठरविला आहे. येथें एकंदर दहा वर्षांचा शिक्ष-णक्रम आहे, व त्याचे चार भाग केले असून त्यांना जुनीं संस्कृत नांवें दिलीं आहेत, तीं अशीं:–प्राथमिक क्रमाला ‘ सभ्य ’ म्हणतात; मध्यक्र-माला ‘ शिक्षित ’ म्हणतात, उच्च क्रमाला ‘ दीक्षित ’ म्हणतात, व विश्ववि-द्यालयीन क्रमाला ‘ स्नातक ’ म्हणतात. अभ्यासाच्या व पुस्तकांच्या यादीवरून या दहा वर्षांत आपल्याकडच्या इंटरमिडिएट ( इंग्रजी शिवा-यकरून ) इतकें ज्ञान विद्यार्थिनींना मिळत असावें, असें दिसतें. मुली सरासरी सहाव्या वर्षी शिकू लागल्या, तर त्यांचा शिक्षणक्रम सोळाव्या वर्षी पुरा होईल. या वयांत बऱ्याच मुली लग्न होऊन सासरीं जातात. या हिशोबानेंच असा क्रम येथें आंखण्यांत आला आहे, असें उघड दिसतें.

जलंदर कन्यामहाविद्यालय म्हणजे पुणेंकरांना अर्थात् श्रीयुत प्रो. कर्व्यांच्या संस्थांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. पंजाबांतील व महाराष्ट्रांतील या दोन आदर्श संस्थांमध्यें पुष्कळ बाबतींत साम्य

आहे. दोन्ही संस्थांचा आरंभ नदीच्यां उगमाप्रमाणें अगदीं लहान प्रमाणावर होऊन कालेंकरून त्या संस्था वाढून त्यांनीं प्रचंड स्वरूप धारण केलें. दोन्ही संस्थांच्या प्रथमावस्थेंत त्यांना लोकापवाद व लोकनिंदा सहन कराव्या लागून नंतर त्या लोकप्रिय झाल्या. दोन्ही संस्थांच्या प्रगतीचें श्रेय दोन व्यक्तींच्या विलक्षण उत्साहाला आहे. ज्याप्रमाणें आमच्या इकडल्या संस्थांचा आत्मा प्रो. कर्वे होत, त्याप्रमाणें जलंदरच्या संस्थांचा आत्मा म्हणजे लाला देवराज हे होत. हे गृहस्थ या संस्थेचे प्रिन्सिपॉल आहेत. यांची या संस्थेबद्दलची कळकळ विलक्षण आहे. हे आपलें घरचें काम संभाळून या संस्थेकरितां जिवापाड मेहनत करतात. यांना प्रत्येक मुलगी ठाऊक आहे. ते सर्व मुलींजवळ पितृप्रेमानें वागतात, त्यांच्या बरोबर खेळतात, त्यांच्याबरोबर गातात, त्यांच्याबरोबर काम करतात. यामुळें सर्व मुलींचें लालाजींवर विलक्षण प्रेम आहे.

या दोनहि संस्था सर्वस्वीं लोकाश्रयावर चालू आहेत. यांना सरकारी मदत नाहीं, किंवा विद्याखात्याचा ताबा यांवर नाहीं. यामुळें अभ्यासक्रमांत फेरबदल करण्याची या संस्थांना पूर्ण मुभा आहे.

या दोनहि संस्थांत कुमारिका व विधवा यांचें सध्यां शिक्षण चालतें. मात्र या शिक्षणाची वाढ निरनिराळ्या क्रमानें झाली आहे. पंजाबांत कुमारिकांच्या शिक्षणाची संस्था आधीं निघून मग त्याला विधवाभवनाची जोड मिळाली. महाराष्ट्रांत अनाथबालिकाश्रम आधीं निघाला, व मग त्याला महिलाविद्यालयाची जोड देण्यांत आली. कांहीं दिवस या संस्था निरनिराळ्या चालल्या पण अलीकडे त्यांचा एकजीव होऊन दोन्ही संस्थांची एकच मोठी संस्था झाली आहे.

येथपर्यंत या दोन संस्थांतील साम्याचा विचार झाला. आतां त्यांतील वैषम्याचा विचार करूं. कन्यामहाविद्यालय हें एका प्रगतिपर पण विशिष्ट धर्मपंथाचें विद्यालय आहे. यामुळें अर्थातच येथें विशिष्ट धार्मिक व संस्कृत शिक्षण यांवर फार भर आहे व इंग्रजी केवळ ऐच्छिक विषय आहे. प्रो. कर्वे यांची संस्था ही कोणत्या एकाहि धर्मपंथाची संस्था नाहीं, यामुळें

येथें सामान्य धर्मविषयक व नीतिविषयक शिक्षण देण्यांत येतें व संस्कृतवर फार भर देण्यांत येत नाहीं व इंग्रजी विषय आवश्यक आहे.

याप्रमाणें कन्यामहाविद्यालय पाहिल्यामुळें माझ्या मनांत वरील प्रकारचे तुलनात्मक विचार येत होते. प्रो. कर्वे यांनीं नुकतेंच भारतमाहिलाविद्यापीठ स्थापन करून स्त्रीशिक्षणाच्या कामाला कळसच चढविला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंजाबांत अझून अशा प्रकारचा उपक्रम झाला नाहीं हें खरें पण कालेंकरून जलंदर कन्यामहाविद्यालयांतूनच स्त्रियांचें विश्वविद्यालय निघणार नाहीं कशावरून असें माझ्या मनांत आलें. असो.

आम्ही जलंदर येथें एक दिवसच होतों. सायंकाळ जलंदरच्या प्रमुख मंडळींची ओळख करण्यांत व त्यांच्याशीं संभाषण करण्यांतच आम्ही घालविला, व पहाटेला निघून आमच्या पुढच्या मुक्कामाला गेलों.

५

# अमृतसर व लाहोर.

माझ्या प्रवासाच्या कार्यक्रमांत पंजाबांतील अमृतसर व लाहोर हीं दोन प्रमुख शहरें पहाण्याचा पहिल्यापासून माझा बेत होता. माझे पुण्यांतील एक जुने स्नेही थोड्या दिवसांकरितां लाहोरला गेले होते, त्यांच्या येथेंच उतरण्याचा माझा विचार होता, आणि त्याप्रमाणें त्यांना दिल्लीहून मी पत्र लिहिलें होतें. मात्र अमृतसराला कोठें उतरावयाचें हें नक्की ठरलें नव्हतें. जलंदरला लाला देवराजांच्या येथ पुढील प्रवासाचा बेत ठरवीत असतां असें समजलें, कीं, अमृतसरला शीख लोकांच्या सुवर्णमंदिराखेरीज व तेथल्या प्रसिद्ध गालीच्यांच्या कारखान्याखेरीज विशेष कांहीं पाहण्यासारखें नसून हीं दोन्ही आम्हांला दोन तासांच्या आंत पाहतां येतील, व गाड्यांच्या वेळाहि अशा बेताला फार सोयीच्या आहेत. हें ऐकून अमृतसरला रहाण्याचा एक दिवस व उतरण्याच्या खटाटोपाचा त्रासहि वांचला, ह्मणून अर्थात्च आह्मांला आनंद वाटला व अमृतसरला दोनतीन तासांपेक्षां जास्त वेळ न थांबतां लाहोरास जाण्याचा आह्मी बेत कायम केला. अमूक गाडीनें आह्मी लाहोरास येतों, याबद्दल आमच्या मित्राला तार केली, व आह्मी गाडींत बसलों.

हल्लींची दिल्ली ही इंग्रजांच्या राजकीयप्रांतांच्या व्यवस्थेमध्यें जरी पूर्वी पंजाबांत मोडत असे ( आतां दिल्ली व त्या लगतचा भाग यांचा एक स्वतंत्रच प्रांत झाला आहे, ) तरी पण आर्य लोकांच्या फार जुन्या व्यवस्थेमध्यें या शहराचा अंतर्भाव मध्यदेशांत होत असे. कारण, गंगा व यमुना यांच्यामधल्या व यांच्या कांठच्या प्रदेशाला 'मध्यदेश' म्हणत. व सप्तसिंधूंनीं व्यापलेला प्रदेश म्हणजे पंजाब होय, व या प्रदेशाची दक्षिण-

मर्यादा म्हणजे सतलज ही नदी होय. कारण, या प्रांताच्या दक्षिणभागांतून ही नदी वहात गेली असून सात नद्या किंवा अर्वाचीन शब्दाप्रमाणें पंजाबांतील पांच नद्यांपैकीं ही पहिलीच नदी होय. जसजसा मनुष्य येथून उत्तरेला जातो, तसतशा त्याला इतर नद्या लागतात, व पंजाबच्या उत्तरसीमेला प्रचंड सिंधूनद लागतो. दिल्लीहून मुंबईच्या गाडीनें निघालें म्हणजे प्रथमतः सहारहाणपुरापर्यंत आपण संयुक्त प्रांतांतून उत्तरेला जातों, व मग ईशान्य दिशेला वळून पंजाबांत प्रवेश करतों.

दिल्लीस आम्ही रात्रीं नऊ वाजतां गाडींत बसल्यामुळें पंजाबप्रांतांत आम्ही केव्हां प्रवेश केला, हें आह्मांला समजलें नाहीं. पण पांचसाडेपांचांच्या सुमाराला लुधियाना व फिलेर या स्टेशनांच्या दरम्यान आम्हांला सतलज नदीवरील पूल लागला. ती समुद्रासारखी भासणारी–पण संथ प्रवाहाची–नदी पाहून मनाला फार आनंद झाला, व पूर्वीच्या आर्यांनीं या सर्व नद्यांना 'सिंधु (समुद्र)' व या प्रांताला 'सप्तसिंधु' असें कां म्हटलें, याचें मर्म ध्यानांत आलें. ज्या प्रांतांत प्रथमतः आमचे आर्य पूर्वज येऊन त्यांनीं तेथें वसाहत केली, ज्या ठिकाणीं पूर्वऋषींनीं सृष्टचमत्कारांना देव कल्पून इंद्र, वरुण, वायु, द्यावापृथिवी, उषस् वगैरे नांवांनीं त्या देवतांची प्रार्थना व स्तुति केली, व त्या देवतांकरितां यजनहवन केलें, ज्या प्रांतांतील नद्यांवरून त्यांनीं या प्रांताला 'सप्तसिंधु' असें नांव दिलें, ज्या नद्यांचें त्यांनीं कौतुकानें वर्णन केलें, त्या प्रांतांत पाऊल टाकल्यानें कांहीं एक अवर्णनीय मिश्र भावना मनांत उभी राहिली. आम्ही आर्यलोक निदान पांच हजार वर्षें तरी या भरतभूमींत सारखे रहात आलों आहोंत, व इतक्या जुन्या काळापासून ज्यांची संस्कृति सारखी चालत आली आहे, असे दुसरे लोक जगांत नाहींत, हें मनांत येऊन एक प्रकारच्या अभिमानाची मनोभावना उद्भूत झाली, तोंच हल्लींच्या आमच्या अवनत स्थितीचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहून लज्जेची छटा मनांत उद्भवली. आमच्या वेदकालीन पंजाबांतील ऋषिकाळची ती स्वातंत्र्यप्रियता, ती विजिगीषा, या आयुष्याची ती आवड, ती समाजाची एकजीवता हीं मनांत येऊन सानंद आश्चर्य वाटलें, तर हल्लींच्या आमच्या देशबांधवांची

लांगूलचालनपरायणता, ती समाधानी वृत्ति, या ससाराची ती विरक्तता, ती समाजांतील दुही आणि जातिभिन्नता हीं मनांत येऊन सखेद निराशा वाटली.

या मिश्र भावनांनीं मन व्यग्र असतां जलंदर स्टेशन आलें, व आह्मी पंजाबांतील या पहिल्या शहरीं मुक्काम केला. जलंदर येथें आम्ही चोवीस तासच होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या सहा वाजतांच्याच गाडीनें आम्ही मार्गस्थ झालों.

आजचा आमचा सगळा प्रवास दिवसाचा झाल्यामुळें पंजाब प्रांताची भूगोलविषयक स्थिति आम्हांला सहजच दृग्गोचर झाली. गंगा—यमुनाकांठच्या प्रदेशाप्रमाणें हा प्रांतहि अगदीं सपाट आहे. सर्व क्षितिजावर कोठेंहि डोंगर किंवा पर्वत दृष्टीला पडत नाहींत. जिकडे पहावें तिकडे सपाट व सफेत जमीनच्या जमीन! माझ्यासारख्या कोंकणांत व पुण्यानजीकच्या मावळ प्रांतांत सर्व आयुष्य गेलेल्या मनुष्याला हा सपाटच्या सपाट जमिनीचा देखावा अदृष्टपूर्वच वाटतो यांत शंका नाहीं. पंजाबांत पांच-सहा मोठमोठ्या नद्या व त्यांचे नवेजुने कालवे यायोगानें हा प्रांत चांगला लागवडीला आलेला दिसतो. वाटेवाट लहानलहान कालवे व त्यासभोंवार हिरवींगार शेतें दृग्गोचर होत होतीं.

पंजाबांत हिंदू व मुसलमान यांच्यामध्यें बरीच चुरस व तेढ आहे, असें मी ऐकलें होतें, व याचें बाह्य प्रत्यंतर या प्रांताच्या प्रत्येक स्टेशनवर दिसूं लागलें. गाडी स्टेशनवर आली नाहीं तोंच ‘हिंदु पाणी,’ ‘हिंदु चहा,’ ‘हिंदु दूध,’ हिंदु मेवा,’ ‘मुसलमान पाणी,’ ‘मुसलमान चहा,’ ‘मुसलमान दूध,’ ‘मुसलमान मेवा’ वगैरे आरोळ्या ऐकूं आल्या व त्याच अर्थाच्या पाट्याहि पहाण्यांत आल्या. दक्षिणी माणसाला हा प्रकार चमत्कारिक वाटतो. आपल्या इकडे मुद्धां ‘ब्रामणीया पाणी’ हा ध्वनि कोठें कोठें ऐकूं येत असे; पण अलीकडे ही ओरडण्याची पद्धत बंद झाल्यासारखीच आहे. एका दृष्टीनें पंजाबांत हिंदूमध्यें जातिभेदाचें बंड कमी आहे. तर या हिंदू-मुसलमानांच्या तेढीच्या दृष्टीनें इकडे हें बंड फार जोरांत आहे, असें ताव-

डतोब ध्यानांत आलें. सर्व हिंदुस्थानवासीयांनीं आपापले धर्मभेद व जातिभेद हे गौण करून आपण सर्व या अर्वाचीन भारतवर्षाचे बांधव आहोंत, अशी विस्तृत देशाभिमानाची भावना-अर्थात् हिंदु किंवा मुसलमान यापेक्षां 'मी हिंदी आहें,' ही भावना-जोरानें वाढण्यानेंच आपल्या देशाचें खरें कल्याण होणार आहे, अशी माझी दृढ समजूत असल्यामुळें हा द्वैधीभावाचा उच्चैर्घोष माझ्या कानांना अर्थातच फार कटु लागला. हा उच्चैर्घोष ऐकून मला वाटलें, कीं, आम्हांमध्यें द्वैधीभावाची कमाल झाली आहे. आम्ही समाजांत व माणसांत कृत्रिम भेदभाव निर्माण करूनच राहिलों नाहीं, तर हा कृत्रिम भेदभाव आम्ही नैसर्गिक वस्तूंपर्यंत नेऊन '**तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः**' या म्हणीला हरताळ लावून तिचें '**तीर्थोदकं च वन्हिश्च स्पर्शेणाशुची भवतः**' असें रूपांतर केलें आहे. तेव्हां अशा स्थितींत आमच्या देशाची धडगत कशी लागावी!

अशा प्रकारचे कांहींसे उद्विग्नतेचे विचार माझ्या मनांत येत असतांच आठांच्या सुमाराला अमृतसर स्टेशन आलें. येथून लाहोरास जावयाला आम्हांला साडे अकरा वाजतां गाडी होती. तेव्हां आम्हांला येथें तीनच तास थांबावयाचें होतें. म्हणून आमचें सर्व सामान आम्ही स्टेशनवर क्लोकरूममध्यें ठेविलें, व फक्त हँडब्याग हातांत घेऊन स्टेशनबाहेर पडलों. तेथलें सुवर्णमंदिर व स्टेशनजवळच असलेला गालीच्यांचा कारखाना पाहून परस्पर स्टेशनवर पोहोंचवावयाचा करार करून एक टांगा ठरवून आम्ही ताबडतोब निघालों.


स्टेशनपासून थोड्याच अंतरावर शहर सुरू होतें. शहरांतील रस्ते अरुंद व अस्वच्छच आहेत. वाटेंतच एका हलवायाच्या दुकानीं गरम दूध व चिनी ( साखरेला इकडे 'चिनी' म्हणतात ) घेतली. या प्रांतांत मुंबई इलाख्याप्रमाणें चहाचा फारसा प्रघात दिसला नाहीं, ही आनंदाची गोष्ट आहे. वाटोवाट हलवायांचीं मात्र दुकानें आहेत, व तेथें ताज्या पुऱ्या व तर्कारी ( भाजी ) मिळते. इतर मेवामिठाईहि असते, व उकळत असलेलें उत्तम दूधहि मिळतें. अर्थात् हे पदार्थ जास्त पौष्टिक आहेत. या प्रांतांत गहूं हेंच गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांचें सामान्य अन्न आहे. पंजा-

यांतील बहुतेक सर्व जाति मांसाहारीहि आहेत. यामुळेंच या प्रांतांतील लोक धिप्पाड, उंच, मजबूत व बांधेसूद दिसतात. वाटेनें जातांना मुसलमानांपासून हिंदु ओळखणें जरा कठिण जातें; पण शीख मात्र तेव्हांच ओळखतां येतो. त्याचे ते डोक्याचे पूर्णपणें वाढविलेले लांब केंस, भव्य दाढीमिशा, शुभ्र पोषाख, सतेज व शुभ्रवर्ण हीं पाहिलीं, म्हणजे हे लोक खरे लढवय्ये आहेत, याबद्दल खात्री पटते.

याप्रमाणें शीख व पंजाबांतील इतर लोक यांचें यदृच्छया निरीक्षण करीत आम्ही चाललों, तोंच सुवर्णमंदिराचें पिवळेंपिवळें जरद शिखर दिसूं लागलें व आम्ही प्रवेशद्वाराशीं आलों. प्रवेशद्वाराचा मनोरा व घड्याळ हीं अर्वाचीन आहेत. तेथल्या इतर देखाव्याला तीं अनुरूप नाहींत, असा तो मनोरा पहातांक्षणींच माझा समज झाला.

सुवर्णमंदिर हें एका मोठ्या तलावाच्या मधोमध बांधलेलें आहे. तलाव चौकोनी असून त्याच्या सर्व बाजू उत्तम तऱ्हेनें बांधलेल्या आहेत. सभोंवार चालत जावयाला संगमरवरी पायऱ्या आहेत. हा सर्व विस्तीर्ण तलाव, त्याच्या सभोंवारच्या त्या स्फटिकवत् पायऱ्या, तलावाचें तें किंचित् हिरवट पाणी, आणि मध्यें—खालीं सफेत व वर पिवळें असें—तें मंदिर, पाण्यांत पडलेलें त्या मंदिराचें तें स्पष्ट प्रतिबिंब हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिल्यानें या शीख धार्मिक स्थानाबद्दल फारच अनुकूल ग्रह होतो.

तलावाच्या कांठावरून देवळांत जाण्यास एक प्रशस्त पूल बांधलेला आहे. तोहि सर्व संगमरवरी दगडांनीं मढविलेला आहे व त्याच्या दोन्ही बाजूंना लहानसा संगमरवरी कठडा असून हारीनें सोनेरी मुलाम्याचे कंदील खांबांवर अडकविलेले आहेत. सुवर्णमंदिराचा अर्धा भाग संगमरवरी आहे, तर वरच्या अर्ध्या भिंतीपासून शिखरापर्यंत सोन्याच्या मुलाम्याचें काम केलेलें आहे. या विशेषावरूनच या मंदिराला ‘सुवर्णमंदिर’ असें नांव पडलें आहे. मंदिराच्या बाहेरच्या व आंतल्या भिंतींवर निरनिराळ्या रंगांच्या दगडांच्या जडावाचें नक्षीकाम केलें आहे, तें प्रेक्षणीय आहे. पण या मंदिराला त्या नक्षीचा थोडा अतिरेक झाला आहे, असा भास होतो. यामुळें हें मंदिर फार श्रीमंतीथाटाचें दिसतें खरें, पण अभिरुचीच्या




३ दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज--लाहोर.



दयानंद वैदिक कॉलेज वसतिगृह—लाहोर.



जहांगिराची क़बर—लाहोर.



जहांगिराची कबर, अंतर्भाग—लाहोर.

दृष्टीनें थोडी सौंदर्यहानि होते, असें म्हणणें प्राप्त आहे. या मंदिरांत कोणतीहि मूर्ति नाहीं. कारण शीख धर्म हा मूर्तिपूजेविरुद्ध आहे. शीख धर्माचा आद्यग्रंथ जो ' ग्रंथसाहेब ', त्याची एक प्रत मंदिराच्या मधोमध एका सिंहासनावर ठेवलेली आहे.

मंदिराच्या वरच्या मजल्यावर शीख पंथाचे उपाध्याय ' ग्रंथसाहेबां'-तील कांहीं भाग वाचून त्याचें विवरण करतात. आम्ही मंदिरांत गेलों, तेव्हां बराच स्त्रीपुरुष समाज जमलेला होता. त्यांचा तो एक तऱ्हेचा शुभ्र पोषाख पाहून आम्हांला कौतुक वाटलें. आपल्या इकडे एखाद्या देवळांत पुराण चाललें असतां जसा देखावा दृष्टोत्पत्तीला येतो, तसाच तेथला देखावा होता. आम्ही या ठिकाणीं क्षणभर उभे राहिलों, आणि मग सभोंवारच्या ग्यालरींतून तलावाची व पलीकडच्या इमारतीची शोभा पहातपहात मंदिराला प्रदक्षिणा घातली. आमच्या मागें दक्षिणा मागणाऱ्या शीख भटांची टकळी लागली होती. येथें सुद्धां इतर पवित्रस्थानांप्रमाणें पंड्यांचा सुळसुळाट आहेच, असें आम्हांला दिसून आलें.

हें शीखपंथी सुवर्णमंदिर शीखधर्माचा प्रवर्तक गुरु नानक याच्या काळचें नाहीं. पण या पंथाचा जसजसा प्रसार होत चालला, तसतसें हा धर्म मूर्तिपूजक नसतांनासुद्धां नवपंथीय सर्व लोकांना एके ठिकाणीं आणण्याचें साधन पाहिजे असें या पंथाच्या तिसऱ्या गुरूला वाटूं लागलें, व त्यानें हल्लींची अमृतसर येथील जागा पसंत करून विकत घेतली. पूर्वीं येथें सर्व जंगल असून तलाव वगैरे मुळींच नव्हता. पण या ठिकाणाला ' अमृतसर ' हें नांव पडण्याचें कारण, एका झाडाखालीं एक लहानसें पाण्याचें कुंड असून त्याचें पाणी अमृतासारखें होतें, हें होय. या त्याच्या अमृतत्वाबद्दल एक आख्यायिका या प्रांतांत प्रसिद्ध आहे. ही आख्यायिका ग्वालेर किल्ल्यांतील तलावाच्या आख्यायिकेसारखीच आहे. अमृतसर जिल्ह्यांत पट्टी या गांवीं एक वजनदार गृहस्थ रहात असे. त्याला पुष्कळ सुंदर मुली होत्या. त्यांपैकीं एक फार धार्मिक व भाविक होती. या गोष्टीचा तिच्या बापाला फार राग येई. पुढें रागाच्या भरांत त्यानें या मुलीचें एका पायानें पांगळ्यालुळ्या मनुष्याशीं लग्न करून दिलें, व ' तुझा

देव आतां काय करतो तें पाहूं ', असें म्हटलें. त्या मुलीनें ही स्थिति समाधानानें पतकरली, व आपल्या नवऱ्याला पाटींत घालून डोक्यावर घेऊन ती भिक्षा मागून दोघांचें पोट भरूं लागली. एकदां आपल्या नवऱ्याची पाटी झाडाच्या बुंध्याशीं ठेवून ती गांवांत भिक्षा मागण्यास गेली. तिचा नवरा पाटींत बसलेला असतांना त्यानें एका लंगड्या कावळ्याला झाडाच्या बुंध्याशीं असलेल्या कुंडांत बुडी मारतांना पाहिलें. कावळा त्या पाण्यांतून वर येतो, तों त्याचा पाय साफ होऊन त्याचा वर्ण शुभ्र झाला !' हें पाहतांक्षणींच त्या पाण्यापर्यंत खुरडत जाऊन त्यानें त्या कुंडांत स्नान केलें, व त्या दिव्य पाण्याच्या गुणानें त्याचीं सर्व शारीरिक व्यंगें नाहींशीं होऊन तो एक तेजःपुंज पुरुष बनला. ती मुलगी गांवांतून परत आली, तों तिला हा अद्भुत प्रकार पाहून सानंद आश्चर्य वाटलें. यामुळें या ठिकाणाला ' अमृतसर ' नांव पडलें व याच ठिकाणीं मोठा तलाव बांधून तेथें शीखपंथी मंदिर तयार करण्याचा निश्चय झाला. रामदास या नांवाच्या चवथ्या गुरूनें थोडेंसें कच्चें काम केलें. पण तें काम पुरें होण्याच्या आधींच त्या गुरूचा अंत झाला.

येथला भव्य तलाव व मंदिर हीं शीख लोकांचा पांचवा गुरु अर्जुनदेव यानें बांधविलीं. देवळाचा पाया घालण्याच्या आरंभाला मोंगल बादशाहाचा प्रतिनिधि मियान मीर हा आला होता. यावरून या धर्मपंथाचें महत्त्व किती वाढलें होतें, हें दिसून येतें. या मंदिराचें ' हरिमंदिर ' असें नांव ठेवण्यांत आलें, व शीख लोक याला हरिमंदिरच म्हणतात. पण या मंदिराच्या श्रीमंतीवरून व त्याच्या सोन्याच्या मुलाम्याच्या कामावरून त्याला ' सुवर्णमंदिर ' म्हणण्याचा प्रघात पडलेला आहे.

या मंदिरानंतर दुसऱ्या गुरूंनीं शेजारीं दुसरीं मंदिरें बांधलीं आहेत. पण त्यांना या मंदिराचें महत्त्व आलें नाहीं.

हल्लीं या मंदिरांची व्यवस्था शीख सरदारांच्या कमेटीकडे असून त्यांच्या वतीनें एक व्यवस्थापक सरकार नेमतें. हरिमंदिराचें उत्पन्न दांडगें आहे. उत्पन्नाच्या तीन बाबी आहेत. ग्रंथसाहेबासन्निध रात्रंदिवस कोणी ना कोणी तरी एक इसम उभा असतो, त्याला ' ग्रंथी ' म्हणतात. दर-

रोज तीन ग्रंथींच्या पाळ्या असतात. या ग्रंथींच्या हातावर जी दक्षिणा दररोज लोक टाकतात, ती पहिली बाब. दुसरी बाब म्हणजे पवित्र ग्रंथापुढें जें कांहीं द्रव्य ठेवतात, ती होय. तिसरी बाब म्हणजे इमारतीकरितां किंवा मंदिराची शोभा वाढविण्याकरितां विशेष प्रकारच्या दिलेल्या देणग्या ही होय. या सर्वांचा रोज चोख हिशेब ठेवला जातो. मंदिराचा पुजारी, गवई, ग्रंथी वगैरेसारख्या सर्व आश्रितांना ठराविक तनखा मिळतो व मंदिराचा इतर खर्च चालतो.

हें हरिमंदिर पाहून होतें तों बराच वेळ झाला, व आमचा गाडीवालाहि तगादा करूं लागला, म्हणून आतां अधिक न रेंगाळतां आम्ही गाडींत पाऊल ठेवलें, व स्टेशनजवळ असलेल्या मोठ्या गालीच्याच्या कारखान्यांत गेलों. तेथें व्यवस्थापकांची परवानगी घेऊन कारखाना पहावयाला गेलों. कारखाना अगदीं जुन्या तऱ्हेचाच आहे. सर्व काम हातमागांवर चालतें. मात्र येथलें काम फार उंची तऱ्हेचें असतें. आम्ही येथें गालीच्यांचे ढीगच्या ढीग पाहिले. बहुतेक गालीच्यांची किंमत शेंकडयांनीं व हजारांनींच सांगण्यांत आली. असले उंची गालीचे बहुतेक युरोपांतच खपतात, असें आम्हांला समजलें. येथें सर्वांत लहान गालीचा अठ्ठावीस रुपयांच्या खालीं नाहीं, असें व्यवस्थापक म्हणाले. गालीच्यावर काढावयाच्या नक्षीचे नमुने कागदावर काढलेले असतात व कारागिरांतील कुशल कारागीर कसें व कोणत्या रंगाचें काम करावयाचें किंवा टांके घालावयाचे हें कामकऱ्यांना सांगतो, व त्याप्रमाणें इतर कामकरी मागांवर काम करतात. अशा तऱ्हेची कारखान्यांतील पद्धति दिसली.

कारखाना पाहून झाल्यावर आम्ही लगेच स्टेशनवर आलों व थोडा फराळ करून गाडीची वाट पहात बसलों. बाराच्या सुमारास गाडी प्लॅटफॉर्मवर आली. तींत बसून सुमारें दीड तासानें म्हणजे दीड वाजण्याच्या सुमाराला लाहोर स्टेशनवर येऊन पोहोंचलों. लाहोरला ज्या स्नेह्यांकडे उतरण्याचें आम्ही ठरविलें होतें, त्यांना स्टेशनवर बिनचूक मनुष्य पाठविण्याविषयीं आम्ही तार केली होती. म्हणून आम्ही स्टेशनवर उतरल्यावर बराच वेळ मनुष्याची वाट पाहिली. पण स्टेशनवर आमचा

कोणीहि तपास करतांना दिसला नाहीं. आमच्या स्नेह्याचा फक्त सरकारी हुद्दा व पत्ता आम्हांला ठाऊक होता. पण बिऱ्हाडाचा पत्ता माहीत नव्हता. स्टेशनजवळच चांगली धर्मशाळा आहे, असें तपास करतां आम्हांला कळलें. तेव्हां तूर्त तरी तेथेंच उतरण्याचा निश्चय करून हमालाला धर्मशाळेकडे सामान घेऊन जाण्याला फर्माविलें.

ही धर्मशाळा चांगली तीन मजली प्रशस्त इमारत होती. सोप्याच्या पुढील व्हरांडा चांगला संगमरवरी फरशीचा होता. एका माणसाच्या, किंवा दोन माणसांच्या अशा स्वतंत्र खोल्या मिळतात. दोन माणसांची एक खोली आम्ही घेतली, व तेथें सामान आणून टाकिलें. इतकें होतें आहे तों सुमारें दोन वाजले. तेव्हां प्रथमतः पोटोबाची तजवीज केली. या धर्मशाळेच्या मागच्याच बाजूला हलवायाचें दुकान आहे, तेथून ताज्या पुऱ्या, भाजी व थोडी इतर मेवामिठाई आणवून स्वस्थपणें फराळ केला, व आता पुढें येथें राहण्याची काय तजवीज करावी, या विवंचनेंत पडलों. ज्यांना मी एक उत्तम चित्रकार, मराठींतील एक चांगले लेखक व एक वृत्तसुधारणाभक्त म्हणून ओळखत होतों, व ज्यांची माझी एकंदां ओझरती गांठ पडली होती, ते गृहस्थ लाहोर येथें राहतात हे मला ठाऊक होतें. तेव्हां त्या गृहस्थांचा शोध करावयाचा आम्ही निश्चय केला. पण जी संस्था पहाण्याकरितां आम्ही लाहोरला मुख्यतः उतरलों होतों, ती आर्यसमाजाची संस्था आधीं पाहून येऊं असा बेत करून आम्ही पोषाख करून आमच्या धर्मशाळेच्या खोलींतून बाहेर पडलों, व दयानंद कॉलेजला पोहोंचते करण्याचा करार करून टांग्यांत बसलों.

टांगेवाल्यानें आह्मांला नेमकें कॉलेजाजवळ आणिलें. पण सुपरिंटेंडेंट किंवा प्रिन्सिपॉल यांचें नांव ठाऊक नव्हतें, तेव्हां कॉलेजच्या वसतिगृहांत जाऊन एका मुलाजवळ चौकशी केली. त्यानें आम्हांला वसतिगृहाच्या सुपरिंटेंडेंटकडे नेऊन पोहोंचविलें. मी आपल्या नांवाची कार्ड दिल्यामुळें ओळखीची कांहीच अडचण पडली नाहीं. पण कॉलेज सध्यां सकाळचें असल्यामुळें वर्ग पहावयाला सांपडणार नाहींत, असें त्यांनीं सांगितलें. आम्ही म्हटलें "निदान इमारती, प्रयोगशाला, पुस्तकालय,

वसतिगृह वगैरे तर सर्व पहावयाला मिळेल ? " तेव्हां आम्हांला त्यांनीं कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे नेलें.

प्रिन्सिपॉल हे इकडले एक एम्. ए. असून केंब्रिज युनिव्हर्सिटीचेहि पदवीधर आहेत. गृहस्थ फार साधे व मोठे उत्साही दिसले. त्यांनीं आमचें उत्तम आदरातिथ्य केलें. कॉलेजची व्यवस्था आणि व्याप यांबद्दल थोडीशी माहिती देऊन ते आम्हांला कॉलेज दाखविण्याकरतां घेऊन गेले, व शेवटीं आपण लाला हंसराज यांच्याकडे जाऊं असें त्यांनीं सांगितलें.

प्रथमतः आम्ही कॉलेजची मुख्य इमारत पाहिली. येथल्या सर्व इमारती तांबड्या विटांच्या व चुन्याच्या आहेत. इमारतीवर सरस्वतीचें चित्र असून ॐ हें अक्षरहि कोरलेलें आहे. इमारत एकंदरींत सुंदर दिसते. कॉलेजचा हॉल चांगला आहे. नंतर आम्ही निरनिराळे वर्ग पाहून कॉलेजचें पुस्तकालय व प्रयोगशाळा पाहिली. पहिल्या दोन वर्षांचीच भौतिकशास्त्रें शिकविण्याची कॉलेजला परवानगी आहे, असें प्रिन्सिपॉलनीं सांगितलें.

नंतर आम्ही कॉलेजचें वसतिगृह पहावयाला गेलों. येथें एकंदर सुमारें चारपांचशें म्हणजे कॉलेजांतील अर्ध्याअधिक विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय करण्यांत आली आहे असें समजलें. कॉलेजच्या त्या पुष्कळशा लहानमोठ्या इमारती पाहून कॉलेजच्या विस्ताराबद्दल सानंद आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. मात्र कॉलेजच्या शेजारीं फारशी खुली जागा नाहीं, व कॉलेजचें क्रीडांगण कॉलेजपासून जरा दूरच आहे हें ऐकून ही थोडी गैरसोय आहे, असें मनांत आलें.

कॉलेजलाच जोडून तीन धंदेशिक्षण संस्था लहान प्रमाणावर काढलेल्या दाखविण्यांत आल्या. पहिला एंजिनियरिंगचा वर्ग. हा मुंबई इलाख्यांतील सब-ओव्हरसियरच्या क्लासाच्या दर्जाचा आहे. दुसरा हिंदु वैद्यक शिकविण्याचा वर्ग व तिसरा शिवणकामाचा वर्ग. हे वर्ग कॉलेजच्या मानानें लहानच आहेत. पण आमच्या तरुण विद्यार्थ्यांमध्यें हातकामाबद्दल जी एक तिरस्कारबुद्धि आहे, ती घालविण्याचा व लहानसा स्वतंत्र धंदा करून पोट भरण्यास शिकविण्याचा हा एक

प्रयत्न आहे, असें मला वाटलें. चालकांचा मुख्य भर अर्थातच हें एक उत्तम आर्ट्स् कॉलेज करण्याचा आहे.

सर्व कॉलेज पाहून झाल्यावर आम्ही जवळच असलेली या कॉलेजची इंग्रजी शाळा पहावयाला गेलों. या शाळेंतहि हजारांच्या वर मुलें आहेत. येथें 'लाला हंसराज हॉल' या नांवाची नवीन बांधलेली व बांकें, खुर्च्यादि सामानसुमान नुकतेंच व्यवस्थेनें मांडलेली एक टुमदार इमारत पाहिली. या इमारतीला पंचवीस हजारांच्यावर खर्च आला असें कळलें. ही सर्व रक्कम विद्यार्थ्यांनीं लोकांकडे जाऊन जमविली असून पंचवीस तीस वर्षें शाळेच्या व कॉलेजच्या चालकत्वाचें फार कठिण काम केल्याबद्दल लाला हंसराज यांचें स्मारक म्हणून हा हॉल बांधण्यांत आला, असें ऐकून या संस्थेंतील विद्यार्थ्यांच्या गुरुभक्तीबद्दल आम्हांला फार कौतुक वाटलें, व इकडल्या मुलांमध्येंसुद्धां केवढी कर्तृत्वशक्ति आहे हें पाहून या प्रांतांतील तरुण पिढीबद्दल आमचा अनुकूल ग्रह झाला.

आम्ही शाळेच्या सुपरिंटेंडेंटचे आभार मानून शेवटीं लाला हंसराज यांच्या मठीकडे गेलों. हे गृहस्थ दिसण्यांत मोठे भव्य किंवा धिप्पाड नाहींत; मूर्ति अगदीं लहान आहे. पण यांनींच या कालेजाला इतक्या नांवारूपाला चढविलें आहे. कॉलेजाच्या स्थापनेपासून जवळजवळ तीस वर्षें हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल किंवा प्रेसिडेंट आहेत. हे त्या कॉलेजची सेवा कांहींएक पगार न घेतां निवळ निरपेक्षबुद्धीनें करीत आले आहेत; इतकेंच नव्हे, तर पंजाबांतील आर्यसमाजाच्या एका शाखेचे ते अध्वर्यु आहेत हें ऐकून 'मूर्ति लहान पण कीर्ति मोठी,' या म्हणीची आठवण झाली. लाला हंसराज यांच्याजवळ थोडंफार सभाषण करून व दयानंद कॉलेजच्या भरभराटीबद्दल आनंद प्रदर्शित करून आम्ही तेथल्या मंडळीचा निरोप घेतला.

तेथून आम्ही चालतच निघालों, व शहराच्या अनर्कली नांवाच्या मुख्य रस्त्यावर आल्यावर दक्षिणी चित्रकाराच्या बिऱ्हाडाची चौकशी केली, व सुदैवानें तें बिऱ्हाड आम्हांला लवकरच सांपडलें. यामुळें आमची उतरण्याची व येथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याची अडचण दूर झाली. आम्ही लगेच

आपलें सामान धर्मशाळेंतून घेऊन आलों, व लाहोरांतील पहाण्यासारख्या ठिकाणीं केव्हां जावयाचें तें ठरविलें. श्रीयुत सातवळेकरांच्या घरीं माझ्या ओळखीचे आणखी एक गृहस्थ भेटले. त्यांची एम्. ए.ची परीक्षा नुकतीच संपली होती. अर्थात् ते सर्वस्वीं मोकळे होते, व त्यांच्या बरोबरच आम्ही प्रेक्षणीय स्थळें पहावयाला जाण्याचें ठरविलें.

चहा घेऊन वेळ होता म्हणून प्रथमतः लाहोरचा अजबखाना व सार्वजनिक बाग पहावयाला गेलों. येथला अजबखाना चांगल्यापैकीं आहे. निरनिराळ्या कारागिरीचे नमुने व पेंढा भरून ठेवलेल्या निरनिराळ्या पशुपक्ष्यांचा बराच मोठा संग्रह आहे; तसेंच बुद्धकालीन वास्तुकलेचे व मूर्तिकलेचे बरेच नमुने येथें आहेत. या सर्व मूर्तींमध्यें बुद्धानें चाळीस दिवस उपवास केल्यानंतरच्या त्याच्या शरीराची अवस्था दाखविणारी दगडाची मूर्ति हुबेहुब आहे असें वाटलें. तें अगदीं खाखाळीस गेलेलें पोट, बरगड्यान् बरगड्या दिसणारी ती छाती, खोल खोल गेलेले ते डोळे व एकंदर जरत्कारूसारखी ती आकृति, हें पाहून त्या काळच्या मूर्तिकलेबद्दल आह्मांला फार आश्चर्य वाटलें. येथें मोंगलाईच्या व शीख लोकांच्या चित्रकलेचे चांगले नमुने आहेत. आधीं दहाहि शीखपंथी गुरूंच्या तेलाच्या रंगाच्या उग्र व भव्य तसबिरी आहेत. तो त्यांचा पोषाख व प्रचंड केशविस्तार व हत्यारें पाहिलीं म्हणजे हा धर्म पुढेंपुढें तरी लष्करी पेशाचा झाला होता, हें तेव्हांच ध्यानांत येतें.

अजबखाना पाहून झाल्यावर आम्ही सार्वजनिक बाग पाहण्यास गेलों. शहरांतील मुख्यमुख्य इमारती याच बाजूला असल्यामुळें आम्हांला त्यांतल्या बऱ्याच दुरून तरी पहावयाला सांपडल्या. बाग सुंदर तऱ्हेनें बनविलेली आहे. येथें निरनिराळे पशुपक्षी ठेवलेले आहेत. तेथून आम्ही बिऱ्हाडींच परत आलों, व सकाळींच उठून शालिमार बाग आणि जहांगीर व नूरजहान यांचीं कबरस्थानें पहाण्याचें ठरवून जेवणखाण झाल्यावर गप्पागोष्टी करीत गच्चीवर झोपीं गेलों.

सकाळींच ठरल्यावेळीं माझे मित्र आमच्या बिऱ्हाडीं आले, व चहाफराळ करून आम्ही एक गाडी ठरवून प्रथमतः शालिमार बाग पहाव-

याला गेलों. ही बादशाही बाग शहरापासून चार मैल दूर आहे. काश्मीरांत झेलम नदीच्या उगमाजवळ जहांगीर बादशहानें ज्या प्रकारची बाग बनविली होती, त्याच नमुन्यावर १६६७ मध्यें शहाजहान बादशहाचा प्रसिद्ध एंजिनीयर अलीमर्दनखान यानें ही बाग बनविली. मुसलमानी धर्मांत मानलेल्या सात प्रकारच्या स्वर्गलोकांना अनुरूप असे या बागेचे सात भाग होते. यांपैकीं आतां फक्त तीनच भाग नीट स्थितींत आहेत. तरी त्यांनीं ऐंशी एकर जागा व्यापिली आहे. यावरून या बागेची प्रचंडता ध्यानांत येईल. जागोजाग बसण्यास चबुतरे केलेले व त्यांच्या सभोंवार कारंजीं खेळण्याची व्यवस्था केलेली, याप्रमाणें दालनेंच्या दालनें लागत जातात. बागेच्या मध्यावर बराच मोठा हौद आहे. सर्व काम संगमरवरी दगडाचें व नक्षीचें आहे. या हौदांत तिरप्या संगमरवरी व त्यावर गालीच्याप्रमाणें कोरलेली नक्षी काढलेल्या एका प्रचंड शिळेवरून सारखा पाण्याचा प्रवाह चालेल अशी व्यवस्था केलेली आहे. पाणी त्या तिरप्या शिळेवरून सळसळ करीत सारखें वहात होतें, व त्या पाण्याला फेंस येत असल्यामुळें तें शुभ्रपणांत संगमरवरी शिळेशीं जणूं कांहीं स्पर्धाच करीत आहे, असें भासलें. हें वाहतें पाणी नुसत्या शोभेकरितां सोडून दिलेलें आहे, असें नाहीं; तर या तिरप्या शिळेवर पडून थंड व गारगार पाण्याचें स्नानहि करण्याची सोय आहे. आम्ही ही मजा पहात असतांना एक मनुष्य त्या सुंदर शिळेवर पडून स्नान करूं लागला. तें पाहून आम्हांलासुद्धां त्या ठिकाणीं स्नान करण्याची फार इच्छा झाली. पण दुसरे कपडे आणलेले नसल्यामुळें ती इच्छा मनांतल्या मनांत दाबणें भाग पडलें. हें ठिकाण इतकें रमणीय आहे, कीं, येथून हलूं नये, व त्या तिरप्या संगमरवरी शिळेवरून जाणाऱ्या पाण्याच्या शुभ्ररंगी लहरींकडे सारखी टक लावून पहात बसावें असेंच वाटतें. पण तेथेंहि फार वेळ घालविणें शक्य नव्हतें, म्हणून आम्ही बागेंत पुढेंपुढें चाललों.

सारखे फुलझाडांचे ताटवे व मध्येंमध्यें हिरवेंगार मैदान आणि फरसबंदी पायवाट अशी सारखी लागत राहिली. ही बाग जणूं काय अनंत आहे, असें आम्हांला वाटूं लागलें, तोंच बागेचा शेवटचा प्राकार दृग्गोचर

झाला. प्राकारावर जाण्याला जिना होता. त्यानें वर चढून वरूनच थोडे हिंडलों. त्यावरून बागेच्या विस्ताराची व बहुविधत्वाची चांगली कल्पना मनांत आली. नंतर खालीं उतरून दुसऱ्या फरसबंदी वाटेनें आम्ही परतलों. ही बाग पाहून व दिल्ली आग्रा येथील पाहिलेल्या बागांचें स्मरण होऊन मुसलमान लोकांना फार जुन्या काळापासून सुंदर बागांचा फार शोक आहे, असें ध्यानांत येऊन बगीचे बनविण्याची कलाहि त्यांना चांगली अवगत होती, असें दिसलें.

ही बाग पाहून आम्ही परतलों, व मग लाहोरच्या जवळ असलेल्या शहादरा नांवाच्या गांवीं असलेलीं जहांगीर बादशाह व नूरजहान राणी यांचीं कबरस्थानें पहाण्याला गेलों. लाहोर शहर हें रावी (पंजाबांतील तिसरी नदी) नदीच्या कांठीं आहे. हल्लीं या नदीचा प्रवाह शहरापासून जरा दूर गेला आहे; पण एका काळीं तो अगदीं थेट शहराला लागून गेलेला होता, असें समजलें. या नदीच्या पलीकडे शहादरा आहे. या नदीचा पूर्वीचा पूल मोडल्यामुळें नवा पूल बांधण्यांत आला आहे. आम्ही गेलों त्याच्या आधीं थोडे दिवस तो पूल रहदारीला चालू झाला होता. आम्ही जसजसे नदीच्या कांठाकडे जात चाललों, तसतसे मोठमोठ्या लांकडांचे ढीगच्याढीग दिसूं लागले. पंजाबांतील नद्या हिमालयांत निघून सपाटीवर येत असल्यामुळें त्यांना पाणी सारखें असून वेगहि पुष्कळ आहे. यामुळें हिमालयाच्या रानांतील लांकडें पंजाबांत आणणें इकडे अगदीं विनखर्चानें होतें. लांकडांच्या तुळयांवर नंबर घालून त्या नदींत ढकलून देतात. मग या प्रचंड तुळया वहातवहात खालीं येतात व त्यानंतर निरनिराळ्या सोयीच्या ठिकाणीं वर काढून घेतात, आणि तेथून खुष्कीच्या मार्गानें सर्व प्रांतांत पाठवितात. हा लांकडांचा व्यापार येथें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे, असें दिसलें. नदीच्या कांठाकडे जसजसें यावें, तसतशी उंच उंच झाडांची गर्द राई लागते. तो नवा कोराकरकरीत पूल व रावी नदीचें तें रुंद पात्र, शेजारींच असलेला तो पडावांचा पायवाटेचा पूल व किनाऱ्यावर पडलेल्या त्या लांकडांच्या राशीच्याराशी हा देखावा प्रेक्षणीय आहे, यांत शंका नाहीं.

नदी टाकली, कीं शहादरा लागतें. कबरस्थानाकडे जाण्यापूर्वी 'येथल्या मोठ्या गिरणीचे मॅनेजर एक दक्षिणी गृहस्थ आहेत, त्यांना भेटून पुढें जाऊं,' असें माझे मित्र म्हणाले. अर्थात् आपल्या प्रांताच्या गृहस्थाला भेटण्यापासून आनंद होईल असें वाटून आम्ही रुकार दिला, व आम्ही गिरणीमध्यें गेलों. माझ्या मित्रांनीं आमची दोघांची ओळख करून दिली. श्रीयुत फाटक हे गृहस्थ नगरकडील असून ते यूरोपांत जाऊन आलेले आहेत. त्यांचा स्वभावहि फार साधा, खुल्या दिलाचा व संगतिप्रिय दिसला, व त्यांचीं व माझीं मतेंहि जुळतीं दिसल्यामुळें मला त्यांची ओळख झाल्यानें विशेष आनंद वाटला. त्या गृहस्थांनाहि आम्ही आल्याबद्दल फार बरें वाटलें. त्यांनीं आह्मांला भोजनाला रहाण्याचा आग्रह केला; पण आम्ही बिऱ्हाडीं सांगितलें नाहीं, तेव्हां तेथें मंडळी आमची वाट पहात राहतील, असा विचार करून त्यांचें आमंत्रण आम्ही स्वीकारलें नाहीं. त्यांनीं 'सायंकाळीं तरी आलें पाहिजे व मग रात्रभर येथेंच राहून पहाटेच्या गाडीनें लाहोरास जावें,' असा आग्रह केला. तेव्हां ती गोष्ट आम्ही कबूल केली, व मग नूरजहान व जहांगीर यांच्या कबरस्थानाकडे गेलों.

नूरजहान राणीचें कबरस्थान लहानच आहे. त्याचें संगमरवरी दगडाचें नक्षीचें काम शीख लोकांनीं काढून नेल्यामुळें ही कबर आतां विशेष पहाण्यासारखी राहिली नाहीं. जहांगिराची कबर मोठी प्रशस्त असून त्यांतील संगमरवरी नक्षीच्या जाळीचें काम फार सुबक आहे. त्याची थोडीशी कल्पना छायाचित्रावरून येईल. पण याहि कबरेचा मुख्य घुमट काढून टाकलेला आहे. यामुळें ती फार भुंडी दिसते. जुन्या दिल्लींत अनंगपाल व पृथ्वीराज या राजांच्या काळच्या हिंदु देवळांचें सामान घेऊन तेथली मशीद बांधली आहे, मथुरेला हिंदु देवळांच्याच मशिदी औरंगजेबानें बनविल्या आहेत, त्याच्या उलट लाहोरची स्थिति झाली आहे. तेथल्या मोंगल बादशाहीच्या काळच्या इमारतींचें सामान शीख लोकांनीं घेऊन अमृतसरच्या सुवर्णमंदिराला व शीखांच्या इतर इमारतींना लावलेलें दिसलें. जहांगिराचें कबरस्थान पाहून झालें, तों बारा वाजून गेले; म्हणून आम्ही परत फिरलों, व बिऱ्हाडीं आलों. जेवणखाण

झाल्यावर थोडी विश्रांति घेतली व सायंकाळचा श्रीयुत फाटकांकडे जावयाचा व उद्ईक सकाळीं नऊ वाजतां येथून पुढें प्रयाण करण्याचा बेत श्रीयुत सातवळेकर यांना सांगितला, व त्याप्रमाणें करण्याचें ठरलें. बेताप्रमाणें आम्ही चारसाडेचार वाजतां निघालों, व प्रथमतः गांवाबाहेर असलेली जुम्मामशीद व त्यालाच लागून असलेली रणजितसिंगाची समाधि हीं पहावयाला गेलों.

आतां आम्ही जागोजागच्या जुम्मामशिदी पाहिल्या असल्यामुळें या मशिदी पाहण्यांत आम्हांला आनंद वाटेनासा झाला; तरी पण आम्ही मशिदींत जाऊन आलों, व मग त्याला लागून असलेल्या बागेंत थोडा वेळ विश्रांति घेतली. कारण, आतां रणजितसिंगाच्या समाधीखेरीज पहाण्याचें कांहीं राहिलें नव्हतें, व शहादऱ्याला साडेसातांच्या सुमाराला जावयाचें होतें. या बागेंत बरेच लोक हवा खाण्याकरितां येतात, असें आम्हांला दिसलें. त्यांत बहुतेक मुसलमानच होते. आमच्या मित्रांना विचारतां त्या शहरांत मुसलमानांचीच वस्ती जास्त आहे, असें आम्हांला कळलें. जवळजवळ सवा लाख मुसलमान, तर पाऊण लाख हिंदू व शीख मिळून आहेत. मुसलमानी अमदानींत कांहीं काळपर्यंत दिल्ली–आग्र्यापेक्षां लाहोरचें महत्त्व जास्त होतें; पण पुढें त्या शहराला उतरती कळा लागली. रणजितसिंगाच्या कारकीर्दींत पुनः त्याला महत्त्व आलें पण तें फार दिवस टिकलें नाहीं. पंजाबप्रांत १८४९ मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला; तेव्हांपासून या शहराची भरभराट होत आहे, असें आमच्या मित्रांनीं सांगितलें. शिक्षणाच्या बाबतींत या शहराचा बराच वर नंबर लागेल, असें आमच्या मित्रांच्या माहितीवरून दिसून आलें. कारण, येथें सरकारी, खिश्चन, दयानंद, इसलामिया व दयाळसिंग अशीं पांच निवळ आर्टस कॉलेजें आहेत. शिवाय, कायद्याचें, वैद्यकीचें व मुख्य ट्रेनिंग कॉलेज अशीं तीन धंद्याचीं सरकारी कॉलेजें आहेत. बागेंतून मग आम्ही रणजितसिंगाची समाधि पहावयाला गेलों. ही इमारत किल्ल्याच्या तटाला लागूनच आहे. किल्ल्याच्या प्रचंड दरवाज्याच्या व तटाच्या मानानें ती लहान आहे. यामुळें ती मनांत भरत नाहीं. पायऱ्या चढून गेल्यावर आंत समा-

धीचा सभामंडप मोठा प्रशस्त दिसतो, व त्याचें नक्षीकामहि बरें आहे. कोठेंकोठें फाजील अलंकार आहेत. या इमारतीमध्यें मुसलमानी व हिंदु वास्तुपद्धतीचें कांहीं तरी विचित्र मिश्रण झाल्यामुळें ही समाधि जरी उंची मालमसाल्यानें बांधलेली आहे, तरी खऱ्या अभिरुचीचा त्यांत अभाव दिसून येतो, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ही इमारत पाहून होते, तों शहादऱ्यास जाण्याची आमची वेळ झाली. म्हणून तेथें सोडून देण्याच्या बोलीनें टांगा ठरवून आम्ही शहादऱ्यास श्रीयुत फाटकांच्या बंगल्यावर गेलों. ते आमची वाटच पहात होते.

आम्ही तेथें सर्व रात्र काढली व किती रात्रपर्यंत तरी आमच्या गप्पा-गोष्टी चालल्या होत्या. समानशील व समानविचार अशीं माणसें एकत्र आल्यावर संभाषणास काय तोटा! रा. फाटकांनीं आपल्या विलायतेंतील अनुभवाच्या किती तरी गोष्टी सांगितल्या. आपल्याला मँचेस्टरच्या एकाद्या कारखान्यांत प्रत्यक्ष काम करून माहिती मिळविण्याची फार इच्छा होती; पण तेथें कारखान्यांत परकी माणसांचा शिरकाव होणें दुरापास्त असतें. एका सहजगत्या ओळख पडलेल्या इंग्रजांच्या साहाय्यानें शेवटीं एकदांचा शिरकाव झाला. कारखान्यांत शिरल्यावर मात्र सर्व कामकरी आपल्याजवळ अगदीं सलोख्याच्या नात्यानें वागत असत, व कारखान्यांतील कामाची माहिती आंत पडदा न ठेवतां सांगत असत, असें त्यांनीं सांगितलें. तसेंच मध्यमस्थितींतील इंग्रज कुटुंबांतील मनुष्यें आपल्याजवळ प्रेमानें वागत. एकंदर कुटुंबांतील मंडळीचें एकमेकांशीं फार खुल्या दिलाचें वर्तन असतें, घरांतील लहानमोठी सर्व मंडळी जेवणास एकत्र बसतात. घरांत जरी स्वयंपाकी वगैरे स्वतंत्र माणूस नसला, तरीसुद्धां सर्व स्वयंपाक आटोपल्यावर तो एका मेजावर आणून ठेवून सर्वांनीं एकदम जेवण्याची इंग्रज कुटुंबांची रीत फार चांगली; त्यायोगें लहानथोर मंडळीचें एकमेकांशीं संघटन होऊन मनाचा खुलासपणा जास्त वाढतो वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितल्या. विलायतेंतून परत आल्यावर इकडल्या लोकांनीं प्रायश्चित्ताबद्दल आपल्याला कसा आग्रह केला, आणि जाणूनबुजून केलेल्या कृत्याबद्दल प्रायश्चित घेणें आपल्या किती जीवावर आलें पण वडील मंड-

ळीच्या आग्रहानें आपल्या विवेकाला न पटणारें कृत्य आपणास कसें करावें लागलें याबद्दलचा त्यांनीं आपला अनुभव सांगितला. याप्रमाणें आम्ही ती रात्र मोठ्या आनंदांत घालविली. रात्र संपली, पण आमच्या गोष्टी संपल्या नाहींत. पहाटेच्या गाडीनें आम्ही लाहोराला येऊन ९॥च्या गाडीनें अटकेकडे मार्गस्थ झालों.

६

# तक्षशीला–अटक–पेशावर.

मागील लेखांत उल्लेख केल्याप्रमाणें दिवसा दहांच्या सुमाराला लाहोराहून निघालों. रात्रीं नवांच्या सुमाराला कँबेलपुराला मुक्काम करावा, असा आम्ही बेत केलेला होता.

कँबेलपुर हें अटक जिल्ह्याचें नवें वसलेलें शहर आहे. प्रथमतः मला असें वाटलें, कीं, एकाद्या इंग्रजाच्या नांवावरून या शहराला हें नांव पडलें असावें. पण पुढें मला कळलें, कीं, ‘ कमलपुर ’ या जुन्या नांवाचा हा विलायती अपभ्रंश आहे ! ज्याप्रमाणें ‘ मथुरे’चें ‘ मुत्रा ’ झालें, ज्याप्रमाणें ‘वाराणशी’चें ‘ बनारस ’ झालें, ज्याप्रमाणें ‘ वांद्या ’चें ‘ बँड्रा ’ झालें, ज्याप्रमाणें ‘ वसई ’चें ‘ बेसीन ’ झालें, त्याप्रमाणेंच ‘ कमलपुर ’चा कँबेलपुर ’ हा अपभ्रंश झाला आहे !

कँबेलपुर येथें आम्ही एका सरकारी वकिलाकडे उतरावयाचें ठरविलें होतें, व त्याप्रमाणें निघाल्यावर त्या गृहस्थांना तारहि केली होती. आजचाहि आमचा प्रवास बहुतेक दिवसाच होता, व त्या दिवसांत तिकडे रात्रीं आठ वाजेपर्यंत चांगला संधिप्रकाश असतो, यामुळें आमच्या मुक्कामापर्यंत बहुतेक सर्व प्रदेश आम्हांला दृग्गोचर होणार होता.

लाहोर स्टेशन सोडल्याबरोबर रावी नदीचा पूल ओलांडावा लागतो. पंजाबांतल्या पांच नद्यांपैकीं ही तिसरी नदी होय. आजच्या आमच्या मुक्कामापूर्वीच चिनाब व झेलम या राहिलेल्या नद्या आमच्या दृष्टीला पडणार होत्या. या एकाच दिवशीं पहावयाला सांपडणार, हें समजतांच आमच्या जलद प्रवासाची पुनः एकदां आम्हांला स्मृति झाली.

लाहोरहून रावीचा पूल ओलांडल्याबरोबर गाडी शहादऱ्याला येते. या ठिकाणीं आम्ही आदल्या दिवशीं राहिलों होतों. श्रीयुत फाटक स्टेशनवर आम्हांला भेटण्याकरतां आले होते. त्यांचा निरोप घेऊन आम्ही भराभर पुढें चाललों.

मागें सांगितलेंच आहे, कीं, हा सर्व प्रांत अगदीं सपाट आहे. यामुळें क्षितिजापर्यंत जिकडेतिकडे सुपीक जमीनच जमीन दृग्गोचर होते. साडेबारांच्या सुमाराला आम्ही वजीराबाद या मोठ्या स्टेशनाला आलों. पंजाबच्या दक्षिणभागांतील मुलतान या मोठ्या शहराकडून जो रेल्वेचा फांटा येतो, तो येथें मिळून पुढें सियालकोट व जम्मु ( काश्मीरच्या महाराजांची दुसरी राजधानी ) कडे जातो. वजीराबाद स्टेशन टाकून थोडें पुढें गेलें नाहीं, तोंच चिनाब नदी लागते, व तीवरील पूल ओलांडून गुजरात या स्टेशनवार गाडी येते.

इकडल्या सर्व नद्यांचीं पात्रें फारच रुंद दिसतात. प्रदेश सपाट असून खडकाळ नसल्यामुळें नदीचें पात्र पुष्कळ रुंदावतें. पंजाबांतील सहा नद्यांपैकीं बियास ही सर्वांत लहान आहे, व सिंधु ही सर्वांत मोठी आहे. बाकीच्या चार बहुतेक सारख्याच मोठ्या आहेत. चिनाब नदी ओलांडल्यावर लवकरच लाला मुसा म्हणून एक जंक्शन स्टेशन लागतें. येथें चिनाब नदीच्या पश्चिमेच्या कांठाकडून आलेला रेलवेचा फांटा येऊन मिळतो. या स्टेशनवर आम्ही दोनप्रहरीं एक वाजतां येऊन पोहोंचलों.

आणखी एका तासानें आम्ही झेलम स्टेशनला आलों. नदीच्या नांवानेंच हें स्टेशन आहे. ही नदी आह्मांला फारच प्रचंड भासली. हिच्यावर मोठा थोरला पूल आहे. ही नदी हिमालयांतून निघाली असून सुप्रसिद्ध श्रीनगर याच नदीच्या कांठीं आहे; या नदीच्या बाजूनेंच काश्मीरचा रस्ता आहे, एवढें आम्हांला प्रवासाच्या आधींच ठाऊक होतें. ज्या नदीचा आपणांला पुढील बिकट प्रवासांत पुष्कळ सहवास घडावयाचा आहे, जिचें उगमस्थानहि आपणांला पहावयाचें आहे, अशा या झेलम नदीच्या प्रथमदर्शनानें व तिच्या या प्रचंड स्वरूपानें आम्हांला फारच आनंद झाला. या नदीचा माझ्या प्रवासवर्णनांत पुढें पुष्कळच उल्लेख येणार

आहे; तेव्हां सध्यां ‘ ही नदी वेदकालापासून प्रसिद्ध आहे; व तिचें वेदकालीन नांव ‘ वितस्ता ’ आहे, व म्हणूनच ‘ **बहुरूपाहि वितस्ता** ’ इतकेंच तूर्त तिच्याबद्दल सांगून मी पुढील वर्णनाला लागतों.


झेलम स्टेशनावर गाडी बराच वेळ उभी राहते. झेलम स्टेशन दिल्लीपासून साडेचारशें मैल आहे. पुण्याहून दिल्ली साडेदहाशें मैल आहे. तेव्हां आमच्या घरापासून आम्ही सुमारें पंधराशें मैल प्रवास करून आलों, हें ध्यानांत येऊन व आतां पुढें फक्त दोनशें मैलच प्रवास राहिला, हें पाहून आम्हांला फार आनंद झाला. अशा प्रकारचे समाधानाचे व आनंदाचे विचार मनांत येत आहेत, तोंच गाडी स्टेशनांतून बाहेर निघाली.

झेलम स्टेशनांतून सुमारें अडीच वाजतां आम्ही बाहेर पडलों, ते रावळपिंडीला सहांच्या बेतानें पोहोंचलों. आमच्या प्रवासाच्या दुसऱ्या भागाला येथूनच प्रारंभ व्हावयाचा होता. तेव्हां आम्हांला पुढें येथें उतरावयाचें आहे, हें ठाऊक होतें: म्हणून आम्ही त्या वेळीं येथें न उतरतां तसेच पुढें गेलों.


ठरल्याप्रमाणें आम्ही सायंकाळीं नवांच्या सुमाराला कँबेलपुरला पोहोंचलों. ज्या सरकारी वकिलाकडे आम्ही उतरणार होतों, त्या गृहस्थांचे चिरंजीव टांगा घेऊन आम्हांला नेण्याकरितां स्टेशनवर आले होते. यामुळें स्टेशनांतून बाहेर पडल्याबरोबर थेट त्यांच्याच बंगल्यावर आम्ही गेलों.

जेवणखाण झाल्यावर अटक, तक्षशीला पेशावर इतकीं ठिकाणें पहाण्याचा आमचा बेत आम्ही वकीलसाहेबांना कळविला, तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं, ‘ तक्षशीला हें ठिकाण सराईकाला या स्टेशनपासून दीडदोन मैलांवर आहे, व तें रावळपिंडीला परत जातांना वाटेंत दोन अडीच तासांच्या अवकाशांत सहज पाहतां येईल. त्याप्रमाणेंच अटक हें कँबेलपुरच्या पुढचेंच स्टेशन आहे, तेथेंहि सिंधू नदी व तिच्या कांठावरील किल्ला यापेक्षां पाहण्यासारखें कांहींएक नाहीं. तेव्हां पेशावराला जातांना मध्यें दोन तास अटकेला थांबून पुढें गेलें म्हणजे झालें. ”


हा बेत आह्मांला फार सोयीचा वाटला. कारण, आमचीं मुंबईपासून पेशावर अशीं एकदम तिकिटें काढलेलीं होतीं, व शंभर मैलांना एक




४ जुम्मामशीद दिल्ली.



तक्षशीला.



जुम्मामशीद्—लाहारे.



रणजितसिंहाची कबर—लाहोर.

दिवस या प्रमाणापेक्षां आमचे जास्त दिवस मोडलेच नव्हते. तेव्हां सकाळीं साडेसातांच्या गाडीनें अटकेला जावें, व तेथून पुढें बारांच्या गाडीनें पेशावराला जावें, असा बेत करून आम्ही कँबेलपुराला रात्रीं विश्रांति घेतली.

कालक्रमानें जरी मी तक्षशीला हें पेशावराहून परत येतांना पाहिलें तरी भूमिभागक्रमानें अमृतसर लाहोरानंतर हेंच ठिकाण आधीं लागतें. म्हणून या तक्षशीलेचें वर्णन येथें करणेंच रास्त होईल. तक्षशीला पाहण्यास जाण्याकरितां सराईकाला नांवाच्या स्टेशनवर उतरावें लागतें. हें स्टेशन रावळपिंडीच्या पुढें वीसच मैल आहे. आम्ही पहाटेस पांच साडेपांच वाजतांच सराईकाल्यास पोहोंचलों. सामान स्टेशनवर ठेवून लागलीच तक्षशीलेची वाट चालूं लागलों. वाटेनें जातांना पुराणवस्तुसंशोधन-खात्याची कचेरी लागते. येथेंच तक्षशीला पाहण्याचे पास मिळतात व मार्गदर्शकही मिळतात. पाहण्यास पास लागतो, हें आम्हांला ठाऊक नसल्यानें आम्ही थेट तक्षशीलेच्या जागीं गेलों. पण त्यामुळें आम्हांला कचेरीकडे पासाकरितां परत येऊन मग मार्गदर्शक घेऊन जावें लागलें.

ज्याप्रमाणें युरोपांत पांपे शहराचा मागमूसही ठाऊक नव्हता व तें अर्वाचीनकाळीं जमीन खोदतांना सांपडलें; त्याचप्रमाणें तक्षशीला शहराची स्थिति आहे. प्रसिद्ध विद्यापीठ या नात्यानें तक्षशीलेचा उल्लेख वाङ्मयांत पुष्कळ ठिकाणीं आलेला आहे.

" ब्रह्मदत्त कुमारानें तक्षशीलेंत शिल्पशास्त्र शिकून तिन्ही वेदांमध्यें पारंगत होऊन अठरा विद्यांचें पूर्ण अध्ययन केलें. नग्गजि ह्या नांवाचा काश्मीर व गांधार या देशांचा राजा तक्षशीलेंत विद्येकरितां रहात असे. " वगैरे सारखे उल्लेख बुद्धधर्माच्या जातक--कथांतून वारंवार आलेले आहेत. तसेंच शिकंदर या शहरीं आला होता व त्या वेळचें या शहराच्या भरभराटीबद्दलचें वर्णन ग्रीक इतिहासकारांनीं केलेलें आहे. त्याचप्रमाणें प्रसिद्ध चिनी प्रवाशी फेहायन व हुएकसांग यांनींहि या शहराचा निर्देश आपल्या प्रवासवृत्तांत केला आहे. इतकी ज्या शहराची पूर्वकाळीं प्रसिद्धी होती त्या शहराचा अर्वाचीन काळापर्यंत ठाव ठिकाणहि नव्हता. हिंदु-

स्थानच्या पुराणवस्तुसंशोधनात्मक पहाणीचा वृत्तांत लिहितांना जनरल कानिंग्राम यांनीं या शहराचा शोध लावला व गेल्या पांचसात वर्षांत हल्लींचे पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर सर जॉन मार्शल यांनीं खोदकाम जास्त मोठ्या प्रमाणावर केल्यापासून तर तक्षशीलेचीं शहरेंच्या शहरें मातींत गडदलेलीं आढळून आलीं आहेत; व हिंदुस्थानच्या पूर्वइतिहासावर प्रकाश पाडणाऱ्या किती तरी वस्तु सांपडलेल्या आहेत. नुकतेंच तक्षशीलेच्या संबंधीं मार्गदर्शक व वर्णनात्मक पुस्तक सर मार्शल यांनीं छापलें आहे. त्याचा उपयोग खालील वर्णनांत केलेला आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

तक्षशीला हें खरोखरीं एक शहर नाहीं, तर निरनिराळ्या काळीं वसविलेल्या तीन नगरांचा समुदाय आहे. व हल्लीं या तिन्ही शहरांचे तट व तेथल्या इमारती व इतर वस्तु सांपडल्या आहेत.

अगदीं सर्वांत जुनें शहर हल्लीं ज्याला भीर टेकडी म्हणतात तेथें होतें. सराईकाला या स्टेशनकडून निघालें म्हणजे हीच टेकडी प्रथम लागते. हें शहर शिकंदराच्या स्वारीपूर्वीं किती तरी शतकें वसविलेलें असावें. या म्हणण्याच्या प्रत्यंतरास पुष्कळ वस्तु आतां सांपडल्या आहेत. शिकंदराच्या स्वारीनंतर व ग्रीक लोकांनीं या प्रांतांत आपलें राज्य स्थापल्यानंतर ख्रिस्तीशकापूर्वीं दोनशेंच्या सुमारास हातियाल टेकडीवर व त्या टेकडीला लागून असलेल्या मैदानावर सिरकप नांवाचें नवीन शहर वसविण्यांत आलें. या शहराच्या तटबंदीची सभोंवारची भिंत व शहरांतील रस्ते व दुतर्फा घरें हीं सर्व आतां सांपडलीं आहेत. या शहराच्या पूर्वेस आणखी एका शहराचा अवशेष सांपडला आहे. या शहराचें नांव सिरसुख असें होतें. हें शहर कुशन घराण्याच्या कनिष्क राजाच्या कारकीर्दींत वसविलेलें आहे, असें तेथें सांपडलेल्या वस्तूंवरून ठरत आहे. या तीन शहरांच्या अवशेषाखेरीज किती तरी बुद्धकालीन स्तूप व विहार वगैरे इमारती व देवळें या भागांत सांपडलीं आहेत. अर्थात् हा सुमारें आठदहा मैलांच्या घेरांचा भाग पुराणवस्तुसंशोधनाच्या दृष्टीनें फारच महत्वाचा आहे. व आतांपर्यंतच या सर्व भागांत सांपडलेल्या वस्तूंनीं हिंदुस्थानच्या पूर्वइति-

ह्यासजुळणीस मदत केली आहे व जसजसें खोदकाम जास्त होऊन अधिक अधिक अवशेष सांपडतील तसतसा हिंदुस्थानच्या इतिहासाच्या हजार वर्षांच्या काळावर जास्तजास्त प्रकाश पडेल यांत शंका नाहीं.

इतका विस्तीर्ण प्रदेश सावकाशपणें पहावयाचा म्हटलें तर सहज दोन-चार दिवस पाहिजेत. आम्हांला दोनचार तासांपेक्षां जास्त अवधी नव्हती. तेव्हां येवढ्या थोड्या अवकाशांत इमारती व शहराचे अवशेष वगैरे जें कांहीं आम्ही पाहिलें तेवढ्यांचेंच वर्णन येथें देणें योग्य आहे.

वर सांगितलेंच आहे, सराईकाला स्टेशनकडून निघालें म्हणजे प्रथमतः भीर टेकडी लागते. या टेकडीवर पुष्कळ ठिकाणीं खोलखोल खणलेलें होतें व त्यांत बुद्धकालीन स्तूप विहार व इतर इमारती यांचे अवशेष व मोडके व अर्धवट स्थितींत राहिलेले भाग दिसत होते; पण या भागांत विशेष कांहीं पाहण्यासारखें नाहीं असें मार्गदर्शकाकडून समजल्यामुळें आम्ही तडक हतीयाल टेकडीच्या बाजूनें धर्मराजीका नांवाच्या प्रचंड स्तूपाकडे गेलों. हा स्तूप सांचीच्या स्तूपाप्रमाणें फार मोठा आहे. हा पूर्वीं मातींत गडदलेला होता पण आतां तो मोकळा केलेला आहे. सांचीच्या स्तूपाप्रमाणें याचे सभोंवतीं प्रचंड कठडा व तोरणें नाहींत. पण सांचीच्या स्तूपाप्रमाणें प्रदक्षिणेच्या मार्गाला चार दारें आहेत व तीं पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चार दिशा बरोबर साधून बांधलेलीं आहेत. मुख्य स्तूप व त्याचा प्रदक्षिणामार्ग याचे सभोंवतीं लहानलहान स्तूप किती तरी आहेत. यामुळें सांचीच्या स्तूपाच्या प्रदक्षिणामार्गाप्रमाणें हा मार्ग खुला वाटत नाहीं; तर हल्लींच्या काळच्या देवळाच्या गाभाऱ्याच्या सभोंवारच्या प्रदक्षिणा-मार्गासारखा तो वाटतो. मुख्य स्तूपाचे बाजूवर व प्रदक्षिणेच्या मार्गाच्या दुसऱ्या बाजूवर किती तरी दगडीनक्षीचें काम दृग्गोचर होतें. त्याप्रमाणेंच या स्तूपाच्या सभोंवारच्या दगडी भिंतीची रचना निरानिराळ्या पद्धतीची आहे. यामुळें निरानिराळीं बांधकामें केव्हां केव्हां रचलीं गेलीं याची अट-कळ करतां येते. या बांधकामांत कमानी व तीनपानी महीरपी दृग्गोचर होतात. यावरून व ग्रीक वास्तुकलेच्या दुसऱ्या खुणांवरून या काळीं हिंदु वास्तुकलेचा व ग्रीक-वास्तुकलेचा संबंध घडून हिंदु वास्तुकलेवर ग्रीक-

कलेनें थोडाफार पगडा बसविला होता असें दिसतें. या मोठ्या स्तूपास-भोंवतीं व त्याचे आसपास इतके स्तूप, विहार व इतर इमारती आहेत कीं त्यांचें वर्णन करणें अशक्यप्राय आहे. पण तक्षशीलेच्या शोधापासून जुन्याकाळच्या इमारती व वास्तुकलेचे नमुने सांपडले आहेत इतकेंच नाहीं तर खोदकाम चालूं असतां कित्येक नाण्यांनीं व इतर तत्कालीन वस्तूंनीं भरलेलीं भांडीं सांपडलेलीं आहेत; त्याप्रमाणें कित्येक फुटलेल्या स्तूपांमधून सोन्याच्या, रूप्याच्या व इतर धातूच्या पेट्या सांपडलेल्या आहेत व इमारती व वास्तुकलेचे नमुने यांपेक्षां या इतर वस्तूंचें ऐतिहासिकदृष्ट्या जास्तच महत्व आहे. कारण या वस्तूंनीं तक्षशीलेच्या व अप्रत्यक्षपणें हिंदुस्थानच्या जुन्या इतिहासावर किती तरी प्रकाश पडला आहे. या वस्तूंमध्यें खुद्द बुद्धाच्या दांताचे व हाडाचे अवशेषही सांपडलेले आहेत. मुख्य स्तूपाच्या पश्चिमबाजूच्या एका लहान स्तूपाच्या मध्यभागीं बुद्धाच्या हाडाचे अवशेष सांपडले. हे अवशेष इतके महत्त्वाचे होते कीं, ते अवशेष १८१७ च्या फेब्रूवारी महिन्यांत व्हाईसरॉय लार्ड चेम्सफर्ड यांनीं लंकेंतील बुद्ध लोकांना नजर केले व त्यांनीं ते अवशेष कँडी येथील बुद्धाच्या दांताच्या अवशेषाच्या मंदिरांत मोठ्या भक्तिभावानें ठेविले आहेत.

या लहान स्तूपाच्या पश्चिमेस पांचसहा लहानलहान खोल्या आहेत. त्यांपैकीं एका खोलींत एक लहानशी सोन्याची डबी सांपडली व तीमध्यें एक लेख सांपडलेला आहे. तक्षशीलेंत सांपडलेल्या पुराणवस्तूंमध्यें हा लेख म्हणजे एक अपूर्व शोध आहे. हा लेख खरोष्ट्री भाषेंत असून त्या लेखाचा काळ इसवी सन ७८ हा आहे. त्या लेखाचा सारांश असा आहे.

"आझीसच्या १३६ व्या वर्षीं आषाढाच्या पौर्णिमेस नोच नगरांत राहणाऱ्या लोतप्रियाच्या मुलानें तक्षशीलेंतील धर्मराजिकास्तूपाच्या बोधिसत्व विहारात बुद्ध देवाचे अवशेष राजाधिराज महाराज कुशन यांच्या आरोग्याकरितां ठेविले आहेत."

या खोल्यांच्याहि पलीकडे असलेल्या एका खोलींत काळ्या, पांढऱ्या, पिवळ्या व निळ्या रंगाच्या काचेच्या विटांची फरशी केलेली मिळाली आहे. यावरून काचकामाची कला हिंदुस्थानांत फार पूर्व काळापासून

ठाऊक होती असें सिद्ध झालें आहे. इतकेंच नाहीं तर चीनमध्यें काच-कामाची कला उत्तरहिंदुस्थानांतून आली या परंपरागत समजाचें या शोधानें समर्थन होत आहे.

मुख्य स्तूपाला आम्ही प्रदक्षिणा घालून स्तूपाच्या उत्तरेच्या उंचवट्या-कडे गेलों. तेथून या सर्व भागांत खोदकाम करून सांपडलेले किती तरी वास्तुकलेचे नमुने दृग्गोचर होतात. तसेंच येथून बऱ्याच दूरचा भाग दिसून येतो व त्यावरून तक्षशीलेच्या प्राचीन विस्ताराची उत्तम कल्पना मनांत येते.

धर्मराजिका स्तूप व त्याच्या आसपासच्या इमारती पाहिल्यावर आम्ही डाव्या बाजूकडे वळलों व हत्तीयाल टेकडीकडे चाललों. इकडे जातांना साफ रस्ता नाहींच म्हटलें तरी चालेल. बहुतेक रस्ता दगडाळ व खांच-खळग्याचा आहे. पण हा रस्ता टाकून टेकडीच्या माथ्यावर आलें म्हणजे आणखी एक मोठा स्तूप लागतो. हा स्तूप एकटाच आहे. धर्मराजिका स्तूपाप्रमाणें याचे आसपास व सभोंवार इमारती नाहींत. हा स्तूप बराच उंच आहे व एकावर एक असे तीन चबुतरे केले असून मग त्यावर स्तूप बांधला आहे. या स्तूपाचें नांव कुनाल स्तूप असें आहे. हा स्तूप अशो-कानें आपल्या कुनाल नांवाच्या मुलाचें स्मारक म्हणून बांधला अशी दंत-कथा आहे. तक्षशीलेंत हुएन सँग राहिला होता तेव्हां त्यानें हा स्तूप पाहिला होता व त्याचें वर्णनहि त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत दिलें आहे. तसेंच या स्तूपाच्या नांवाबद्दलची दंतकथाहि हुएनसंगनें दिली आहे. ही दंतकथा अशी आहे.

आपली पतिव्रता पत्नी असंधिमित्रा इच्या मरणानंतर अशोक राजानें आपल्या उत्तर वयांत तिष्यरक्षिता नांवाच्या दुर्वृत्त व उच्छृंखल तरुणीशीं लग्न केलें. अशोकाला पहिल्या पत्नीपासून झालेला कुनाल नांवाचा मुलगा होता. या मुलाचे डोळे फारच सुंदर होते. तिष्यरक्षिता या तरुण मुला-कडे कामुक दृष्टीनें पाहूं लागली. आपल्या सावत्र आईच्या त्या विषयी चेष्टांबद्दल त्या धर्मशील तरुणानें आपल्या सावत्र आईची चांगली कान-उघडणी केली. यामुळें तिष्यरक्षिता या मुलाचा द्वेष करूं लागली व तिनें

आपली प्रार्थना नाकारल्याबद्दल या मुलाचा सूड घेण्याचा कट केला. तिनें अशोकाशीं साखरपेरी भाषण करून दूरच्या तक्षशिला प्रांताच्या कारभारावर देखरेख करण्याकरितां कुनालाला पाठविण्याबद्दल राजाचें मन वळविलें. राजकुमारानें राजाची आज्ञा शिरसा वंद्य मानून तक्षशीलेस जाण्याचें ठरविलें. जातांता राजानें राजकुमारास सांगितलें कीं, मी जे हुकूम तुला पाठवीन त्यांवर माझ्या दाताचा ठसा उठवीन तरी असा ठसा पाहून हुकुमाच्या खरेपणाबद्दल आपली खातरी करून त्याप्रमाणें वागत जा. तिष्यरक्षिता आपला कट पार पाडण्याची संधि पहात होती.

तक्षशीलेंतील राजकुमाराच्या प्रधानाच्या नांवानें एक हुकूम तिष्यरक्षितेनें तयार केला. त्यांत हुकूम पोंचतांच राजकुमाराचे डोळे काढून टाकून त्याला व त्याच्या बायकोला रानांत सोडून द्यावें असा मजकूर होता. तिष्यरक्षितेनें तो हुकूम बंद करून त्यावर तांबडी लाख घातली व राजा निजला असतां चोरून त्याच्या दांताचा ठसा लाखेवर उठवून घेतला व ताबडतोब तो हुकूम तक्षशीलेस पाठवून दिला. प्रधानांना तो हुकूम मिळाल्यावर त्यांना काय करावें तें सुचेना. प्रधानांच्या मनाची चलबिचल पाहून राजकुमारानें त्यांना त्याचें कारण विचारलें. त्यांनीं हुकुमांतला मजकूर सांगितला व पुनः पाटलीपुत्र शहराकडे माणूस पाठवून राजाज्ञेच्या खरेपणाबद्दल चवकशी करूं व तेथपर्यंत रामकुमारानीं आमच्या ताब्यांत राहावें असें म्हटलें. परंतु राजकुमार म्हणाला " जर माझ्या वडिलांनीं मला मारून टाकण्याचा हुकूम केला आहे तर तो मान्य केलाच पाहिजे. या हुकूमावर माझ्या वडिलांच्या दातांचा ठसा आहे. तेव्हां या हुकुमाच्या खरेपणाबद्दल शंका कसली ? तरी तुम्ही हुकुमाप्रमाणें वागण्यास विलंब करूं नका. " नंतर राजकुमारानें एका अतिशूद्रास आपले डोळे काढण्याचा हुकुम केला. हुकुमाची ताबडतोब अंमलबजावणी झाली. आंधळा राजकुमार व त्याची पतिव्रता स्त्री भिक्षा मागत वाट फुटेल तिकडे चालली. जातांजातां ती पाटलीपुत्र शहराला येऊन पोंचली. तो आंधळा राजकुमार आपल्या मनाशीं म्हणाला " भूक व थंडीवारा यांपासून मला किती दुःख होत आहे. मीं राजकुमार होतों; आतां भिकारी झालों आहें.

आपली ओळख पटवून आपल्यावर नाहक आलेल्या आरोपाचें परिमार्जन करतां येईल तर किती बहार होईल." त्यानें राजवाड्याच्या आंतल्या चौकांत आपला शिरकाव करून घेतला व तेथें पोंचल्यावर त्यानें वीण्यावर एक शोकरसात्मक गाणें गाईलें. राजानें तें गाणें ऐकलें व आपल्या मुलाचा तो आवाज आहे असें ओळखून राजानें गाणारास आपल्याकडे बोलावून घेतलें. राजानें जेव्हां आपल्या अंध झालेल्या मुलाला पाहिलें तेव्हां त्याला अतोनात दुःख झालें व त्यानें कोणाच्या कौटिल्यामुळें हें संकट तुझ्यावर आलें असें राजकुमाराला विचारलें. राजकुमारानें उत्तर दिलें. 'आपल्याच हुकुमानें हें घडून आलें.' अशोक राजानें तिष्यरक्षितेचें हें कौटिल्य आहे हें जाणलें. त्यानें तिष्यरक्षितेला जिवंत जाळण्याची शिक्षा दिली व या कटांतील इतर साथीदारांनाही कडक शिक्षा दिल्या. नंतर अशोक राजानें राजकुमारास बुद्धगया येथें महाबोधी वृक्षाखालीं राहणाऱ्या घोष नांवाच्या बुद्धभिक्षूकडे नेलें. व राजकुमाराचे डोळे परत आणण्याकरितां प्रार्थना केली. दुसऱ्या दिवशीं पुष्कळ मंडळी माझ्या धर्मप्रवचनाचें श्रवण करण्यास बोलवावी व प्रत्येकानें अश्रु साठविण्याकारितां एक भांडें बरोबर घेऊन यावें अशी घोष भिक्षुनें आज्ञा केली. दुसरें दिवशीं स्त्रीपुरुषांचा मोठा जमाव जमला व घोष भिक्षूच्या प्रवचनानें प्रत्येकाच्या डोळ्यास टिपें आल्यावांचून राहिली नाहींत. नंतर या सर्व अश्रूचें पाणी भिक्षुनें एका सोन्याच्या भांड्यांत घातलें व तो म्हणाला "जर मी आज सांगितलेल्या गोष्टी खोट्या असतील तर आहे या स्थितींत फरक होणार नाहीं. पण जर मी सत्यधर्म प्रतिपादन केला असेल तर या अश्रुजलानें धुतल्यावर राजकुमाराचे डोळे पूर्ववत होतील." या नंतर कुनालानें त्या अश्रुजलानें आपले डोळे धुतले व त्याची दृष्टि पूर्ववत् झाली.

हा कुनालस्तूप सिरकप शहराच्या तटाशींच आहे. या शहराचा तट हत्तीयाल टेकडी व त्याच्या जवळचें मैदान या सभोंवतीं आहे. आतां हा सर्व मोकळा करण्यांत आला आहे. टेकडी उतरून खालीं मैदानावर आलें म्हणजे शहराचें प्रवेशद्वार लागतें. या प्रवेशद्वारांतून बरेंच पुढें गेल्यावर

मोठा एक वाडा लागतो. यांत कितीतरी दालनें, दिवाणखाने व खोल्या दृष्टीस पडतात. हा या शहरांतला राजवाडा होता. जरा पुढें गेल्यावर एक लांबचलांब रस्ता लागतो व त्याच्या दुतर्फा घरें लागतात. हा रस्ता पाहून आम्हांला रायगड किल्यावरील वस्तीची आठवण झाली. तेथल्याप्रमाणें येथलीं घरें रस्त्यापासून फार उंच दिसलीं. या रस्त्यामधून जात जात आम्ही शहराच्या तटाच्या उत्तरेच्या दरवाजाकडे आलों व त्या दरवाजांतूनच आम्ही शहराबाहेर पडलों. तक्षशीलेचें सांपडलेलें सिरसुख नांवाचें तिसरें शहर व त्याच्याहि पलीकडे सांपडलेले वास्तुकलेचे मासले येथून बरेच दूर असल्याचें मार्गदर्शकानें सांगितल्यामुळें आम्ही तिकडे जाण्याच्या भानगडींत पडलों नाहीं.

तक्षशीला या पूर्वकालीन विद्यापीठाकरितां प्रसिद्ध असलेल्या शहराचें इतकें तरी दर्शन आपल्याला घडलें यांतच समाधान मानून आम्ही तडक सराईकाला स्टेशनवर आलों.

आतां आपण तक्षशीलेच्या पूर्वपीठिकेकडे पाहूं. मथुरेप्रमाणें तक्षशीला हें शहर फार पुरातन काळचें आहे असें दिसतें. तक्षशीलेचा उल्लेख महाभारतांतसुद्धां आहे. जनमेजय राजानें तक्षशीला काबीज केली असा उल्लेख जनमेजयाच्या सर्पसत्राच्या वर्णनाच्या ठिकाणीं आला आहे. रामायणांत तर तक्षशीला शहराच्या स्थापनेची हकीकत खालील श्लोकांत आली आहे.

हतेषु तेषु सर्वेषु भरतः केकयीसुतः ।<br>
निवेशयामास तदा समृद्धे द्वे पुरोत्तमे ॥<br>
तक्षं तक्षशीलायां तु पुष्कलं पुष्कलावते ।<br>
गन्धर्वदेशे रुचिरे गान्धारविषये च सः ॥

" सर्व गन्धर्व मारल्यावर कैकयीचा मुलगा भरत यानें तक्षशीला व पुष्कलावत अशीं दोन समृद्ध शहरें वसविलीं व गन्धर्व देशांतील तक्षशीलेंत त्यानें आपल्या तक्ष मुलाची स्थापना केली व गान्धार देशांतील पुष्कलावतांत पुष्कलाची स्थापना केली. "

कालिदासानें रामायणांतील ही हकीकत आपल्या रघुवंशांत खालील श्लोकांत थोडक्यांत पण खुबीदार रीतीनें ग्रथित केली आहे.

भरतस्तत्र गंधर्वान् युधिनिर्जित्य केवलान् ।
आतोद्यान् ग्राहयामास समत्याजयदायुधं ॥
स तक्ष-पुष्कलौ पुत्रौ राजधान्योस्तदाख्ययोः ।
अभिषिच्याभिषेकार्हौ रामान्तिकमगात् पुनः ॥

" त्या ठिकाणीं भरतानें लढाईंत सर्व गन्धर्वांचा पराजय केला व आपलीं आयुधें त्यांना टाकून द्यावयास लावून आपलीं वाद्यें घ्यावयास लाविलें. त्यानें अभिषेकास योग्य अशा आपल्या तक्ष व पुष्कल या नांवांच्या मुलांची तक्षशीला व पुष्कलावत या राजधान्यांमध्यें प्रस्थापना करून तो परत रामाजवळ गेला. "

यापुढें इतिहासकाळाकडे पाहूं लागलें असतां असें दिसतें कीं, ख्रिस्तीशकापूर्वी पांचशें वर्षांपूर्वीं तक्षशीला परशीयाच्या राजाच्या ताब्यांत आली होती. कारण परसिपोलीस येथील डरायस राजाच्या शिलालेखांत नव्यानें स्थापलेल्या हिंदुस्थानच्या सुभ्याचा उल्लेख आहे. हा सुभा म्हणजे सिंधप्रांत व सिंधुनदीच्या पूर्वेकडला थोडासा भाग यांमिळून झालेला असावा असें म्हणणें आतां प्राप्त आहे. कारण तक्षशीलेंत पुराणवस्तु खणून काढतांना ख्रिस्तीशकापूर्वीच्या चारशें किंवा पांचशें वर्षांच्या सुमाराचा एक शिलालेख सांपडला आहे व त्याची लिपी आरमईक म्हणजे परशीयन लिपीसारखी आहे. या लिपीवरून परशीयाचा अंमल तक्षशीलेंत झाला होता असें ठरून डरायसच्या शिलालेखाचा खरेपणा सिद्ध होतो; पण पुढील काळांत तक्षशीला एक मोठें विद्यापीठ या नात्यानें प्रसिद्ध होतें असें बुद्धजातककथांवरून दिसून येतें.

शिकंदर बादशहाच्या स्वारीच्या वेळीं आंभी नांवाचा राजा तक्षशीलेंत राज्य करीत होता. शिकंदराची स्वारी सिंधूच्या अलीकडे आल्यावर तक्षशीलेच्या राजानें शिकंदराचें मांडलिकत्व पतकरलें व शिकंदर इसवीसनापूर्वीं ३२६ या वर्षीं पोरस राजावर मोहीम करण्यापूर्वीं तक्षशीलेंत कांहीं दिवस राहिला

होता हें इतिहासप्रसिद्धच आहे. परंतु पंजाबावरील शिकंदर बादशहाचा अंमल त्याच्या मरणानंतर लवकर नाहींसा झाला. कारण मगधाचें राज्य चंद्रगुप्त मौर्य यानें मिळविलें व त्यानें ग्रीक लोकांना हिंदुकुश पर्वतापलीकडे घालवून दिलें व तेथपर्यंतच्या मुलुखावर आपला सक्त अंमल बसविला. अर्थात् तक्षशीला व त्या सभोंवतालचा प्रदेश मगध साम्राज्यांत अन्तर्भूत झाला. चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार याचे कारकीर्दींत अशोक राजकुमार तक्षशीलेस त्या प्रांताचा सुभेदार होऊन आला. पुढें अशोकाच्या कारकीर्दींत तक्षशीलेस बुद्धधर्माचें फारच प्राबल्य वाढलें. अशोकाच्या मरणानंतर मगधाच्या साम्राज्यास उतरती कळा लागली व बकट्रिया येथें स्थाईक झालेल्या ग्रीक राजांनीं पुन: पंजाब प्रांत सर केला व तक्षशीला येथें ग्रीक राजे झाले. तक्षशीलेवर ग्रीक अंमल सरासरी शंभर वर्षें होता. याच काळांत भीरटेकडी नांवाच्या स्थळीं जें तक्षशीला शहर होतें तें मोडकळीस येऊन त्याचें हल्लीं सिरकप म्हणून शोध लागलेल्या ठिकाणीं स्थलांतर झालें व तेथें नवें शहर वसविलें गेलें. ग्रीक अंमलानंतर तक्षशीलेवर शकलोकांचा अंमल सुरू झाला. हाही सुमारें शंभर वर्षें टिकला. पुढें कुशन घराण्याचें मोठें साम्राज्य या भागांत झालें व तक्षशीला कुशन राजांच्या ताब्यांत गेली. कुशन घराण्यांतील सर्वांत पराक्रमी व बलाढ्य राजा जो कनिष्क याच्या कारकीर्दींत तक्षशीलेचें आणखी एकदां स्थलांतर होऊन त्यानें सिरसुख नांवाचें नवें शहर वसविलें. कुशन घराण्याचें राज्यवैभव सरासरी दोनशें वर्षें टिकलें. पण वासुदेव या नांवाच्या कुशन घराण्यांतील राजाच्या मरणानंतर कुशनांचे राज्यवैभव नष्ट झालें. वासुदेव कुशन याच्यावर हिंदुधर्माचा पगडा बसला व एव्हांपासून तक्षशीलेंत बुद्धधर्माचें वर्चस्व कमी झालें. पुढें मग यावर गुप्त घराण्याचे राजे झाले. त्यांनीं सर्व हिंदुस्थान काबीज केलें व हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें. त्यांच्या कारकीर्दींत फेहायन हा तक्षशीलेस आला होता. तेथें अजून बुद्ध धर्माचें बरेंच प्राबल्य होतें. गुप्त साम्राज्याचा व त्यांच्या संस्कृतीचा नायनाट हूण लोकांच्या स्वाऱ्यांनीं केला. व त्या लोकांनीं शहरांची जाळपोळ व नासधूस केली. तेव्हांपासून तक्षशीलेचें विद्यापीठ या नात्यानें महत्त्व कमी झालें व शह-

राहि मोडकळीस येऊन तें नामशेष झालें. हुएन संगाच्या काळीं तक्षशी-लेचें वैभव नष्टप्रायच झालें होतें. पुढच्या काळांत तर या प्रसिद्ध विद्यापीठाचा जो मागमूस व ठावठिकाण नाहींसा झाला तो अगदीं अर्वाचीन काळापर्यंत टिकला. इंग्रज अंमलांतील पुराणवस्तुसंशोधनाच्या उद्योगानें या फार पुरातन शहराचा शोध लागला आहे व या स्थळीं सापडलेल्या पुरातन वस्तूंनीं हिंदुस्थानच्या इतिहासावर नवा नवा प्रकाश पडूं लागला आहे. अशी तक्षशीलेची विविधस्थित्यंतरांनीं युक्त पूर्वपीठिका आहे. असो.

पेशावराला श्रीयुत गोगटे या नांवाचे एक सबआसिस्टंट सर्जन तेथल्या मराठा पलटणींत होते, त्यांच्याकडे उतरावयाचें आम्ही ठरविलें होतें. 'पेशावराला तीन वाजतां आम्ही येऊं,' अशी तार त्यांना करून आम्ही गाडींत बसलों, व गाडी चालू झाली.

कॅंबेलपुर स्टेशन सोडल्यावर लागलीच टेकड्यांचीं रांगचीं रांग दृग्गोचर होऊं लागली; खडकाळ व उंचवट अशा भागांतून गाडी जाऊं लागली, व लवकरच अटक स्टेशनवर गाडी येऊन पोहोंचली. आम्ही गाडींतून खालीं उतरतों, तोंच गाडी फूं फूं करीत पुढें निघून गेली.

ज्या ठिकाणाचें नांव वयाच्या दहाव्या वर्षापासून मला अवगत होतें, ज्या ठिकाणीं पोहोंचून आपल्या भगव्या झेंड्याचें निशाण रोवल्याबद्दल सर्व मराठ्यांना अजूनहि अभिमान वाटतो, माझ्या प्रवासाचा बेत ठरल्यापासून ज्या ठिकाणचा मला सारखा निदिध्यास लागला होता, त्या ठिकाणीं एकदां आपण सुखरूप येऊन पोहोंचलों, हें पाहून आम्हांला किती आनंद झाला म्हणून सांगूं? आमच्याबरोबर कॅंबेलपुरच्या वकीलसाहेबांनीं आपले चिरंजीव पाठविले होते, व अटकेच्या किल्ल्यावरील कमांडरला चिठीहि दिली होती; तेव्हां आम्ही स्टेशनवर सामान ठेवून टांगा करून तडक अटक किल्ल्याकडे गेलों.

स्टेशनापासून किल्ला सुमारें पाऊण मैल आहे. अटकेचा किल्ला म्हणजे सिंधूनदीच्या तीराला ज्या टेकड्या आहेत, त्यांच्या सभोंवार एक तट बांधलेला आहे. नदीच्या प्रवाहापासून जी तटाला सुरवात होते ती टेकडीच्या थेट माथ्यापर्यंत जाते. यामुळें किल्ल्याच्या तटामध्यें उंचसखलपणा

अत्यंत आहे; शत्रु नदी उतरून अलीकडे येऊं लागल्यास त्याला प्रतिबंध करण्याकरितां हा किल्ला अकबरबादशाहानें सन १५८१ मध्यें बांधला. आम्ही कमांडरला चिठ्ठी दाखवून त्यावर परवानगीची सही घेऊन इंग्रज शिपायांच्या पाहाऱ्यांतून आंत गेलों. किल्ला कांहीं फार मोठा नाहीं. अटक गांवची वसती किल्ल्याला लागूनच नदीच्या कडेला आहे. टेकड्या व नदीचा तीर यांमध्यें खुली जागा फारच थोडी आहे. हें पूर्वीं जिल्ह्याचें ठिकाण होतें. पण संकुचित जागेमुळें येथें वसती वाढवावयाला अवसर नसल्यामुळें उघड्या जागेवर असलेल्या कँबेलपुर या गांवीं जिल्ह्याचें ठिकाण नुकतेंच करण्यांत आलें आहे.

आम्ही तटातटानें बहुतेक सर्व किल्ला फिरलों. किल्ल्याच्या तटावरून सिंधू नदीचा देखावा अवर्णनीय दिसतो. उजव्या हाताला टेकड्यांच्या पलीकडे सिंधुनदीचें पात्र फारच रुंद व म्हणूनच प्रवाह शांत आहे. अटकच्या शेजारींच सिंधु व काबूल या नद्यांचा संगम झाला आहे. ही नदीहि सपाट प्रदेशावरून येते. याप्रमाणें सपाट प्रदेशावरून संथपणें व प्रशस्तपणें या नद्या वहात येऊन मग तेथें एकमेकींना मिळून अटकेजवळच्या टेकड्यांत जणूं काय घुसत आहेत, असा येथें भास होतो. कारण, अटकेच्या दोनहि बाजूंना उंचउंच टेकड्या आहेत, व सिंधु नदी या उंचउंच टेकड्यांमधल्या अरुंद मार्गानें व म्हणूनच विलक्षण वेगानें जाऊं लागते. रुंद व मोकळ्या पाटानें वहाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाला अरुंद नळ लावला, म्हणजे जशी पाण्याची स्थिति होते, तशी येथें सिंधूची स्थिति झाली आहे. यामुळें या ठिकाणीं नदीचें पात्र अरुंद आहे, पण प्रवाहाचा वेग व पाण्याची खोली, हीं कल्पनातीत आहेत.

आम्ही तटावरून निरनिराळ्या बुरुजांवरून येथली शोभा पहातपहात खालीं येत होतों. अलिकडे व पलीकडे निर्वृक्ष व जांभळटकाळसर खडकांच्या त्या प्रचंड टेकड्या, आणि मध्यें नजर न ठरणाऱ्या वेगानें वाहणारी ती सिंधु नदी, हीं पाहिलीं, म्हणजे या ठिकाणाला 'अटक' हें नांव कां पडलें असावें हें तेव्हांच ध्यानांत येऊन आपल्या लोकांना अटक हें हिंदुस्तानचा शेवट असें कां वाटे, व अटकेला झेंडे नेणें म्हणजे सर्व

हिंदुस्तान काबीज करणें असें कां वाटे याचाहि सहज उलगडा होतो.

याच नदीच्या पर्शियन उच्चारावरून सिंधुनदीपलीकडील देशाला ' हिंदुस्तान ' असें नांव मिळालें, व हिंदुस्तानची ही स्वाभाविक मर्यादाच आहे. सिंधु नदी टाकली, कीं, पूर्वींचा गांधार देश लागे. आतां त्याला ' वायव्यसरहद्दीवरचा प्रांत ' म्हणतात. या टेकड्यांवर सैन्य ठेवून जर नदीचा मार्ग बंद केला तर हिंदुस्तानच्या वायव्य टोंकाची नाकेबंदी केल्याप्रमाणें आहे, व म्हणूनच अकबरबादशाहानें आपल्या साम्राज्याच्या संरक्षणाकरितां येथें हा किल्ला बांधला.

तटावरून खालीं येतांयेतां आम्ही अगदीं नदीच्या किनाऱ्याजवळ आलों. तेथें लहानसा घाट होता. त्याच्या पायऱ्या उतरून अगदीं पाण्याजवळ गेलों, व प्रवाहांत हात घातला, तों बर्फासारखें अगदीं थंडगार पाणी हाताला लागलें. पाणी धूसर रंगाचें दिसलें. कारण, वरून येतांना पाण्यांत रेती पुष्कळच मिसळलेली असते. आम्ही उभे होतों, त्याच्यां समोर नदींतील नाव लागण्याची जागा होती. येथें प्रवाह कांहीं फारसा रुंद नाहीं; पण पाण्याला ओढ फार असल्यामुळें समोरासमोर येणें शक्यच नाहीं. त्या तीरावरून या तीरावर यावयाचें म्हणजे किती तरी वांकडेंवांकडें यावें, तेव्हां पैलतीराला पोहोंचणें शक्य आहे, असें आम्हांला दिसून आलें.

या घाटावर आम्ही थोडा वेळ थांबलों; पण त्या सर्व वेळांत माझ्या मनांत किती तरी विचार येत होते! हल्लींच्या आम्हां हिंदु लोकांचे फार जुने पूर्वज आर्यलोक ही नदी ओलांडून हिंदुस्तानांत आले, तेव्हांपासून त्यांना या नदीचें कौतुक वाटत आलें आहे. या नदीचा देखावाच असा आहे, कीं, ती पाहून तिच्याबद्दल आश्चर्य व आदर वाटण्याखेरीज गत्यंतरच नाहीं! * नदीचा या ठिकाणचा जोर, तिचा धो धो आवाज व तिची एकंदर गति हीं अवर्णनीय आहेत. याच ठिकाणीं पूर्वऋषींनीं सिंधूच्या देखाव्यानें आश्चर्यचकित होऊन वेदांतील वर्णनें केलीं असलीं पाहिजेत असें मला वाटलें. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतलें सिंधूच्या वर्णनाचें एक प्रसिद्ध सूक्त आहे.

या सूक्तांत पंजाबांतील बहुतेक नद्या, गांधार देशांतील दोन नद्या, आणि मध्यदेशांतील दोन नद्या इतक्यांचीं नांवें आलीं आहेत. यावरून त्या काळीं आर्य लोकांना हिंदुस्तानच्या कोणत्या भागाचें ज्ञान होतें, हें कळून येतें. हें सूक्त या नद्यांचीं स्तुति करण्याच्या उद्देशानें केलेलें आहे; पण त्यांत मुख्यतः सिंधूला आवाहन केलेलें आहे. त्याचें भाषांतर असें—

१. हे नद्यांनो ! यजमानाच्या घरीं कवि तुमच्या सर्वोत्कृष्ट महिम्याचें वर्णन करतो. सातसात अशा त्या तीन मार्गांनीं वहातात. वाहाणाऱ्या ( नद्यां ) मध्यें सिंधु आपल्या सामर्थ्यानें श्रेष्ठ आहे.

२. हे सिंधु. जेव्हां तूं अन्नाकडे वहात गेलीस, तेव्हां तुला जाण्याकरितां वरुणानें मार्ग खुले केले. तूं उंच व निमुळत्या मार्गानें भूमीवर येतेस, म्हणून तूं या सर्व जाणाऱ्यांच्या ( नद्यांच्या ) अग्रभागीं जातेस.

३. तुझा ( धोधो ) आवाज जमिनीवरून आकाशांत जातो. ती सिंधु आपला अनंत असा जोर ( लाटा ) तेजस्वितेनें उसळविते. जेव्हां सिंधु डुरकणाऱ्या बैलाप्रमाणें येते, तेव्हां ( तिचा आवाज ) मेघांतून होणाऱ्या वृष्टीच्या गर्जनेप्रमाणें होतो.

४. हे सिंधु ! ज्याप्रमाणें आई मुलांकडे किंवा दुधासह गाई ( वासरांकडे ) जातात, त्याप्रमाणें शब्द करणाऱ्या ( नद्या ) तुझ्याकडे जातात. तूंच युद्धकुशल राजाप्रमाणें दोन्ही बाजू पुढें नेतेस व निमुळत्या जाणाऱ्या नद्यांच्या अग्रभागीं तूं जातेस.

५. हे गंगे, यमुने, सरस्वति शुतुद्रि ( सतलज ) परुष्णासिह ( रावीसह ) माझ्या स्तवनाचा स्वीकार करा. हे मरुद्वृधे ( सिंधु? ) असिक्नी ( चिनाब ) सह वितस्ते ( झेलम ) सह व अर्जीकिये ( बियास ) सुषोमेसह माझें ( स्तवन ) ऐका.

६. हे सिंधु, तृष्टामा, रस, श्वेता सुसर्तू याच्याशीं वाहण्याकरितां प्रथमतः संगत होऊन मग कुभेसह ( काबूल नदी ) क्रुमुशीं (कुरुम) व मेहत्नूसह गोमतीशीं संगत हो. नंतर तूं या सर्व नद्या घेऊन पुढें जातेस.

७–८. सरळ जाणारी आणि (एणी नांवाच्या हरणासारखी) चपलतेनें वहाणारी, देदीप्यमान, अशी सिंधु आपल्या महिम्यानें विस्तीर्ण प्रदेशचे प्रदेश भरून टाकते. अप्रतिहत कर्तृत्ववान् नद्यांमध्यें श्रेष्ठ घोडीसारखी चित्राविचित्र व युवतीसारखी दर्शनीय; अश्व, रथ, कार्पासवस्त्र, अन्न, सुवर्ण, लोंकर, सलिमा (नांगराचा फाळ बांधावयाच्या दोरीची वनस्पति) यांनीं संपन्न व सुकृति, तरुण, सुभग अशी सिंधु मधु पोषण करणाऱ्या (ओषधीं) नीं आपलें अवगुंठन करते.

९. सुखद अश्वांनीं युक्त असा रथ सिंधु जोडते. त्या रथांत बसून ती आम्हांला या युद्धांत अन्नधन देवो. अप्रतिहत स्वयंकीर्तिमान् शक्तिमान् अशा या रथाचा महिमा (लोक) गातात.

या सूक्तांत किती तरी नद्यांचीं नांवें आलेलीं आहेत. त्यांपैकीं सर्वांची हल्लींच्या नांवांशीं संगति जोडलेली नाहीं. तरी पण या सूक्तांत पंजाब, गांधार व मध्यदेश या प्रदेशांतील बहुतेक नद्यांचा उल्लेख आलेला आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे, व यावरून वेदकाळीं इतक्या प्रांतांत आर्यांची वसाहत झाली होती, असें दिसतें. असो.

आम्ही घाटावर बसून एकंदर देखावा किती तरी वेळ पहात होतों. आमच्या पावलांजवळच सिंधूचा तो विलक्षण वेगानें वहाणारा व दोन्ही बाजूंच्या टेकड्यांच्या काळसरजांभळट खडकाला भेदून जाणारा प्रचंड प्रवाह; अलीकडे टेकड्यांच्या माथ्यापर्यंत वरवर जाणारा तो किल्ल्याचा तट; पलीकडे टेकड्यांतून नागमोडीनें जाणारी रेलवे व पायरस्ता आणि खैराबादचें स्टेशन व त्याच्याहि पलीकडे उंच टेकड्यांची रांग; उजव्या हाताला काबूल व सिंधु या नद्यांचा संगम आणि त्यांचीं रुंद व संथ पात्रें; डाव्या बाजूला दोन्ही नद्यांचे मिळून एकच अरुंद-पण लांबवर तटासारख्या खडकाच्या आकुंचित मार्गानें जावें लागल्यामुळेंच जणूं कांहीं रागावून खडकावर धो धो आवाज करून लाटा आपटणारा तो सिंधूचा एकच प्रवाह, हा सर्व देखावा केवळ अदृष्टपूर्व आहे, असें माझ्या मनाला वाटलें;

व असा देखावा सुदैवानें दृष्टिगत करण्याचा सुयोग मला आला, म्हणून मनाला विलक्षण आनंद वाटला.

आतां बराच वेळ झाला, म्हणून परिचित मंडळीचा निरोप घेतांना इंग्रजी तऱ्हेनें हस्तांदोलन करतात, त्याप्रमाणें सिंधूच्या गारगार पाण्याला पुनः एकदां स्पर्श करून त्या स्पर्शसुखाचा अनुभव घेतघेत आह्मी मोठ्या नाखुषीनें परत फिरलों. परततांना आम्ही अटक गांवाहून आलों. हें गांव अगदीं खेडेवजा लहान आहे. वाटेनें मेवामिठाईच्यीं, कापडाचीं, किराण्या जिनसांचीं थोडीशीं दुकानें लागलीं, तेव्हा आम्ही त्या गांवच्या पेठेंतूनच बाहेर पडलों, असें वाटलें.

थोड्याच वेळानें आम्ही स्टेशनवर येऊन पोहोंचलों. सिंधुनदीच्या सभोंवतालच्या सर्व टेकड्या अगदीं उघड्या निर्वन आहेत, व खडकहि जांभळ्या रंगाचा आहे. स्टेशनच्या जवळच सिंधूवरील पूल आहे, तेव्हां तो पूलहि पहावयाला आम्ही गेलों. या पुलावर नेहमीं संत्रीपहारा असतो. पूल कांहीं फार लांब आहे, असें नाहीं. मात्र तो फारच उंच आहे. सर्व पूल लोखंडीच आहे, व तो दुमजली आहे. खालच्या मजल्यावर पायरस्ता व गाडीरस्ता आहे, आणि वरच्या मजल्यावरून आगगाडीचा रस्ता आहे. पूलाचे खांब लोखंडी आहेत. व त्या खांबांच्या पुढें दगडी लंबवर्तुलाकार दुसरे खांब बांधलेले आहेत. हे खांब जुन्या पुलाचे आहेत, किंवा पाण्याच्या प्रवाहाचा जोर लोखंडी खांबांवर पडूं नये, व प्रवाह त्या त्या ठिकाणीं दुभंगून जावा म्हणून ते मुद्दाम बांधलेले आहेत, हें समजलें नाहीं. पण येथें प्रवाहाचा जो विलक्षण वेग आहे, तो लक्ष्यांत घेतां दुसरीच कल्पना खरी असावी, असें वाटलें. आम्ही सर्व पूल ओलांडला. पुलाच्या मध्यावर आल्यावर सिंधूच्या दोन्ही बाजूंचा प्रवाह दूरवर दिसत होता. प्रवाह एकीकडे संथ, तर दुसरीकडे वेगवान्, असा तो त्याचा विरोध फार प्रेक्षणीय होता. सर्व पूल ओलांडल्यावर आम्ही परतलों, व स्टेशनवर आलों. तों आमची गाडी येण्याची वेळ झाली, थोड्याच वेळानें गाडी आली, व गाडींत बसून आम्ही आमच्या पुढील मुक्कामाकडे चालू झालों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम..



अटकेपासून खैराबाद हें स्टेशन दोनच मैल असल्यामुळें तें लवकरच आलें. या स्टेशनच्या जरा पुढें गेल्यावर कॅंबेलपूर सोडल्यापासून जो डोंगराळ मुलुख लागतो, तो सरतो, व पुनः सपाट सुपीक प्रदेशाला सुरुवात होते. हा रेलवेरस्ता काबूल नदीच्या कांठाकांठानेंच बराच वेळ गेलेला आहे. काबूल व तिला मिळणारी बांडा नदी यांचे कालवे या प्रांतांत दृग्गोचर होतात. व यामुळें ठिकठिकाणीं हिरवींगार शेतें दृष्टीला पडतात.

अटकपासून नवशेरा म्हणून जोडस्टेशन लागतें; येथून दरगाईपर्यंत चाळीस मैलांचा एक फांटा गेला आहे. नवशेऱ्यानंतर फारसें मोठें स्टेशन लागत नाहीं. साडेतीन वाजण्याच्या सुमाराला आम्हीं पेशावर कॅंटोनमेंट स्टेशनला येऊन पोहोंचलों. श्रीयुत गोगटे हे स्टेशनवर आले होते. स्टेशनवरून आम्ही तडक त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों.

ज्या मार्गानें आमचे पूर्वज आर्यलोक. प्रथमतः हिंदुस्तानांत आले व पुढेंहि त्यांच्या टोळ्यांवर टोळ्या आल्या, पुढें ऐतिहासिक काळांत ज्या मार्गानें हिंदुस्तानावर निरनिराळ्या स्वाऱ्या झाल्या, आशिया व हिंदुस्तान या मधला दळणवळणाचा जो जुना एकच मार्ग, तो खैबर घांट पहाण्याचें माझ्या मनांत होतें. पण या घांटानें मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशींच सर्व दळणवळण चालतें, व त्या दिवशीं जामरुड (ब्रिटिश सरहद्दीवरील एक किल्ला) पासून तों लंडीकोटा ( अफगाण सरहद्दीवरील एक किल्ला ) येथपर्यंत २७ मैलांच्या एकंदर घांटांत शिपायांचा संगिनी पहारा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ठेवून मग मधून गाड्या, टांगे, उंट, घोडे, बैल वगैरे सर्व तऱ्हेच्या वाहनांचा आणि पादचारी यांचा तांडा निघतो. इतर वेळीं सरहद्दीवरील पठाण केव्हां हल्ला करून मनुष्याला घेऊन जातील, याचा नेम नसतो. आम्ही पेशावरला पोहोंचलों, तो मंगळवारचा दिवस होता. अर्थात् खैबर घांट पहावयाचा तर आह्मांला शनिवारपर्यंत पेशावरांत रहाणें भाग होतें. इतके दिवस रहावयाला आम्हांला सवड नसल्यामुळें मोठ्या नाखुशीनेंच नाइलाज ह्मणून आम्हांला तो घांट पाहण्याचा नाद सोडून द्यावा लागला. जामरुड पेशावरापासून दहाबारा

मैल आहे; पहांटेला निघून तेवढा पाहून येण्याचें आम्ही ठरविलें, व मग गांवांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाला बाहेर पडलों.

प्रथमतः आम्ही अजबखाना पहावयाला गेलों;, पण तो बंद होता. त्यासभोंवतीं लहानशी पण सुंदर बाग होती. हल्लींचें पेशावर हें गांव अगदीं नवें आहे असें दिसतें. रस्ते प्रशस्त असून दोन्ही बाजूंना पायवाटा ठेवलेल्या आहेत, व रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना प्रचंड वृक्ष असून मुख्य रस्ता आणि पायवाट यांमध्यें लहानलहान ताटव्यांतलीं झाडें लावलेलीं आहेत; यामुळें सर्व रस्ताच उपवनाप्रमाणें दिसतो.

अजबखाना पहातां येत नाहीं, हें कळल्यामुळें आम्हांला वाईट वाटलें. पण त्याचा उपयोग काय ? मग आम्ही पंचतीर्थ नांवाचें एक ठिकाण पहावयाला गेलों. तेथें पुष्कळ लोक स्नानाला जातात, असें दिसलें. आवारांत गेल्यावर जिकडे जावें तिकडे पाणीच पाणी व झरेच झरे ! याप्रमाणें ती पाण्याची मजा पहातपहात आम्ही एका लहानशा विहिरी-जवळ गेलों. ही विहीर तोंडोतोंड भरली असून उकळणाऱ्या पाण्यांतून जशा वर उकळ्या येतात, तशा झऱ्यांच्या उकळ्या निघून विहिरीच्या सर्व कांठावरून सारखें पाणी वहात होतें. हा देखावा खरोखरच मनोहर होता. पाणीसुद्धां अत्यंत निर्मळ, गार व मधुर असें होतें. आम्ही तेथलें किती तरी पाणी प्यालों, तरी आमचें समाधान झालें नाहीं !

येथून आम्ही गांवांत एक गडासारखा भाग आहे, तिकडे गेलों. या भागाला कोनवाला म्हणतात. तेथेंच तहशील व इतर कचेऱ्या आहेत. येथें तटावरील बुरूजवजा असलेल्या उंच गच्चीवर गेलें, म्हणजे शहराचा विस्तार व शोभा एकदम दृष्टिपथांत येतात. या गच्चीवर उभें राहून आम्ही सभोंवार कितीतरी वेळ पहात होतों. हा प्रदेशहि पंजाबप्रमाणें सपाटच आहे. मात्र वायव्य दिशेला व उत्तरेला टेकड्याचटेकड्या दृष्टिगोचर होतात, व कांहींकांहींवर बरीच झाडीहि दिसते.

नंतर आम्ही बाजारांत हिंडलों. इकडे बहुतेक वसति मुसलमानांचीच आहे. हिंदू क्वचितच दिसतात. शहराचा जुना भाग अरुंद व कोंदट

आहे. पण म्युनिसिपालिटीची व्यवस्था चांगली असल्यामुळें कोठेंहि घाणकचरा वगैरे फारसा दिसला नाहीं.

रात्रीं बराच वेळ आम्ही गप्पा मारीत होतों. या ठिकाणीं सरहद्दीच्या पठाण टोळ्यांपासून मोठा धोका आहे, असें आम्हांला कळलें. रात्रीं बेरात्रीं एकटादुकटा मनुष्य सांपडला, तर हे पठाण लोक त्याला आपल्या गढी ( लहान किल्ल्या ) वर नेऊन अटकेंत ठेवतात, व त्याजकडून खंडणी घेतल्यावांचून त्याला सोडीत नाहींत. येथें लष्कर मोठें असल्यामुळें येथें हे पठाण लोक बंदुका चोरण्याचा धंदा करतात. कारण, त्यांना यायोगेंच बंदुका मिळतात. या सरहद्दीवरील प्रांताच्या आसपास केव्हां केव्हां या टोळ्या हल्ले करतात, व मग लष्करी सैन्य पाठवून त्यांच्याशीं प्रत्यक्ष लढाई करण्याचाहि प्रसंग येतो. यामुळें या प्रांतांत जीविताची आणि मालमत्तेची सुरक्षितता जरा कमी आहे, असें म्हणावें लागतें. तरी पण सरकार बराच बंदोबस्त ठेवतें. या पठाणटोळ्यांनीं दंगेधोपे किंवा चोऱ्यामाऱ्या करूं नयेत ह्मणून त्यांच्या मुख्यमुख्य लोकांना सरकारांतून दरसाल थोडीफार रक्कम पोहोंचविण्यांत येते, व अशा तऱ्हेनें त्यांच्यापासून प्रजेच्या मालमत्तेचा व जीविताचा बचाव केला जातो.

आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आम्ही सकाळींच चहा वगैरे घेऊन टांगा करून श्रीयुत गोगटे यांचेसमवेत जामरुडच्या किल्ल्याकडे जावयाला निघालों. येथले घोडे फार चपळ असल्यामुळें टांगे फार चांगले चालतात. यामुळें दहाबारा मैल अंतर तोडावयाला आम्हांला तास सवातासाच्या वर वेळ लागला नाहीं.

पेशावराकडून हा भाग ज़रा चढताच आहे. जसजसे आम्ही जवळजवळ येऊं लागलों, तसतशी आम्हांला टेकड्यांची रांगचीरांग समोर भिंतीसारखी दिसूं लागली, व त्यांच्या पायथ्याशीं लहानसा भुईकोट किल्ला दिसूं लागला. टांगा बाहेर ठेवून आम्ही किल्ल्याच्या दरवाजांतून आंत गेलों. श्रीयुत गोगटे हे पूर्वीं येथल्या पलटणींतील डॉक्टर असून या किल्ल्यावर राहिलेले होते. यामुळें सर्वांशीं त्यांची ओळख होती. अर्थात् किल्ला पहावयाला कांहींएक अडचण पडली नाहीं.

आम्ही किल्ल्याचा सर्व तट पाहून आलों. किल्ला फारसा मोठा नाहीं, व त्याच्या भिंती आणि बुरुज मातीविटांचेच आहेत. आपल्याकडे देशावरील कांहीं कांहीं गांवांत पाटलाची जशी गढी ( लहान किल्ला ) असते त्या तऱ्हेचाच हा किल्ला आहे. हा किल्ला पंजाबच्या रणाजितसिंहाच्या कारकीर्दींत बांधलेला आहे. सरहद्दीवरील पठाण नेहमीं त्रास देत, म्हणून रणाजितसिंहानें हा किल्ला बांधला, व त्याचा हरिसिंग म्हणून एक प्रख्यात सेनापति होता त्याला येथें ठेवलें. त्यानें या पठाण टोळ्यांची अगदीं खोडकी जिरविली, व रणाजितसिंगाच्या अंमलाचा दरारा या प्रांतांत चांगलाच बसविला. पंजाबांत व या प्रांतांत हारिसिंगाचें नांव अजूनहि लहान मुलांना भेवडाविण्याला उपयोगीं पडतें, इतका त्याचा दरारा या प्रांतांत होता. हरिसिंग या किल्ल्यांतच मेला, व त्याचें लहानसें स्मारक येथें आहे.

हा किल्ला टेकड्यांच्या अगदीं पायथ्याशींच आहे. येथूनच खैबरघांटाला सुरुवात होते. दोन टेकड्यांच्या मधून खिंडीसारख्या भागांतून रस्ता अगदीं स्पष्ट दिसतो. या टेकड्याहि अटकजवळच्या टेकड्यांप्रमाणें अगदीं उघड्याबोडक्या आणि निर्वन आहेत; त्यामुळें त्या अधिकच भीषण दिसतात. या सर्व डोंगरांत जिकडेतिकडे लहानलहान गढ्या दिसल्या. गढ्यांत पठाण लोक रहातात, असें आम्हांला कळलें. ब्रिटिश राज्याच्या सरहद्दीपासून अफगाणिस्तानच्या सरहद्दीपर्यंतच्या मुलखावर याच टोळ्यांचा ताबा आहे. येथला गढीवाला पठाण म्हणजे एक स्वतंत्र राजाच आहे.

झालें, येथें ‘ माझा अटकेपार प्रवास ’ संपला. जामरूड किल्ल्याशीं उभें असतांना हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याच्या विस्ताराची कल्पना माझ्या मनांत आली. रामेश्वरापासून पेशावरपर्यंत सुमारें दोन हजार आठशें मैल होतात. तसेंच द्वारकेपासून रंगूनपर्यंत दोन हजारांच्या वर मैल होतात. येवढें प्रचंड साम्राज्य पूर्वकालीं अशोकानें व पुढें समुद्रगुप्तानें स्थापन केलें होतें. पण हीं साम्राज्यें चिरकाल टिकलीं नाहींत. पण हल्लींचें साम्राज्य ब्रिटिशांच्या उदार धोरणामें हिंदुस्थान चिरस्थाई होणार यांत शंका नाहीं.

१०.८] ९६०८